सहकार भारतीचे मुखपत्र

बिना संस्कार नहीं सहकार, बिना सहकार नहीं उद्धार


ISBN 978-81-940842-0-4

# सहकार सुगंध

PRGI NO. MAHMUL/2005/16099

• पुणे • वर्ष : २१ • अंक ०५ • ऑगस्ट २०२५ • पृष्ठे ४८ • किंमत : रु. ३०/- • संपादक : भालचंद्र कुलकर्णी

# राष्ट्रीय सहकार धोरण जाहीर



- सहकार क्षेत्राचा सर्वसमावेशक विकास
- कृषी व दुग्ध व्यवसायाचा विस्तार
- प्रत्येक तालुक्यात आदर्श सहकाराची निर्मिती
- अर्बन बँका आणि पतसंस्थांचे सक्षमीकरण
- स्त्रिया व युवकांचा सहभाग वाढणार
- राष्ट्रीय उत्पन्नात सहकाराचा वाटा तिपटीने वाढणार

## देशाच्या आर्थिक विकासात सहकारी संस्था, सोसायट्यांचे महत्त्वपूर्ण योगदान




## देवगिरी नागरी सहकारी बँकेस 'शेड्यूल्ड' दर्जा प्राप्त




दि धरमपेठ महिला
मल्टी स्टेट को-ऑप. सोसायटी लि., नागपूर. (महाराष्ट्र, छत्तिसगढ व मध्यप्रदेश)
स्थापना-१९९४
आपला परिवार, आपली संस्था !
31 वर्षे विश्वासाचे
ह्या स्वतंत्र भारताच्या
प्रत्येक नागरीकाला करूया
वित्तीय संकटातून चिंतामुक्त
स्वातंत्र्य दिनाच्या
हार्दिक शुभेच्छा
15 ऑगस्ट
शुभेच्छुक
सौ. निलीमा बावणे (अध्यक्ष)
सौ. सारिका पेंडसे (उपाध्यक्ष)
व समस्त संचालक मंडळ
सीताराम भवन
ऑडिटोरियम आणि गेस्ट हाऊस
वाढदिवस | मुंज
साक्षगंध
सांस्कृतिक कार्यक्रम
कॉन्फरन्स
7888002023
सर्व आर्थिक समाधानांसाठी एकच संस्था
LOCKERS सुविधा
SMS अलर्ट
NEFT, RTGS सुविधा उपलब्ध
MOBILE बँकिंग
GOLD LOAN उपलब्ध
CORE बँकिंग
MSEDCL विज बिल भरणा केंद्र
LOAN सेवा सुविधा
DEPOSIT सुविधा
₹ 2335 कोटींच्या वर व्यवसाय
LIC पॉलिसी काढण्याची व प्रीमियम भरण्याची सुविधा
GIC पॉलिसी काढण्याची व नुतनीकरणाची सुविधा
24x7 मोबाईल बँकिंग
आता
NEFT
RTGS
IMPS
UPI
आपल्या मोबाईल द्वारे कुठेही, कधीही
बँकिंग व्यवहार तुमच्या मोबाईल वर
डिजिटल बँकिंग सुविधा
Cash Less बँकिंग व्यवहार
Authorised Rail Ticket Reservation Centre
फ्लाईट
क्रूज
हॉटेल
बस
ONLINE BOOKING FACILITY AVAILABLEAT ALL BRANCHES
7020218417
मुख्य कार्यालय
प्लॉट नं. ४२-अ, सीताराम भवन, राम नगर चौक, शिवाजी नगर, नागपूर-१० | फोन: 0712-2524337 / 2520303 | ई-मेल : info@dpmahila.com

कार्यक्षेत्र : महाराष्ट्र,मध्यप्रदेश

# राजर्षी शाहू

मल्टीस्टेट को ऑप क्रेडीट सोसायटी म.बुलडाणा

राजर्षी शाहू
र.नं. ८१९

ISO ९००१:२०१५ मान्यता प्राप्त संस्था
सतत दोन वर्षापासून बँको पुरस्कार प्राप्त संस्था
सतत दोन वर्षापासून FCBA पुरस्कार प्राप्त संस्था
सतत दोन वर्षापासून मल्टीस्टेट फेडरेशनचा सहकार गौरव पुरस्कार प्राप्त संस्था

आधारवड



रा.ल. उपाख्य भाऊसाहेब शेळके
संस्थापक अध्यक्ष, राजर्षी शाहू परिवार

अपेक्षेपेक्षा अधिक लाभ देणारी विश्वसनीय संस्था
अखंड वाढ आपल्या गुंतवणुकीची..!
दाम दुप्पट ठेव योजना

- सोने तारण कर्ज
- वेअर हाऊस कर्ज
- अल्पबचत कर्ज
- वाहन तारण कर्ज
- बचत गट कर्ज




राजर्षी शाहू मल्टीस्टेट को ऑप क्रेडीट सोसायटी म.बुलडाणा तुमच्या सेवेत सदैव तत्पर..!

Shahu Pay

खातेदारांना पेपरलेस सुविधा देणारी राजर्षी शाहू एकमेव पतसंस्था

शाहू पे द्वारे कोणत्याही शाखेमध्ये जमा स्लीप किंवा विड्रॉल फॉर्म न भरता QR कोड स्कॅन करून व्यवहार करता येईल.

संस्थेची वैशिष्ट्ये

१. एकूण ६९ शाखेचा विस्तार
२. ८०० कोटींचा व्यवसाय
३. १००००० सभासद संख्या
४.'शाहू पे' हे पेमेंट ॲप विकसित करणारी भारतातील पहिली पतसंस्था
५. महिला बचत गटाच्या माध्यमातून ३५ हजार महिलांना १२५ कोटी रू. चे कर्ज वाटप

- LOCKERS सुविधा
- NEFT,RTGS सुविधा उपलब्ध
- SMS अलर्ट
- MOBILE बँकिंग
- अनेक प्रकारच्या पॉलिसी काढण्याची व प्रिमियम भरण्याची सुविधा
- DOORSTEP बँकिंग
- GOLD LOAN उपलब्ध
- MSEDCL वीज बिल भरणा केंद्र
- CORE बँकिंग
- DEPOSITE सुविधा
- NET बँकिंग
- LOAN सेवा सुविधा

SHAHU PAY

राजर्षी शाहू विशेष लखपती ठेव योजना

> २४५०/- रू. प्रतिमाह ३६ महिने भरा मिळवा रु.१,००,०००/-
> १७००/- रू. प्रतिमाह ४९ महिने भरा मिळवा रु.१,००,०००/-
> १३५०/- रू. प्रतीमाह ६० महिने भरा मिळवा रु.१,००,०००/-
> ६५०/- रू. प्रतीमाह ६२ महिने भरा मिळवा रु.५०,०००/-

Missed Call
Balance check सुविधा
7877778870
राजर्षी शाहू मल्टीस्टेट

Coming Soon
WhatsApp Banking
राजर्षी शाहू मल्टीस्टेट



सौ. मालती संदीप शेळके
अध्यक्षा, राजर्षी शाहू मल्टीस्टेट को. ऑप क्रेडीट सोसा. बुलडाणा

www.rajarshishahumultistate.com +९१ - ९५२८४९०४९०

netwin
Ideas to Life

# आर्टिफिशियल इंटेलिजन्स (AI) सह स्मार्ट बँकिंगचा नवा अनुभव!




- शासकीय नियमावलीवर आधारित अत्याधुनिक कोअर बँकिंग सोल्यूशन
- NPA व्यवस्थापन आणि सुबक रिपोर्ट्सची सुविधा
- सुलभ कर्ज अर्ज – सुरक्षित, सोपी आणि जलद डिजिटल प्रक्रिया!
- संस्थेच्या वाढीसाठी NetPay UPI QR कोड सुविधा

Certification

netwin
Ideas to Life

## नाविन्य, विश्वास आणि गुणवत्तेचं प्रतीक.

- AI-सक्षम प्रणालीद्वारे आधुनिक आणि गतिमान बँकिंग सेवा
- तुमचा चेहरा तुमची ओळख – खाते उघडण्यासाठी फक्त एक सेल्फी पुरेशी!
- आधार OTP आणि डिजिटल ई-केवायसी द्वारे खाते सुरू करा
- बायोमेट्रिक वर आधारित अचूक प्रमाणीकरण
- स्मार्ट डॅशबोर्ड्स आणि रिअल टाईम डेटा नियंत्रणाची सुविधा
- संपूर्णतः पेपरलेस, जलद आणि सुरक्षित व्यवहार अनुभव

आजच आपल्या संस्थेला बनवा AI-सक्षम!

०२५३ ६६५ १५००

अधिक माहितीसाठी स्कॅन करा

sales@netwinindia.in www.netwin.in

सबल सहकार, समृद्ध भारत

।। बिना संस्कार नहीं सहकार, बिना सहकार नहीं उद्धार ।।

2025 International Year of Cooperatives

# सहकार भारती

## अर्बन को-ऑपरेटिव बैंक राष्ट्रीय अधिवेशन




## दि. 10-11 सितंबर 2025 (बुधवार-गुरुवार)

**स्थान : बिरला ऑडिटोरियम, स्टॅच्यू सर्कल, रामबाग, जयपुर - 302001**

अधिवेशन का पंजियन शुल्क रु 2500/- (GST सहित) प्रति एक प्रतिभागी (अनिवासी)

**पंजियन शुल्क जमा करने हेतु बैंक खाते का विवरण**

Account Name : **Sahakar Bharati**

Name of Bank : **TJSB Sahakari Bank Ltd.**

Branch : **Vile-Parle, Mumbai**

Bank A/c No : **019120100000683**

IFSC Code : **TJSB0000019**

अथवा दिए गए QR Code द्वारा भी पंजियन शुल्क जमा हो सकता है ।

## सहकार भारती केन्द्रीय कार्यालय

Plot No 211, Flat No 25 & 27, Beas Bldg, Satguru Sharan CHS Ltd,
3rd Floor, Opp Sion Hospital, Sion (E), Mumbai – 400 022 Maharashtra
email : sahakarbharati1@gmail.com website : www.sahakarbharati.org




स्वतःच्या कुटुंबासाठी हवे

**स्वतःचे घर,**

ठेवा विश्वास जनसेवेच्या

**'घरकुल' कर्जावर !**

# जनसेवा घरकुल कर्ज

रो हाऊस, बंगला, फ्लॅट
खरेदीसाठी किफायतशीर कर्ज उपलब्ध.
(सिबिल स्कोरनुसार व्याजदर)

* अटी लागू

- आकर्षक व्याजदर
- तत्पर सेवा
- अल्प प्रोसेसिंग फी
- रू. 2 कोटींपर्यंत कर्ज

**संपर्क क्र. - 84 85 87 12 52**

## जनसेवा सहकारी बँक लि., हडपसर, पुणे.

जनसामान्यांची असामान्य बँक, जनसेवेसाठी वचनबद्ध !

**मुख्य कार्यालय :** प्लॉट क्र. १४, हडपसर इंडस्ट्रिअल इस्टेट, हडपसर, पुणे ४११०१३.

www.janasevabankpune.net


50+ YEARS OF MOMENTUM
अर्थ सहकारेण कल्याणम्
दि कल्याण जनता सहकारी बँक लि.
मल्टी-स्टेट शेड्युल्ड बँक
सोने तारण कर्ज
जलद कर्ज
कमी प्रक्रिया शुल्क
व्याजदर
९.५०%* वार्षिक
* अटी व शर्ती लागू
TOLL FREE: 1800 233 1919
kalyanjanata.in
KJSBank

Bharat Connect

टीजेएसबी सहकारी बँक लिमिटेड. मल्टी-स्टेट शेड्युल्ड बँक

Bharose ka Bank Bhavishya ka Bank

# सर्व प्रकारच्या बिलांकरीता टीजेएसबी बँकेची

## सुलभ, विश्वासार्ह आणि सुरक्षित बिल भरणा सुविधा!




- वीज
- गॅस
- पाणी
- टेलिफोन / मोबाईल
- डी.टी.एच / केबल
- शिक्षण शुल्क
- हॉस्पिटल
- विमा
- फास्टॅग रिचार्ज
- कर्जाचे मासिक हप्ते

इतर संकलन सुविधा उपलब्ध

*नियम व अटी लागू

www.tjsbbank.co.in | ✆ : 022-48897210

|| बिना संस्कार नहीं सहकार । बिना सहकार नहीं उद्धार ||

# सहकार सुगंध

ISBN : 978-81-940842-0-4

# अनुक्रम


* देशातील प्रत्येक गावात सहकारी संस्थांचे जाळे तयार करणार ....... ११
* देशाच्या आर्थिक विकासाला गती देणारे राष्ट्रीय सहकार धोरण ....... १२
* अर्थव्यवस्थेची दिशा ठरविणारे राष्ट्रीय सहकार धोरण ....... १३
* राष्ट्रीय सहकार धोरण – नागरी सहकारी बँकांसाठी नव्या पर्वाची सुरुवात ....... १४
* सहकार क्षेत्रातील 'दुसरी क्रांती' ....... १५
* देशभरातील सहकार प्रशिक्षण क्षेत्रातील तज्ञांनी विद्यापीठासाठी योगदान द्यावे – केंद्रीय सहकार मंत्री अमित शाह यांचे आवाहन ....... १६
* देशाच्या आर्थिक विकासात सहकारी संस्था, सोसायट्यांचे महत्त्वपूर्ण योगदान – केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा ....... १७
* सहकार संवाद उपक्रमातून आलेल्या सूचनांनुसार सहकार मंत्रालय काम करेल ....... १८
* सहकार कायद्यात सुधारणा होण्याची गरज – आरबीआय संचालक सतीश मराठे ....... १९
* कर्तबगार व कर्तृत्ववान कर्मचारी बँकांबरोबर राहण्यासाठी नवनवीन उपक्रम राबवावेत – शरद गांगल यांची अपेक्षा ....... २०
* सहकार सप्ताहानिमित्त पतसंस्थांच्या कार्यक्रमांचे आयोजन यशस्वी ....... २१
* अरविंदराव भिडे – एक निग्रही कार्यकर्ता...! ....... २२
* सहकार भारती पुणे जिल्हाध्यक्षपदी विनायक तांबे यांची निवड ....... २३
* सहकारी पतसंस्थांत कर्मचारी, अधिकारी व संचालकांना प्रशिक्षणाची गरज ....... २४
* नागपूर नागरिक सहकारी बँकेचा ३४५१ कोटींचा विक्रमी व्यवसाय ....... २५
* सॅफमधून सुटका नको, पी.सी.ए.चा झटका ....... २६
* कल्याण जनता सहकारी बँकेच्या वतीने विविध उपक्रम ....... २७
* बँकिंग क्षेत्रात यशाची नवी कवाडे ....... २८
* पतसंस्थाच्या व्यवहारांची व्याप्ती वाढली, कर्ज मर्यादा अपुऱ्या ....... ३०
* नागरी सहकारी बँकांच्या विकासासाठी केंद्रीय सहकार मंत्रालय, रिझर्व्ह बँक कटिबद्ध – सतीश मराठे ....... ३१
* सहकारी संस्थांच्या खर्चाचे व्यवस्थापन ....... ३२
* सहकार क्षेत्रात पर्यटन वाढीसाठी मार्गदर्शन आवश्यक – मराठे ....... ३३
* आर्थिक व्यवहारात नैतिकता आणि प्रामाणिकपणा हवा – सीए श्रीराम देशपांडे ....... ३४
* देवगिरी नागरी सहकारी बँकेस शेड्यूल्ड बँकेचा दर्जा – सदस्यांना १२ टक्के लाभांश ....... ३५
* शाखाधिकारी – संस्था हित आणि संवादाचा सेतू ....... ३६
* स्टेट बँक नगर सहकारी गृहरचना सोसायटी अध्यक्षपदी लक्ष्मण लोहकरे पाटील ....... ३७
* वणा नागरीक सहकारी बँकेला वसंतदादा पाटील उत्कृष्ट सहकारी बँक पुरस्कार प्रदान ....... ३८
* को-ऑपरेटिव्ह आणि एनबीएफसी ....... ३९



**ऑगस्ट २०२५ (वर्ष २१, अंक ०५)**

**संपादक :**
भालचंद्र कुलकर्णी (मोबाईल : ९८२२८८२५०९)

**सहसंपादक :**
विनायक कुलकर्णी (मोबाईल : ९४२२३२१६२६)



**सहकार प्रिंटिंग अँड पब्लिकेशन्स प्रा. लि.**
**संचालक मंडळ :**
डॉ. उदय जोशी (संचालक, राष्ट्रीय अध्यक्ष)
सीए सतीश मेढी (संचालक, राष्ट्रीय कोषाध्यक्ष)
श्री. विनय खटावकर (संचालक)
श्री. भालचंद्र कुलकर्णी (व्यवस्थापकीय संचालक)

**मार्गदर्शक : सहकार भारती पदाधिकारी**
डॉ. उदय जोशी (राष्ट्रीय अध्यक्ष)
श्री. दीपक चौरसिया (राष्ट्रीय महामंत्री)
श्री. दीनानाथ ठाकूर (संरक्षक)
श्री. संजयजी पाचपोर (राष्ट्रीय संघटनमंत्री)
श्री. दत्ताराम चाळके (महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष)
श्री. विवेक जुगादे (महाराष्ट्र प्रदेश महामंत्री)
श्री. शरद जाधव (महाराष्ट्र प्रदेश संघटनमंत्री)
डॉ. मुकुंद तापकीर, श्री. सतीशजी मराठे,
श्री. ज्योतिंद्रभाई मेहता, श्री. विष्णूजी बोबडे,
श्री. संजय परमणे

**जाहिरात व वर्गणीदार विभाग समन्वयक :**
सौ. अंजली लागू, श्रीमती पौर्णिमा राईलकर

**मुखपृष्ठ मांडणी, अक्षरजुळणी व डिझाइन :**
सौ. अर्चना गाढवे


**दि. १ जानेवारी २०२५ पासून वर्गणीचे नवीन दर**
**वार्षिक वर्गणी :** रु. ७००/- फक्त
**त्रैवार्षिक वर्गणी :** रु. १८००/- फक्त
खालील QR कोड स्कॅन करून ऑनलाइन पेमेंट करावे.
**Please Visit : www.sahakarsugandha.org**

कृपया चेक / डीडी 'सहकार प्रिंटिंग अँड पब्लिकेशन्स प्रा. लि.' या नावाने पाठवावा. (पुणे येथे देय असलेला)


'**सहकार सुगंध**' हे मासिक **मालक,** सहकार प्रिंटिंग अँड पब्लिकेशन्स प्रा. लि. यांचेसाठी **प्रकाशक** भालचंद्र वसंत कुलकर्णी यांनी **मुद्रक** विवेक श्रीधर देशपांडे यांच्या श्रीपाद प्रिंटर्स, शॉप नं.२, कोणार्क उद्योग, स.नं. १७७, एरंडवणा, पुणे ४११ ००४ येथे छापून ऑफिस नं. १५, विष्णू प्रिया अपार्टमेंट, गणेशमळा, सिंहगड रोड, पुणे ४११ ०३० येथे प्रसिद्ध केले. **संपादक** – भालचंद्र वसंत कुलकर्णी

**'Sahakar Sugandha'** monthly is owned by Sahakar Printing & Publications Pvt. Ltd., Published by Bhalchandra Vasant Kulkarni at Office No. 15, Vishnu Priya Apartment, Ganeshmala, Sinhagad Road, Pune 411 030 Printed by Vivek Shridhar Deshpande at Shripad Printers, Shop No. 2, Konark Udyog, S.N. 177, Erandwane, Pune 411 004. **Editor :** Bhalchandra Vasant Kulkarni



**सहकार सुगंध कार्यालय :**
ऑफिस नं. १५, विष्णू प्रिया अपार्टमेंट, ५ वा मजला, ईशान रेस्टॉरंटच्यावर, गणेशमळा, सिंहगड रोड, पुणे – ४११०३०. मो. : ८८०५९८१६७३
ईमेल : sahakar.sugandha@gmail.com

# राष्ट्रीय सहकार धोरण : सहकारातून समृद्ध भारताकडे वाटचाल

भारत हा कृषीप्रधान देश असून, देशातील बहुतांश लोकसंख्या ग्रामीण भागात वास्तव्य करीत आहे. ग्रामीण विकासाचा कणा म्हणजे सहकारी चळवळ. भारताच्या स्वातंत्र्य लढ्यात जसा स्वदेशीचा विचार होता, तसाच ग्रामीण आर्थिक स्वावलंबनाचा आधार हा 'सहकार' आहे. या पार्श्वभूमीवर केंद्रीय सहकार व गृहमंत्री अमितभाई शहा यांनी नुकतेच जाहीर केलेले नवीन राष्ट्रीय सहकार धोरण हे सहकार चळवळीसाठी एक ऐतिहासिक पाऊल आहे. या धोरणाचा उद्देश केवळ सहकारी संस्था बळकट करणे एवढाच नसून, सहकाराच्या माध्यमातून समाजिक समता, आर्थिक प्रगती आणि राष्ट्र उभारणी साधणे हा आहे. यापूर्वी सन २००२ मध्ये राष्ट्रीय सहकार धोरण जाहीर करण्यात आले होते, त्यापेक्षा कितीतरी अधिक पटीने विविधांगी असे आत्ताचे २०२५ चे सहकार धोरण म्हणता येईल.

सहकार हा सर्वांसाठी, सर्वांच्या सहभागातून चालणारा लोकशाही आर्थिक व्यवस्थेचा भाग आहे. हे धोरण सहकार क्षेत्रात नवीन तंत्रज्ञान, पारदर्शकता, महिला व तरुणांचा सहभाग आणि आर्थिक शाश्वतता यांचा समावेश करून सहकार क्षेत्रात क्रांती घडविण्याचे उद्दिष्ट आहे. सन २०२१ मध्ये स्थापन झालेल्या स्वतंत्र सहकार मंत्रालयामुळे अनेक प्रलंबित मुद्यांची सोडवणूक झाली आहे. माजी केंद्रीय मंत्री व सहकार क्षेत्रातील जाणकार असलेल्या सुरेश प्रभू यांच्या नेतृत्त्वाखाली राष्ट्रीय सहकार धोरण समिती नेमली होती, ज्यामध्ये ४६ जाणकार, सहकार व बँकिंग तज्ञ व्यक्तींचा समावेश होता. सहकार भारतीचे संस्थापक सदस्य सतीश मराठे, माजी राष्ट्रीय अध्यक्ष ज्योतिंद्रभाई मेहता यांचाही यात समावेश होता. सहकार क्षेत्राच्या वृद्धी आणि शुद्धीसाठी संपूर्ण देशभर कार्यरत असणाऱ्या सहकार भारतीच्या प्रयत्नांमुळे अनेक चांगल्या बाबींचा समावेश या सहकार धोरणात झाल्याचे दिसून येते.

सहकार क्षेत्राच्या पारदर्शकतेबरोबरच संपूर्ण डिजिटल प्लॅटफॉर्म तयार करण्याचा विचार या धोरणात करण्यात आला असून सहकारी संस्थांना एकत्रित डेटाबेसमध्ये आणून त्यांचे कामकाज सुलभ व विश्वासार्ह केले जाणार आहे. प्राथमिक कृषी पतपुरवठा संस्था (पॅक्स) व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका या संस्थांमध्ये कोअर बँकिंग सोल्यूशन्स लागू करून त्यांना राष्ट्रीय आर्थिक प्रवाहाशी जोडले जाणार आहे. या धोरणामध्ये महिला बचत गटांना सहकारी संस्थांमध्ये सामावून घेणे व तरुणांसाठी सहकारी स्टार्टअप्सला प्रोत्साहन देण्याचे जाहीर करण्यात आले आहे. कृषी, दुग्ध, मत्स्य, प्रक्रिया उद्योग, विपणन, कर्ज पुरवठा आदी विविध सेवांचा एकत्रित लाभ देणाऱ्या बहुउद्देशीय सहकारी संस्था स्थापन करण्यावर धोरणामध्ये भर दिला आहे.

या राष्ट्रीय सहकार धोरणामुळे – ग्रामीण अर्थव्यवस्था सशक्त होईल, शेतीपूरक उद्योगांना चालना मिळेल, कर्जपुरवठा सुलभ व स्वस्त होईल, स्थानिक पातळीवर रोजगार निर्मिती वाढेल, शेतकऱ्यांचा बाजारपेठेवर ताबा वाढेल अशा विविध प्रकारांनी सहकार चळवळीला चालना मिळू शकेल, अशी या धोरणाची मांडणी करण्यात आली आहे. नवीन सहकार धोरण 'सहकारातून समृद्धी' या संकल्पनेला मूर्त स्वरूप देण्यावर भर देताना दिसते. शेतकऱ्यांना त्यांच्या मालाचे चांगले मूल्य मिळावे, ग्रामीण भागात रोजगार निर्माण व्हावा आणि स्थानिक गरजांसाठी स्थानिक संस्था सक्षम व्हाव्यात, यासाठी हे धोरण निश्चितच मार्गदर्शक ठरेल असे वाटते. राष्ट्रीय सहकार धोरण २०२५ हे लोकशाही मूल्यांवर आधारित, सहभागात्मक, पारदर्शक व प्रगतिशील धोरण आहे. यामध्ये केवळ अर्थकारण नाही, तर समाजकारणही अंतर्भूत आहे. सहकाराच्या माध्यमातून भारताच्या प्रत्येक कानाकोपऱ्यात आत्मनिर्भरता आणि सर्वांगीण विकासाचा एक उज्वल मार्ग मोकळा होणार आहे. सहकार ही केवळ एक चळवळ नाही, ती एक जीवनशैली आहे, भारताची संस्कृती आहे. त्यादृष्टीने आपण सर्वांनी सहकार भारतीच्या कार्याशी जोडले जावे, असे आवाहन आहे.

जय सहकार !




## संपादकीय...

# देशातील प्रत्येक गावात सहकारी संस्थांचे जाळे तयार करणार

## राष्ट्रीय सहकार धोरण जाहीर - विविध योजनांचा समावेश

**नवी दिल्ली** - राष्ट्रीय सहकार धोरणाच्या माध्यमातून आगामी २५ वर्षांतील सहकार क्षेत्राच्या वाटचालीचा कृती आराखडा तयार करण्यात आला आहे. त्यानुसार देशातील प्रत्येक गावात सहकारी संस्थांचे जाळे तयार करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे येत्या १० वर्षांच्या कालावधीत देशाच्या सकल राष्ट्रीय उत्पन्नातील सहकार क्षेत्राचा वाटा तिपटीने वाढविण्यात येणार आहे. देशाचे पहिले राष्ट्रीय सहकार धोरण केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा यांनी जाहीर केले.



केंद्रीय सहकार मंत्री
अमित शाह

केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, धोरण समितीचे अध्यक्ष आणि माजी केंद्रीय मंत्री सुरेश प्रभू सहकार सचिव आशिष भूतानी यावेळी उपस्थित होते.

**※ राष्ट्रीय सहकार धोरणाच्या स्थापनेची संकल्पना -**

सहकारी क्षेत्रातील तज्ज्ञांसह माजी केंद्रीय मंत्री सुरेश प्रभू यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय पातळीवरील समितीची स्थापना करण्यात आली होती. राष्ट्रीय / राज्य / जिल्हा / प्राथमिक स्तरीय सहकारी संस्था, सचिव (सहकार्य) आणि केंद्रीय मंत्रालये / विभागातील नवीन सहकार्य या कारकिर्दीतील सहकार्य / विभागातील अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. समितीने १७ बैठका घेतल्या देशभरात चार प्रादेशिक कार्यशाळा घेण्यात आल्या. यामधून आलेल्या सूचना मसुद्याच्या धोरणामध्ये समाविष्ट करण्यात आल्या आहेत. त्यानंतर धोरण तयार करण्यात आले आहे

देशातील सहकारी चळवळीला बळकटी देण्यासाठी आणि तळागाळातील जनतेपर्यंत नेण्यात येणाऱ्या विविध योजनेस मान्यता दिली आहे. योजनेत २ लाख नवीन बहुउद्देशीय पीएसीएस, दुधशाळा, मत्स्य व्यवसाय सहकारी संस्था, दुग्धशाळेच्या पायाभूत सुविधा, विकास निधी विविध जीओआय योजनांच्या अभिसरणातून नॅशनल बँक फॉर ॲग्रीकल्चरल अँड रूरल डेव्हलपमेंट (नाबार्ड), नॅशनल डेअरी डेव्हलपमेंट बोर्ड नॅशनल फिशरीज डेव्हलपमेंट बोर्ड आणि राज्य सरकार यांचा समावेश करण्यात आला आहे.

**※ प्रदीर्घ कालावधीनंतर धोरण जाहीर -**

तब्बल २३ वर्षांच्या कालावधीनंतर सहकाराचे धोरण जाहीर करण्यात आले आहे असे नमूद करून ते म्हणाले, देशातील प्रत्येक गावात व्यावसायिक आणि आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र सहकारी संस्था स्थापन करणे हा नवीन सहकार धोरणाचा उद्देश आहे. आगामी २०४७ पर्यंत देशाला विकसित राष्ट्र घडविण्याच्या दृष्टीने राज्यांनी नवीन सहकारी धोरणाची अंमलबजावणी शक्य तितक्या लवकर करावी, अशी अपेक्षा आहे.

**※ प्रत्येक तालुक्यात ५ आदर्श सहकारी गावाची निर्मिती -**

प्रत्येक तालुक्यात ५ आदर्श सहकारी गावाची निर्मिती करण्यात येणार. तसेच गाव, शेती, ग्रामीण महिला, आदिवासी यांना केंद्रस्थानी ठेवून सहकारचे जाळे अधिक घट्ट करणार, तसेच पर्यटन, टॅक्सी, विमा, हरित ऊर्जा या क्षेत्रात सहकारी संस्थांची नव्याने स्थापना करणार. सन २०३४ पर्यंत सहकारी क्षेत्राचे जीडीपीमध्ये तिपटीने योगदान वाढविण्यात येणार आहे. जवळपास ५० कोटी सक्रिय सदस्य व युवकांना रोजगार क्षेत्राशी जोडण्यात येणार. तसेच सहकार संस्थांची संख्या ३० टक्के वाढविण्यात येणार आहे. प्रत्येक गावात किमान एक सहकारी संस्था असावी यादृष्टीने नियोजन करण्यात येणार आहे, असे त्यांनी सांगितले.

सर्व भागधारकांच्या भूमिकेची आणि जबाबदार्‍यांची रूपरेषा असलेल्या मार्गादशिका १ सप्टेंबर सुरू करण्यात आल्या असून .राष्ट्रीय सहकारी डेटाबेसनुसार,हरियाणा राज्यात एकूण २१ नवीन पीएसीची नोंदणी करण्यात आली आहे.अशी माहिती केंद्रीय सहकारमंत्री अमित शहा यांनी राज्यसभेच्या बोलतांना सांगितले

# सहकार कायद्याचा फेरआढावा घेण्याची गरज - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई** - सहकार क्षेत्रासमोरील आव्हाने बदलली असून नव्याने सहकार क्षेत्राचा अभ्यास करून सहकार कायद्याचा फेरआढावा घेण्याची गरज आहे. तसेच सहकार कायद्यात कोणत्या स्वरूपाच्या तरतुदी असाव्यात, त्याबाबतचा अहवाल तयार करण्यात यावा, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

विधान भवनात आयोजित करण्यात आलेल्या बैठकीत ते बोलत होते. आंतरराष्ट्रीय सहकारिता वर्षामधील कार्यक्रमाचे नियोजन करण्यासाठी बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. सहकार मंत्री बाबासाहेब पाटील. कृषी मंत्री माणिकराव कोकाटे, यासह अधिकारी उपस्थित होते. मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की, आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष निमित्त सहकार क्षेत्रातील विविध खात्यांनी परस्पर समन्वयातून कार्यक्रमाचे नियोजन करावे. तसेच विविध उपक्रमाची माहिती जनतेपर्यंत पोहोचवावी.

सहकार आणि पणन विभागाचे प्रधान सचिव प्रवीण दराडे यांनी विविध विभागाच्या उपक्रमाच्या माहितीचे सादरीकरण केले. बँकिंग तज्ञ विद्याधर अनास्कर लिखित गोष्ट रिझर्व्ह बँकेची पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले.



# देशाच्या आर्थिक विकासाला गती देणारे राष्ट्रीय सहकार धोरण



देशाच्या आर्थिक विकासाला गती देणारे, तसेच देशाची अर्थव्यवस्था चौथ्या स्थानावरून दुसऱ्या स्थानावर येण्यासाठी सहकार क्षेत्राचे योगदान महत्त्वाचे ठरणार आहे. यासाठी नुकतेच जाहीर करण्यात आलेले राष्ट्रीय सहकार धोरण हे दिशादर्शक होणार आहे, असे सहकार भारतीचे माजी राष्ट्रीय अध्यक्ष, आरबीआयचे संचालक व राष्ट्रीय सहकार धोरण समिती सदस्य सतीश मराठे यांनी मुलाखतीमध्ये सांगितले.

**राष्ट्रीय सहकार धोरण नुकतेच जाहीर करण्यात आले आहे. या धोरणाची वाटचाल, धोरणातील ठळक बाबी आणि आगामी काळातील दिशा त्याची फलश्रुती याबाबत धोरण समिती सदस्य सतीश मराठे यांच्याबरोबर झालेली बातचीत...**

सहकार धोरणाबाबतच्या प्रदीर्घ मुलाखतीमध्ये मराठे यांनी राष्ट्रीय सहकार धोरणाचा आजवरचा प्रवास उलगडून सांगितला. ते म्हणाले, देशाचे पहिले सहकार धोरण भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते अटलबिहारी वाजपेयी यांच्या कालावधीत म्हणजे सन २००२ मध्ये तयार करण्यात आले होते. या धोरणाचा स्वीकार सर्व राज्यांनी केला होता. मात्र त्याचा प्रसार जितक्या प्रमाणात होणे अपेक्षित होते, तितक्या प्रमाणात झाला नाही. म्हणून केंद्रातील मोदी सरकारने याबाबत गांभीर्याने विचार करून नवीन धोरण तयार करण्याबाबत हालचाल केली आणि नुकतेच राष्ट्रीय सहकार धोरण जाहीर करण्यात आले आहे. त्यासाठी साधारणपणे अडीच ते तीन वर्षाचा कालावधी लागला. यासाठी सहकार क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या ४८ सदस्यांची समिती माजी केंद्रीय मंत्री सुरेश प्रभू यांच्या अध्यक्षतेखाली तयार करण्यात आली. यामध्ये विविध राज्यातील प्रतिनिधी, सहकार क्षेत्रातील विविध संस्था, महासंघ, महिला यांचा समावेश होता तर सहकार भारतीच्या वतीने सतीश मराठे ज्योतींद्रभाई मेहता आणि डॉ. पटेल यांचा समावेश होता.

सहकार क्षेत्र व्यापक आहे पण त्यातील प्रत्येक घटकांचा बारकाईने अभ्यास करण्यासाठी विविध समित्या तयार करण्यात आल्या असे नमूद करून ते म्हणाले, यासाठी आठ ते दहा स्वतंत्र गट तयार करण्यात आले. या गटांच्या वतीने मुख्य समितीला अहवाल सादर करण्यात आले. यासाठी एकूण १८ बैठका घेण्यात आल्या आणि प्रादेशिक स्तरावर ४ परिषदा घेण्यात आल्या. या माध्यमातून एकूण ६४८ सूचना मुख्य समितीकडे आल्या. या सर्व सूचनांचा साकल्याने विचार करून राष्ट्रीय धोरण तयार करण्यासाठी मुख्य समिती तयार करण्यात आली. यामध्ये नाबार्ड आणि वैकुंठभाई राष्ट्रीय सहकारी संस्था यांचाही सहभाग होता. साधारणपणे एक ते दीड वर्ष व्यापक प्रमाणावर अभ्यास विचार करण्यात आला त्यानंतर अंतिम धोरण तयार करण्यात आले.

विकसित देशासाठी सहकार क्षेत्राची महत्त्वपूर्ण भूमिका व सहकारातून समृद्धी यासाठी केंद्रीय सहकार मंत्रालयाची स्थापना हे घटक महत्त्वाचे आहेत. असे स्पष्ट करून ते म्हणाले, सध्या देशाची अर्थव्यवस्था ही जागतिक स्तरावर चौथ्या स्थानावर आहे. नजीकच्या काळात सार्वत्रिक प्रयत्नातून अर्थव्यवस्था दुसऱ्या स्थानावर जाऊ शकेल. केंद्र सरकारने सेवा आणि उत्पादन क्षेत्रात मोठी कामगिरी नोंदविली आहे. यामुळे निर्यात वाढीला अधिक गती येण्यास हातभार लागणार आहे. गेल्या १० वर्षाचा आढावा घेतला तर देशातील सुमारे २५ कोटी जनतेला दारिद्र्य रेषेच्या वर आणण्यात यश मिळाले आहे. तसेच प्रती व्यक्ति उत्पन्न वाढावे यासाठी ग्रामीण भागात विविध स्वरूपाचे उद्योग क्षेत्र वाढविण्यावर भर देण्याची गरज आहे. यासाठी कृषी प्रक्रिया क्षेत्र वाढविले पाहिजे, कारण या क्षेत्रात भारत देश अन्य देशाच्या तुलनेत मागे आहे. याबरोबर गोदामांची उपलब्धता वाढविणे आणि शेती मालास योग्य दर दिला जावा याकडे लक्ष देण्याची आवश्यकता आहे, असे त्यांनी सांगितले.

सहकार धोरणाचा व्यापक स्तरावर विचार करताना अनेक बाबींकडे लक्ष देण्याची आवश्यकता आहे, असे सांगून ते म्हणाले, यामध्ये पर्यटन, शिक्षण, वीज उत्पादन, शेती आणि शेती क्षेत्राशी निगडीत विविध घटक याचा प्राधान्याने विचार करावा लागणार आहे. सहकाराचा विकास हे उद्दिष्ट समोर ठेवून धोरण तयार करताना एकूण ८० मुद्दे विचारात घेतले होते. त्यातील ६० मुद्दे प्रत्यक्षात सुरू करण्यात आले आहेत, असे असले तरी प्रत्येक राज्याला धोरण राबविताना आवश्यक ते बदल मूळ चौकट कायम ठेवून करता येणार आहेत. आगामी काही वर्षात या धोरणामुळे बरीच उद्दिष्ट्ये साध्य होतील असे चित्र आहे. देशातील ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर इंटरनेट सुविधा उपलब्ध झाली आहे. त्याचाही आपोआप या धोरणासाठी फायदा होणार आहे. दुग्ध विकास या घटकावर सर्वच राज्यात भर देण्यात येणार आहे. आणखी एक बाब म्हणजे देशामध्ये सहकारी संस्थांचे भागधारक सदस्य जवळपास ३५ कोटी असून ही संख्या ५० कोटी पर्यंत जाणे शक्य आहे. तसेच प्रत्येक जिल्ह्यात ५ सहकार गावे तयार करण्याची योजना आहे, असे त्यांनी सांगितले.

राष्ट्रीय सहकार धोरणाच्या कार्यवाहीसाठी राष्ट्रीय स्तरावर दोन समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत, असे नमूद करून ते म्हणाले, केंद्रीय सहकार मंत्री आणि केंद्रीय सहकार सचिव यांच्या अध्यक्षतेखाली समिती कार्यरत असणार आहे.

**– शब्दांकन – विनायक कुलकर्णी** ❊❊❊

# प्रत्येक राज्याने सहकार धोरण प्रत्यक्षात आणावे - अनास्कर



**पुणे** – देशातील प्रत्येक राज्याने सहकार धोरण प्रत्यक्षात आणण्याचा प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे, तरच नवीन सहकार धोरणात अपेक्षित केल्याप्रमाणे देशाच्या अर्थव्यवस्थेत सहकार क्षेत्राचा हिस्सा तिपटीने वाढणे शक्य आहे, असे मत बँकिंग आणि सहकार तज्ज्ञ विद्याधर अनास्कर यांनी व्यक्त केले आहे.

सहकार हा राज्याचा विषय असून केंद्र आणि राज्य शासन यांनी हातात हात घालून सहकाराचे नवे धोरण अमलात आणण्यासाठी प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. राज्य सहकारी बँकिंगबाबत ते म्हणाले, नवीन धोरणात अपेक्षा केल्यानुसार प्रत्येक तालुक्यात राज्य सहकारी बँकेच्या मदतीने मदतीने किमान ५ सहकारी गावे निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात यावा, असे ते म्हणाले.

राष्ट्रीय सहकार धोरणाच्या अंमलबजावणीमुळे एकूणच सहकार क्षेत्राला उर्जितावस्था येईल असेच ते म्हणाले.

# अर्थव्यवस्थेची दिशा ठरविणारे राष्ट्रीय सहकार धोरण

'राष्ट्रीय सहकार धोरण २०२५' हे वर्ष २०४७ मध्ये विकसित भारत बनण्याच्या दिशेने टाकलेले एक दमदार पाऊल आहे. या धोरणामुळे सहकार क्षेत्राच्या क्षमतेचा पूर्ण वापर देशासाठी होणार आहे. यातून सहकार क्षेत्र हे भारताच्या अर्थव्यवस्थेचा मजबूत आधारस्तंभ बनल्याशिवाय राहाणार नाही.



**केंद्रीय सहकार राज्यमंत्री**
**मुरलीधर मोहोळ**

> **'राष्ट्रीय सहकार धोरण २०२५' हे वर्ष २०४७ मध्ये विकसित भारत बनण्याच्या दिशेने टाकलेले एक दमदार पाऊल आहे. या धोरणामुळे सहकार क्षेत्राच्या क्षमतेचा पूर्ण वापर देशासाठी होणार आहे. यातून सहकार क्षेत्र हे भारताच्या अर्थव्यवस्थेचा मजबूत आधारस्तंभ बनणार आहे.**

**※ महाराष्ट्र 'सहकाराची जन्मभूमी' –**

महाराष्ट्राचा विचार केला तर महाराष्ट्र राज्य हे 'सहकार क्षेत्राची जन्मभूमी' म्हणून ओळखली जाते. सहकारी संस्थांचे सर्वांत मोठे जाळे हे महाराष्ट्रात पसरलेले आहे. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यात कायम सहकार क्षेत्राच्या सक्षमीकरणासाठी ठोस पावले उचलली आहेत. त्यामुळे केंद्र सरकारच्या सहकार धोरणात महाराष्ट्राची भूमिका निर्णायक ठरणार आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०४७ पर्यंत विकसित राष्ट्र होण्याचे उद्दिष्ट निश्चित केले आहे. या दिशेने वाटचाल करताना केंद्र सरकारने पाच ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेचे लक्ष्य निश्चित केले आहे. हे लक्ष्य गाठताना सहकार क्षेत्राचा वाटा निर्णायक ठरणार आहे. 'सहकारातून समृद्धीकडे' या योजनेनुसार सहकारी क्षेत्राच्या दिर्घकालीन विकासासाठी अनुकूल वातावरणनिर्मितीसाठी 'राष्ट्रीय सहकार धोरण २०२५' तयार करण्यात आले. देशात सुमारे ८.५ लाख सहकारी संस्था, त्यात ३० कोटींहून अधिक सदस्य कार्यरत आहेत. या क्षेत्राला फक्त आर्थिक व्यवहारापुरते मर्यादित करता येत नाही. सामाजिक परिवर्तन, महिला सक्षमीकरण, आणि ग्रामीण विकासालाही या क्षेत्रातून हातभार लागतो. नवी दिल्लीतील 'अटल अक्षय ऊर्जाभवन' येथे केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा यांच्या हस्ते नव्या धोरणाचे औपचारिक उद्घाटन करण्यात आले. भारत सरकारने सादर केलेल्या 'राष्ट्रीय सहकार धोरण २०२५' नुसार सहकार क्षेत्रातून एक ट्रिलियन डॉलरचे योगदान अपेक्षित आहे.

सहकारी संस्थांसाठीचे धोरण वर्ष २००२ मध्ये अटलबिहारी वाजपेयी पंतप्रधान असताना जाहीर झाले. त्यानंतर एकोणीस वर्षांनी या क्षेत्राचे महत्त्व अचूक ओळखत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली ६ जुलै २०२१ मध्ये स्वतंत्र केंद्रीय सहकार मंत्रालयाची निर्मिती करण्यात आली आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्याकडे या खात्याची धुरा सोपवण्यात आली. ग्रामीण अर्थव्यवस्था आणि कृषी क्षेत्राचा कणा असलेल्या सहकार क्षेत्राशी भारतातील सुमारे ३० कोटी जनता प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरीत्या अवलंबून आहे. गेल्या दोन दशकांत आधुनिक तंत्रज्ञान आणि जागतिकीकरणामुळे जग आमूलाग्र बदलले आहे. कृषी क्षेत्रातील बाजारपेठा विस्तारल्या आहेत. आव्हानाचे स्वरूपही बदलले आहे. या बदलत्या परिस्थितीचा वेध घेत देशातील सहकारी संस्थांनी आर्थिकदृष्ट्या सक्षम राहाणे गरजेचे आहे. हीच दूरदृष्टी ठेवत 'राष्ट्रीय सहकार धोरण २०२५' आखण्यात आले आहे.

६ जुलै २०२१ रोजी सहकार मंत्रालयाची निर्मिती झाल्यानंतर एका वर्षाच्या आत केंद्रीय मंत्री अमित शहा यांनी नवे राष्ट्रीय धोरण तयार करण्याच्या दिशेने तयारी सुरू केली. २ सप्टेंबर २०२२ रोजी माजी केंद्रीय मंत्री सुरेश प्रभू यांच्या अध्यक्षततेखाली ४८ सदस्यांची राष्ट्रीय समिती तयार करण्यात आली. डिसेंबर २०२३ मध्ये या समितीने 'राष्ट्रीय सहकार धोरण २०२५'चा पहिला मसुदा तयार केला. या समितीकडून सहकार क्षेत्रातले विविध अभ्यासक, तज्ज्ञ आणि अधिकारी यांच्यासोबत एकूण १७ बैठका घेण्यात आल्या. नोव्हेंबर २०२३ मध्ये गुरुग्राम, अहमदाबाद, बेंगलूरु आणि पाटणा या चार ठिकाणी कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले. तसेच रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे गव्हर्नर आणि नाबार्डचे अध्यक्ष यांच्यासोबत सल्लामसलत करुन त्यांच्या सूचनांचे पालन करण्यात आले. या सर्व तज्ज्ञ मंडळीकडून ६४८ सूचना प्राप्त झाल्या. त्यानुसार मसुद्यात योग्य ते बदल करण्यात आले.


**※ सहकार धोरणाचा फायदा –** सहकार धोरण निश्चित करताना केंद्र सरकारकडून राज्य पातळीवर व्यापक प्रयत्न केले जात आहेत. याचाच भाग म्हणजे भारतातल्या प्रत्येक गावात किमान एक सहकारी संस्था स्थापन करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. भारताचे सकल राष्ट्रीय उत्पादन सुमारे ४.१९ ट्रिलियन डॉलर आहे. यामध्ये सहकार क्षेत्राचा वाटा अंदाजे ३ ते ४ टक्के (१६७.६ अब्ज डॉलर) आहे. हा वाटा सुमारे तिप्पट वाढवण्याचे लक्ष्य 'राष्ट्रीय सहकार धोरण २०२५' च्या माध्यमातून ठेवण्यात आले आहे. हे ध्येय गाठण्यासाठी १० वर्षांचा कालावधी निश्चित करण्यात आला आहे. ज्यासाठी सहा मूलभूत गोष्टींचा कृती आराखडा तयार करण्यात आला आहे. या कृती आराखड्यात १६ ठोस उद्दिष्टे आणि ८२ कृतिकार्यक्रम निश्चित करण्यात आले आहेत. ज्या मुद्द्यांवर सहकार क्षेत्र एक ट्रिलियन डॉलरचे लक्ष्य गाठणार आहे, त्यामध्ये सहकार क्षेत्राचा मूलभूत पाया मजबूत करणे, सहकार क्षेत्रातील सक्रियता आणि गतिशीलता वाढवणे, सहकारी संस्थांना भविष्यासाठी सक्षम बनवणे, समाजातील सर्व घटकांना सहकारक्षेत्राशी जोडणे, या क्षेत्राचा नव्या क्षेत्रांमध्ये विस्तार करणे आणि सहकार वृद्धीसाठी नव्या पिढीला घडवणे या सहा तत्त्वांचा समावेश आहे. यासाठी वर्ष २०३५ पर्यंत सहकारी संस्थाचे जाळे प्रत्येक गावात पोचवत ५० कोटी सदस्यसंख्या करण्याचे उद्दिष्टही ठेवण्यात आले आहे. याशिवाय सहकार संस्थांशी संबंधित सदस्यांची ३० टक्क्यांनी वाढवणे, सहकारी बँकांना बळकटी देत त्यांची ग्राहकसंख्या अडीचपट वाढवणे आणि प्रत्येक ग्रामीण कुटुंबातील किमान एक व्यक्ती सहकारी संस्थेचा सदस्य असेल असे लक्ष्य ठेवण्यात आले आहे.

'राष्ट्रीय सहकार धोरण २०२५' अंतर्गत केंद्र सरकारने सहकारी संस्थांना बळकट करण्यासाठी, कामकाजातील पारदर्शकता वाढवण्यासाठी नियोजनबद्ध उपक्रम आखले आहेत. यामध्ये 'राष्ट्रीय सहकारी डिजिटल भरती मंडळ' स्थापन करून सहकार संस्थांमधील भरतीप्रक्रिया पारदर्शक केली जाणार आहे. सहकारी संस्थांमध्ये काम करण्यासाठी कुशल मनुष्यबळ उपलब्ध होण्याचा मार्ग यामुळे खुला होणार आहे. 'राष्ट्रीय सहकारी लेखा व लेखापरीक्षण मंडळ' हे सहकारी संस्थांच्या आर्थिक शिस्तीवर लक्ष ठेवणार आहे. सहकारी संस्थांना वित्तपुरवठा करण्यासाठी वित्तसंस्थांची उभारणी केली जाणार आहे. 'राष्ट्रीय सहकारी न्यायाधिकरण' स्थापल्याने सहकारी संस्थांच्या वादांचे त्वरित व न्याय्य निवारण शक्य होईल, ज्यामुळे संस्था अधिक सक्षम व स्वयंपूर्ण बनतील.

**पान नं. १५ वर...**

# राष्ट्रीय सहकार धोरण - नागरी सहकारी बँकांसाठी नव्या पर्वाची सुरुवात

जुलै २०२५ मध्ये जाहीर करण्यात आलेले राष्ट्रीय सहकार धोरण हे भारतातील सहकार क्षेत्राला दिशा देणारे आणि पुढील काही वर्षांसाठी दिशा ठरवणारे असे महत्त्वाचं पाऊल ठरणार आहे. विशेषतः नागरी सहकारी बँकांसाठी हे धोरण म्हणजे एक सुवर्णसंधी आहे – कारण यात शासनव्यवस्था, नियमांचे पालन आणि तंत्रज्ञानाचा समावेश या तीन गोष्टींना विशेष स्थान देण्यात आले आहे.



अजित भाले
८००७७ ५५४५५

लेखांक ७

आजच्या स्पर्धात्मक आर्थिक जगात नागरी सहकारी बँकांना टिकून राहायचे असेल, तर त्यांना मान्य करावे लागेल की आर्थिक सेवा क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर बदल झाले आहेत. शेड्यूल्ड बँका डिजिटलदृष्ट्या खूपच पुढे गेल्या आहेत. त्यांच्याकडून ग्राहकांना मोबाईलवरून सहज सेवा मिळते. विशेषतः तरुण पिढीला आकर्षक वाटतील अशा योजना घेऊन येतात. हे सगळं पाहता, आजच्या काळात नवीन प्रकारचे बँकिंग रोल मॉडेल्स तयार होत आहेत – जे जलद, सुलभ आणि पारदर्शक सेवा देण्यावर भर देतात. नागरी सहकारी बँकांनी आपल्या कार्यपद्धतीत आणि दृष्टीकोनात बदल करण्याची वेळ आली आहे. सन २००० च्या दशकात बँकिंग व्यवहार मुख्यत्वे नगर पातळीवरील शाखांमध्ये होणाऱ्या प्रत्यक्ष उपस्थितीवर आधारित होते. ग्राहकांकडे फारसे पर्याय नव्हते. त्यामुळे बाजार विक्रेता केंद्रित होता – म्हणजे बँका ठरवत असत की कोणाला सेवा द्यायची, कशा अटींवर द्यायची.

तंत्रज्ञानाच्या उदयानंतर चित्र पूर्णपणे बदललं आहे. ग्राहक इंटरनेटवर सहजपणे विविध बँकांची उत्पादने, दर आणि अटी यांची तुलना करू शकतो. त्यामुळे बाजार ग्राहककेंद्रित झाला आहे. ग्राहक ठरवतो की कोणती सेवा घ्यायची आणि कोणाकडून. या पार्श्वभूमीवर, अनेक खासगी आणि सार्वजनिक बँकांनी CIC स्कोअर वापरून आपले धोके कमी केले. पण त्यामुळे अशा अनेक ग्राहकांना बाहेर ठेवण्यात आलं, ज्यांचा आर्थिक इतिहास सुसंगत नव्हता. ग्राहकांना नागरी सहकारी बँकांनी आधार दिला, यामध्येही एक अडचण होती – CIC स्कोअर हे जिथे पात्रता ठरवायचं साधन असावं, तिथे अपात्र ठरवण्याचं निकष बनलं. यामुळे बँकिंगचा 'विक्रेताकेंद्रित' दृष्टिकोन अधिक घट्ट झाला.

सरकारच्या प्रस्तावित ग्रामीण गुणांकन योजनेमुळे संतुलन पुन्हा बदलू शकतं. ही संकल्पना अजून आखणीच्या टप्प्यावर असली, तरी तिचा हेतू स्पष्ट आहे – पारंपरिक कागदपत्रांशिवाय आर्थिक शिस्तबद्धता असलेल्या लोकांना औपचारिक बँकिंग प्रणालीत सामावून घेणं. यामुळे आर्थिक समावेश वाढेल आणि बाजाराचा फोकस अधिक ग्राहकाभिमुख होईल.अशा बदलांमध्ये काही UCBs अजूनही मागे आहेत – डिजिटल सेवा सुरू करण्यास अनिच्छुक, नवीन तंत्रज्ञान भागीदारांशी काम करण्यास तयार नसलेले, किंवा आपल्या सदस्यांशी नव्या पद्धतीने संवाद साधण्यास अनुत्सुक. परंतु हाच बदल स्वीकारण्याची हीच वेळ आहे, कारण आर्थिक व्यवहार अधिक पारदर्शक, स्पर्धात्मक मागणीवर आधारित होत आहेत.

नागरी सहकारी बँका म्हणजे फक्त लहान बँका नाहीत. त्या बुटीक वित्त संस्था आहेत – दशकानुदशकं विशिष्ट समुदायासोबत संबंध जपतात. अशा संस्था फारशा दिसत नाहीत, ज्या सदस्यकेंद्रित राहूनही आर्थिकदृष्ट्या टिकून राहतात. म्हणूनच ही एक अनोखी संधी आहे – जिथे इतिहासाच्या जोरावर, तंत्रज्ञानाची जोड देऊन, नागरी सहकारी बँका नव्या युगातही प्रभावी भूमिका बजावू शकतात. राष्ट्रीय सहकार धोरण हे कोणतंही बंधन नसून, एक दिशा आहे. धोरण बँकांना नव्या शिस्तीकडे नेते – जिथे शासनसुधारणा, डिजिटल स्वीकार आणि सदस्याभिमुखता यांच्या साहाय्याने सहकारी बँका पुन्हा एकदा आर्थिक क्षेत्रात महत्त्वाचं स्थान मिळवू शकतात. यासाठी त्यांना फक्त जुन्या पद्धती सोडून, नव्या संधींचं स्वागत करावे लागेल.

**– अजित भाले, संस्थापक, मेट्टारेव सिस्टीम्स, पुणे**
Mettarev Systems
Email- ajit.bhalemettarev.com

*****

# नवीन सहकार धोरणामुळे चळवळीच्या विकासाला हातभार लागेल

केंद्रीय सहकार मंत्री यांनी देशाचे सहकार धोरण जाहीर केले आहे धोरण तयार करण्यासाठी सहकार क्षेत्रातील अनुभवी सुरेश प्रभू यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली होती या समितीने दिलेल्या अहवालाच्या आधारे धोरण तयार करण्यात आले.



सुभाष मोहिते
९४२२० ८६२७२

*** धोरणाची वैशिष्ट्ये –**

१) सहकार चळवळ भक्कम पायावर उभी करणे. २) आत्मनिर्भर सहकारी संस्थांची निर्मिती करणे. ३) सहकारी संस्थांचे व्यावसायिक व शाश्वत आर्थिक बळकटीकरण करणे. ४) सहकाराच्या विकासामध्ये सहभाग वाढवणे व जनतेची चळवळ म्हणून राबवणे. ५) सहकारी संस्थांना नवीन उद्योन्मुख क्षेत्रामध्ये प्रवेश होण्यासाठी प्रयत्न करणे. ६) तरुण पिढीला सहकारात येण्यास प्रोत्साहन देणे त्यांना सहकारावर आधारित अनुभवात्मक शिक्षण देणे व सहकाराशी नाते दृढ करणे. ७) तसेच पर्यावरणपूरक वातावरण तयार करणे अशी उद्दिष्ट या धोरणात ठरविण्यात आलेली आहेत.

सहकाराचा मूळ उद्देश म्हणजे सभासदांनी सभासदांसाठी चालविलेली सभासदांची संस्था ही बाब अधोरेखित केली आहे. धोरण अत्यंत व्यापक असून सर्व सहकारी कार्यकर्त्यांनी त्यामध्ये सहकारात सहकार या भूमिकेतून काम केल्यास पुढच्या काळामध्ये सहकारातून समृद्धी हे पंतप्रधानांचे स्वप्न आहे, ते निश्चित साकार होईल असे वाटते. विशेषतः तरुण पिढीने सहकारात येण्यासाठी त्यांना सहकारावर आधारित अनुभवात्मक शिक्षण प्रदान करणे व त्यांचे सहकाराची नाते दृढ करणे ही संकल्पना पुढील पिढीच्या हाती सहकार चळवळीचे भवितव्य सोपवण्यासाठी व त्यांच्याकडून ते घडून घेण्यासाठी केलेली चांगली तरतूद आहे.

सहकारी संस्थांनी पारंपारिक सहकारी संस्थांमधून बाहेर पडून उद्योगांमध्ये किंवा उद्योग क्षेत्रामध्ये पुढे येऊन काम करावे व त्यासाठी प्रयत्न करण्यात येतील ही संकल्पना ही चांगली आहे. त्यामुळे व्यवसायामध्ये किंवा सेवाभावी कामांमध्ये या सहकारी क्षेत्राचा प्रवेश होऊन सहकारी चळवळीला चांगले दिवस येतील. देशाच्या विकासामध्ये सहकारी चळवळीचे व संस्थांचे भरीव योगदान रहावे, ही संकल्पनासुद्धा भारत सहकारी चळवळीचे अग्रस्थान बनावे या उद्देशाने आणलेली दिसते. या धोरणामध्ये अभ्यासपूर्वक अनेक गोष्टी नमूद केल्या आहेत. जाणीवपूर्वक प्रामाणिकपणे काम करणारे प्रामाणिक कार्यकर्ते व त्यांना मनापासून सहकार्य करणारे राजकीय नेते असतील तर त्याचे निश्चितपणे चांगले परिणाम होतील.

**अध्यक्ष (पुणे नागरी सहकारी बँक**
**असोसिएशन पुणे (महाराष्ट्र)**

# सहकार क्षेत्रातील ‘दुसरी क्रांती’

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ‘सहकारातून समृद्धी’ या संकल्पनेला साकार रूप देताना केंद्रीय सहकारमंत्री अमित शहा यांनी गेल्या चार वर्षांत सहकार क्षेत्रात अभूतपूर्व बदल घडवून आणले. शहा यांच्या नेतृत्वाखाली सहकार मंत्रालयाने अथक प्रयत्न करीत ६० पेक्षा अधिक महत्त्वपूर्ण उपक्रम हाती घेतले आहेत. या घडामोडींना ‘सहकार क्षेत्रातील दुसरी क्रांती’ म्हटले तरी वावगे ठरणार नाही.



दिलीप संघाणी

केंद्रीय सहकारिता मंत्रालयाने सहकारी संस्थांचा डेटाबेस तयार करण्यासाठी केलेले परिश्रम, हा या वाटचालीतील महत्त्वाचा टप्पा ठरला. प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्थांपासून (पॅक्स) शिखर संस्थांपर्यंत (ॲपेक्स) नव्या उपविधींचा अवलंब करत कार्यपद्धती सुधारण्यात आली. देशातील प्रत्येक गावात सहकारी संस्था पोहोचवण्याचा उद्देश ठेवून दोन लाख नवीन पॅक्स स्थापनेचे लक्ष्य निश्चित करण्यात आले. त्यामध्ये कृषी, दुग्ध व्यवसाय, मत्स्यपालन आणि मीठ उत्पादन यांसारख्या उपक्रमांचा समावेश करण्यात आला आहे.

**※ पारदर्शकता, कार्यदक्षतेचा नवा अध्याय –** पॅक्सच्या संगणकीकरणाला गती देत सहकार क्षेत्रात पारदर्शकता व कार्यक्षमतेची जोड दिली गेली. जुन्या सहकारी कायद्यांत सुधारणा करत नवीन तरतुदी आणल्या. बहुराज्यीय सहकारी कायद्यात आवश्यक ते बदल करून कायदेशीर सुधारणांचा नवा आराखडा तयार केला. याशिवाय सहकारी संस्थांच्या निवडणुकांसाठी स्वतंत्र केंद्रीय सहकारी निवडणूक प्राधिकरणाची स्थापना केली.

**※ पॅक्सला बहुहितकारी व्यावसायिक स्वरूप –** पॅक्सला सशक्त बनविण्यासाठी त्यांना विविध मंत्रालयांच्या योजनांशी संलग्न व्यावसायिक कामांमध्ये सहभागी करून घेण्यात आले. सहकारात तरुणांचा सहभाग वाढावा, यासाठी अनेक नव्या योजना राबविण्यात आल्या. यासाठी देशातील पहिली त्रिभुवन सहकारी विद्यापीठाची स्थापन करण्यात आली आहे. याच शैक्षणिक सत्रापासून अध्यापनास सुरुवात होणार आहे. या विद्यापीठात सहकारी प्रशासन, नेतृत्व, उद्योजकता, डिजिटल व्यवस्थापन व धोरण निर्मितीसारख्या विषयांवर विशेष अभ्यासक्रम तयार करण्यात आले आहेत.

**※ अन्नसुरक्षेसाठी भव्य योजना –** राष्ट्रीय पातळीवर बीज, निर्यात आणि ऑर्गेनिक या तीन नवनिर्मित सहकारी संस्था स्थापन करून शेतकऱ्यांच्या उत्पन्नवाढीस चालना मिळाली आहे. देशाच्या अन्नसुरक्षेच्या दृष्टीने ग्रामपातळीवर अन्नधान्य साठवणुकीसाठी गोदामांची व्यापक योजना हाती घेण्यात आली आहे. त्याच्या पायलट प्रकल्पाचे यशस्वी परीक्षण होऊन पहिल्या टप्प्याची अंमलबजावणी सुरू झाली आहे. कृषी उत्पन्नाच्या किमान आधारभूत किमतीवर (एमएसपी) खरेदी करण्याची जबाबदारी सहकारी संस्थांना दिली आहे. नाफेड व एनसीसीएफ या संस्थांमार्फत डाळी व तेलबियांना हमीभाव दिला जात आहे. सरकारी साखर कारखान्यांना खासगी कारखान्यांप्रमाणे समान संधी उपलब्ध करून दिली असून, प्राप्तिकर सवलतीसह त्यांच्या आर्थिक अडचणी दूर केल्या आहेत.

**※ सहकारी बँकांचे आर्थिक बळकटीकरण –** सरकारी उपक्रमांत सहकारी बँकांना नव्या शाखा सुरू करण्याची मुभा आणि व्यावसायिक व्यवहार वाढवण्याची संधी मिळाल्याने त्यांच्या आर्थिक स्थितीत सुधारणा झाली आहे. 'एनसीडीसी'द्वारे दिल्या जाणाऱ्या कर्जवाटपाचा विस्तार होत आहे. चालू आर्थिक वर्षात याचे उद्दिष्ट पावणेदोन लाख कोटी रुपयांपर्यंत जाण्याचा अंदाज आहे.

**※ सहकार क्षेत्रातील उज्ज्वल भविष्य –** देशामध्ये सध्या साडेआठ लाखांहून अधिक सहकारी संस्था कार्यरत असून, त्यामध्ये २९ कोटी नागरिक सदस्य म्हणून सहभागी आहेत. या संस्था कृषी उत्पादन, ग्रामीण वित्त, गृहबांधणी, विपणन, ग्राहकसेवा, दुग्ध व्यवसाय, मत्स्य उद्योग आणि इतर अनेक क्षेत्रांमध्ये महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहेत. या चार वर्षांत सहकार क्षेत्रात जो विकास झाला आहे, तो केवळ प्रशासकीय यश नसून, एक व्यापक सामाजिक-आर्थिक बदल घडवणारी क्रांती आहे. या कामगिरीमुळे सहकार क्षेत्र भविष्यात स्थानिक विकास, आर्थिक समावेशन आणि आत्मनिर्भर भारताच्या दिशेने एक मजबूत पाया ठरेल, यात शंका नाही.

**– दिलीप संघाणी**

**(लेखक ‘एनसीयूआय’ आणि ‘इफको’चे अध्यक्ष आणि गुजरात सरकारमधील माजी मंत्री आहेत.)**

*****

पान नं. १३ वरून...

## अर्थव्यवस्थेची दिशा ठरविणारे सहकार धोरण

याशिवाय प्रत्येक पंचायतमध्ये एक प्राथमिक कृषिसंस्था, प्रत्येक जिल्ह्यात एक मॉडेल सहकारी गाव, प्रत्येक जिल्ह्यात एक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, प्रत्येक शहरी भागात एक शहरी सहकारी बँक यांची स्थापना केली जाणार आहे. सहकारी क्षेत्रातील संस्थांना बळकटी देतानाच या संस्थांमध्ये महत्त्वाच्या कायदेशीर सुधारणा राष्ट्रीय सहकार धोरण २०२५ अंतर्गत करण्यात आल्या आहेत. सहकारी संस्थांमध्ये घराणेशाहीचा कारभार ही समस्या राहिली आहे. ही समस्या सोडवण्यासाठी निवडणुकीत पारदर्शकता आणि प्रशासकीय पदांवरील पात्रतेचे नियम अधिक स्पष्ट करण्यात आले आहेत.

प्राथमिक कृषी पतसंस्था या महत्वाच्या सहकारी संस्थांच्या कारभारातील पारदर्शकतेसाठी या संस्थांचे डिजिटल सक्षमीकरण करणे नितांत गरजेचे होते. प्राथमिक कृषिसंस्थांचे व्यवहार डिजिटल प्रणालीद्वारे होणार असल्यामुळे पारदर्शकता वाढणार आहे. सहकारी बँकांना आता ‘बँकिंग रेग्युलेशन ॲक्ट’ अंतर्गत ‘आरबीआय’च्या देखरेखीखाली आणले गेले आहे. यामुळे ठेवीदारांचा विश्वास वाढेल, गैरप्रकारांना आळा बसेल आणि बँकिंग व्यवस्थेत शिस्त येईल.

**※ राष्ट्रीय सहकार धोरणाची वैशिष्ट्ये –** या धोरणाच्या माध्यमातून देशातील ५० कोटी जनतेला सहकार क्षेत्राच्या कक्षेत आणण्याची केंद्र सरकारची योजना आहे. यामुळे पुढील १० वर्षांत देशाच्या राष्ट्रीय सकल उत्पादनात तीनपटींनी वाढ होणार आहे. यासाठी ‘राष्ट्रीय टास्क फोर्स’ स्थापना केला जाणार आहे.

सहकार खात्याला बळकटी मिळावी यासाठी केंद्राच्या विविध मंत्रालयांमध्ये समन्वयाचे धोरण तयार केले जाणार आहे. डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर करून कागदविरहित नोंदणी कार्यालये, प्राथमिक कृषिसंस्थांचे डिजिटायझेशन, सहकारी बँकांसाठी आयटी प्रणाली, रोजगार प्लॅटफॉर्म्स इत्यादी उपक्रम राबवले जाणार आहेत. ‘त्रिभुवन सहकारी विद्यापीठ’, राष्ट्रीय सहकारी बँक, शहरी सहकारी बँकांसाठी अपेक्स संस्था, ग्रामीण सहकारी बँकांसाठी SSE या माध्यमातून सहकारी संस्थांचे जाळे प्रत्येक गावात पोचवण्यात येणार आहे. या धोरणाची अंमलबजावणी केवळ केंद्र पातळीवर मर्यादित न राहता राज्य पातळीवरही प्रभावीपणे केली जाणार आहे. त्यामुळे ३१ जानेवारी २०२६ पर्यंत प्रत्येक राज्याने स्थानिक गरजांनुसार स्वतःचे सहकार धोरण तयार करणे बंधनकारक असणार आहे.

‘राष्ट्रीय सहकार धोरण २०२५’ हे वर्ष २०४७ मध्ये विकसित भारत बनण्याच्या दिशेने टाकलेले एक दमदार पाऊल आहे. या धोरणामुळे सहकार क्षेत्राच्या क्षमतेचा पूर्ण वापर देशासाठी होणार आहे. यातून सहकार क्षेत्र हे भारताच्या अर्थव्यवस्थेचा मजबूत आधारस्तंभ बनणार आहे.

# देशभरातील सहकार प्रशिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञांनी विद्यापीठासाठी योगदान द्यावे - केंद्रीय सहकार मंत्री अमित शाह यांचे आवाहन



**आणंद, गुजरात –** आगामी काळात सहकार क्षेत्रात क्रांती घडविणे आणि देशाला आत्मनिर्भर करण्यासाठी राष्ट्रीय स्तरावरील पहिले त्रिभुवन सहकार विद्यापीठ महत्त्वपूर्ण योगदान देईल, असा विश्वास केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा यांनी व्यक्त केले आहे. पहिल्या राष्ट्रीय सहकार विद्यापीठाच्या भूमिपूजन कार्यक्रमाप्रसंगी ते बोलत होते. गुजरातचे मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल उपस्थित होते. या क्षेत्रातील घराणेशाही संपुष्टात आणण्याचे काम करेल असे ते म्हणाले.

विद्यापिठाच्या उभारणीसाठी सुमारे ५०० कोटी खर्च अपेक्षित असून जवळपास १२५ एकर जागेवर विद्यापिठाची उभारणी करण्यात येणार आहे. विद्यापीठाला त्रिभुवनदास किशीभाई पटेल यांचे नाव देण्यात आले आहे. सहकार मंत्रालयाचे सचिव डॉ. आशिष कुमार भुटानी यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

**राष्ट्रीय सहकारी विद्यापीठातून प्रशिक्षण घेतलेल्यांना रोजगार उपलब्ध होणार**

चार वर्षांपूर्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशातील कोट्यवधी गरीब आणि गावकऱ्यांच्या जगण्याची आशा निर्माण करण्यासाठी व त्यांना आर्थिकदृष्ट्या समृद्ध करण्यासाठी सहकार मंत्रालयाची स्थापना केली, असे नमूद करून ते म्हणाले, सहकार मंत्रालयाच्या स्थापनेपासून, गेल्या चार वर्षांत, मंत्रालयाने भारतातील सहकार क्षेत्राच्या विकासासाठी, या क्षेत्राला प्रोत्साहन देण्यासाठी आणि एकसमान विकासाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी ६० नवीन उपक्रम हाती घेतले आहेत. सहकार क्षेत्राचा विकास व्हावा, सहकारातून शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढावे आणि सहकार चळवळीत महिला शक्ती आणि युवा वर्गाचा सहभाग वाढावा, यादृष्टीने सहकार चळवळ चिरकाल टिकून राहावी, हे क्षेत्र पारदर्शकता आणि लोकशाहीपूर्ण बनावे या हेतूने सर्व उपक्रम राबवले जात असल्याचे त्यांनी संगितले.

*** विद्यापीठाची पायाभरणी म्हणजे सहकार क्षेत्राला बळकटी –**

त्रिभुवन सहकारी विद्यापीठाची पायाभरणी म्हणजे सहकार क्षेत्राला बळकटी देतांना या क्षेत्रातील सर्व उणिवांची कसर भरून काढण्याच्या वाटचालीतला एक महत्त्वाचा उपक्रम आहे. पंतप्रधान मोदी यांच्या नेतृत्त्वाखाली देशभरातली सहकार चळवळ वेगाने प्रगती करत आहे. विद्यापिठाची पायाभरणी म्हणजे पंतप्रधान मोदी यांच्या नेतृत्वाखाली टाकले गेलेले एक क्रांतिकारी पाऊल आहे. देशभरात ४० लाख कामगार सहकार चळवळीशी जोडले गेले आहेत. ८० लाख जण मंडळांचे सदस्य आहेत आणि ३० कोटी लोक, म्हणजेच देशातील प्रत्येक चौथी व्यक्ती ही सहकार चळवळीशी जोडली गेलेली आहे, ही बाब त्यांनी अधोरेखित केली.

*** विद्यापीठाच्या माध्यमातून प्रशिक्षणाची सुविधा –**

देशात सहकार क्षेत्राच्या विकासाच्या अनुषंगाने, सहकारी संस्थांमधील कर्मचारी आणि सदस्यांना प्रशिक्षण देण्यासाठी कोणतीही व्यवस्था नव्हती. पूर्वी कर्मचाऱ्यांना सहकारी संस्थांमध्ये भरती झाल्यानंतर प्रशिक्षण दिले जात होते. मात्र, आता विद्यापीठाच्या स्थापनेनंतर ज्यांनी प्रशिक्षण घेतले आहे, त्यांनाच नोकरी मिळेल. यामुळे सहकारी संस्थांमधील घराणेशाही संपुष्टात येईल. पारदर्शकता स्थापित होईल आणि त्रिभुवन सहकारी विद्यापीठातून शिक्षण घेणाऱ्यांना नोकऱ्याही मिळतील असे त्यांनी सांगितले.

*** विविध समस्यांची सोडवणूक करता येणे शक्य –**

विद्यापीठात युवक केवळ तांत्रिक कौशल्य, लेखा, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि विपणनाची सर्व आवश्यक वैशिष्ट्येच शिकणार नाहीत. सहकार चळवळीच्या माध्यमातून देशातील दलित, आदिवासी आणि महिलांसाठी असलेल्या सहकार मूल्यांचाही अभ्यास करतील. विद्यापीठामुळे सहकार क्षेत्रातील अनेक समस्या सोडवता येतील. सीबीएसईने इयत्ता ९ वी ते १२ वीच्या अभ्यासक्रमात सहकार हा विषय समाविष्ट केला आहे. गुजरात सरकारनेही अभ्यासक्रमात सहकार विषय समाविष्ट करावा, जेणेकरून सामान्य लोकांनाही सहकाराबाबत माहिती मिळू शकेल, असे त्यांनी सूचित केले.

*** सहकारी संस्थांच्या प्रशिक्षणासाठी अभ्यासक्रम तयार करणार –**

विद्यापीठ संपूर्ण देशभरातील सहकारी संस्थांच्या प्रशिक्षणासाठी एकसंध अभ्यासक्रम तयार करून धोरणे, नवोन्मेष, संशोधन आणि प्रशिक्षणाच्या माध्यमातून सहकारी संस्थांना पुढे नेण्याचे काम करेल. विद्यापीठ प्रतिभावान व्यक्तींना व्यासपीठ उपलब्ध करून देईल आणि सहकाराचे धोरण तयार केले जाईल जे सर्वांसाठी मार्गदर्शक ठरेल हे विद्यापीठ २ लाख नवीन व ८५ हजार जुन्या पीएसीएस (प्राथमिक कृषी पतसंस्थां)च्या माध्यमातून सर्व योजनांची अंमलबजावणी प्रत्यक्षात करण्याचे कामही करेल. विद्यापीठाच्या स्थापनेनंतर सहकारी चळवळ बहरेल, वाढेल आणि भारत संपूर्ण जगात सहकाराचा बालेकिल्ला म्हणून ओळखला जाईल. त्रिभुवन सहकारी विद्यापीठात तयार होणारी धोरणे आणि अभ्यासक्रम सहकाराच्या आर्थिक मॉडेलला एका जनआंदोलनात रूपांतरित करण्याचे कार्य करतील. विद्यापीठ सर्व मोठ्या सहकारी संस्थांसाठी पात्र कर्मचाऱ्यांची पूर्तता करेल. नजीकच्या काळात सहकारी टॅक्सी सेवा सुरू करायची आहे. सहकारी विमा कंपनीही निर्माण करायची आहे. त्यामुळे प्रत्येक क्षेत्रातील विशेष ज्ञान असलेले अधिकारी, कर्मचारी आणि सहकारी नेते आवश्यक आहेत. देशभरातील सहकारी प्रशिक्षण तज्ज्ञांनी विद्यापीठात सहभागी व्हावे व योगदान द्यावे, असे आवाहन त्यांनी केले.




# देशाच्या आर्थिक विकासात सहकारी संस्था, सोसायट्यांचे महत्त्वपूर्ण योगदान - केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा

**आणंद, गुजरात –** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशातील सुमारे ३१ कोटी लोकांशी जोडलेल्या ८ लाख ४० हजारांहून अधिक सहकारी संस्थांमध्ये नवी ऊर्जा मिळाली आहे. दूध उत्पादन ते बँकिंग क्षेत्र, साखर कारखान्यांपासून मार्केटिंग आणि रोख कर्ज ते डिजिटल पेमेंटपर्यंत, सहकारी सोसायट्या देशाच्या आर्थिक विकासात पूर्ण क्षमतेने योगदान देत आहेत, असे केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा यांनी येथे सांगितले.

सहकार मंत्रालयाच्या स्थापनेला ४ वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त तसेच सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५० व्या जयंतीवर्षाच्या निमित्ताने गुजरातमधील आणंदमध्ये आयोजित विशेष कार्यक्रम केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शाह यांच्या उपस्थितीत पार पडला. यावेळी शाह यांनी नव्याने स्थापन झालेल्या सरदार पटेल सहकारी दुग्धव्यवसाय महासंघ या बहुराज्यीय सहकारी संस्थेचे उद्घाटन व या संस्थेच्या बोधचिन्हाचेही अनावरण केले. त्यांनी खेडा इथल्या अमूल चीज प्रकल्पाच्या विस्ताराचे आणि मोगर इथल्या अत्याधुनिक चॉकलेट प्रकल्पाचेही आभासी पद्धतीने उद्घाटन आणि भारतीय राष्ट्रीय सहकारी दुग्ध महासंघाच्या नवीन कार्यालयाच्या इमारतीचे तसेच राष्ट्रीय दुग्ध विकास मंडळाच्या कार्यालय परिसरात असलेल्या मणिबेन पटेल भवनचे उद्घाटन केले.

वैदिक काळापासून देशात सहकार ही सामाजिक परंपरा म्हणून अस्तित्वात आहे, असे नमूद करून ते म्हणाले, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या परंपरेला वैधानिक स्वरूप मिळवून दिले. पंतप्रधान मोदी यांच्या नेतृत्वाखाली सहकार मंत्रालयाने आपल्या स्थापनेनंतरच्या ४ वर्षांत ६० हून अधिक उपक्रम हाती घेतले आहेत, असे त्यांनी सांगितले. हे उपक्रम पाच 'पी'वर आधारित आहेत –

**१. लोक (पिपल)** – देशातील सामान्य लोक हे सर्व उपक्रमांचे लाभार्थी आहेत.

**२. प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्था (पीएसीएस)** – प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्था मजबूत करत आहोत..

**३. व्यासपीठ (प्लॅटफॉर्म)** – प्रत्येक प्रकारच्या सहकारी उपक्रमासाठी डिजिटल तसेच राष्ट्रीय पातळीवरील व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात आले आहे.

**४. धोरण (पॉलिसी)** – सहकारी धोरणाचे उद्दिष्ट सदस्यांना जास्तीत जास्त लाभ मिळवून देणे हे आहे. अगदी मिठाच्या उत्पादनातही नफा, थेट या क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांना मिळणार आहे.

**५. समृद्धी (प्रॉस्पेरिटी)** – या अंतर्गत, गुजरातमधील आमच्या ३६ लाख भगिनी आणि देशाच्या इतर भागातील २० लाख भगिनी दररोज कठोर परिश्रम करत आहेत. यामुळे ८० हजार कोटी रुपयांची वार्षिक उलाढाल होत आहे आणि पुढच्या वर्षी ही उलाढाल १ लाख कोटींच्या वर जाईल या ५६ लाख बहिणींच्या खात्यात हा नफा थेट जमा होत आहे. समृद्धी ही एखाद्या व्यक्तीची नसून संपूर्ण समाजाची असते, समृद्धी ही काही श्रीमंत लोकांची नसून गरीब, कामगार आणि शेतकऱ्यांचीही असते आणि याच विश्वासाने पंतप्रधान मोदी यांनी हे ५० उपक्रम हाती घेतले आहेत, असेही त्यांनी सांगितले.

सरदार पटेल सहकारी दुग्ध महासंघ, दुग्ध क्षेत्रात संघटित बाजारपेठ, इनपुट सेवा, दुधाची योग्य खरेदी, किंमतीतील फरक आणि चक्रीय अर्थव्यवस्थेचे चक्र पूर्ण करण्यासाठी काम करेल, असे शाह म्हणाले. ही संघटना अमूलच्या धर्तीवर, देशातील शेतकऱ्यांना मोठा लाभ मिळवून देईल. कच्छ जिल्हा मीठ सहकारी संस्थेच्या रूपात एक नवीन मॉडेल समिती सुरू करण्यात आली आहे, जी येत्या काळात मीठ उत्पादन करणाऱ्या प्रत्येक कामगारासाठी अमूलसारखी मजबूत सहकारी चळवळ बनेल. अमूल एफएमसीजी ब्रँड हा भारतातीलच नाही तर जगातील सर्वात मजबूत ब्रँड आहे. आंतरराष्ट्रीय सहकार वर्षात सहकार संस्कृतीचा विस्तार करण्याचा संकल्प केला आहे, असे ते म्हणाले.

*** दोन लाख नव्या प्राथमिक कृषी पतसंस्था** – पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली २ लाख नव्या प्राथमिक कृषी पतसंस्था सहकार विद्यापीठ, राष्ट्रीय सहकार माहिती संकलन, धान्य विक्री आणि उत्पादनाशी निगडित तीन राष्ट्रीय स्तरावरील सहकारी संस्था आणि दुग्धोत्पादन क्षेत्रासाठी स्थापन करण्यात येणाऱ्या तीन राष्ट्रीय स्तरावरील सहकारी संस्था, हे सर्व उपक्रम आपल्या देशातील सहकार चळवळीला मोठ्या प्रमाणात बळकटी देणारे आहेत. पारदर्शकता, तंत्रज्ञानाचा स्वीकार आणि सहकारी संस्थांच्या सदस्यांना केंद्रस्थानी ठेवणे, या तीन गोष्टींची अंमलबजावणी या आंतरराष्ट्रीय सहकार वर्षात ताकदीने करावी लागणार आहे. पारदर्शकतेशिवाय सहकार दीर्घकाळ टिकू शकत नाही आणि पारदर्शकतेचा अभाव सहकार्याच्या भावनेला हानी पोहोचवतो, अशी टिप्पणी त्यांनी केली.

*** तंत्रज्ञानाचा स्वीकार आवश्यक** – जेथे तंत्रज्ञानाचा स्वीकार केला जात नाही, त्या स्पर्धेत सहकार टिकू शकत नाही. आणि ज्या सहकारी संस्थांमध्ये सदस्यांचे हित सर्वोपरी मानले जात नाही, त्या संस्था टिकू शकत नाहीत. आंतरराष्ट्रीय सहकार वर्षात, सर्व सहकार नेत्यांनी या तीन गोष्टी त्यांच्या कार्यक्षेत्रात राबवल्या पाहिजे आणि त्या कार्यसंस्कृतीचा भाग बनवल्या पाहिजेत, असे त्यांनी सांगितले.

# सहकार संवाद उपक्रमातून आलेल्या सूचनांनुसार सहकार मंत्रालय काम करेल

**नवी दिल्ली –** सहकार खाते देशातील गरीब, शेतकरी, खेडी आणि पशुधनासाठी काम करणारे मंत्रालय आहे. येत्या काळात गुजरात, मध्य प्रदेश, राजस्थान या तीन राज्यांमध्ये सहकार संवादाचे आयोजन करणार आहे. त्यातून मिळालेल्या सूचनांच्या आधारे सहकार मंत्रालय काम करेल, असे सहकार मंत्री अमित शहा यांनी सांगितले.

आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष २०२५ अंतर्गत आयोजित कार्यक्रमांचा एक भाग म्हणून केंद्रीय गृह आणि सहकारमंत्री अमित शाह यांनी गुजरात, मध्य प्रदेश आणि राजस्थानमधील सहकार क्षेत्राशी संबंधित महिलांसाठी अहमदाबाद येथे 'सहकार संवाद' आयोजित केला होता, त्यावेळी ते बोलत होते.

**※ सहकार क्षेत्रातील महिलांच्या योगदानात वाढ –**

सहकार क्षेत्रात तरुण व्यावसायिक तयार करण्याची मूळ कल्पना त्रिभुवनदास यांची होती. या उद्देशाने हे विद्यापीठ स्थापन करण्यात आले आहे. असे नमूद करून ते म्हणाले, त्रिभुवनदास यांनी खऱ्या अर्थाने सहकाराचा पाया घातला होता, ज्यामुळे गुजरातमधील ३६ लाख महिला व्यवसाय करत आहेत. पॅक्स म्हणजेच प्राथमिक कृषी पतसंस्था, सीएससी, मायक्रो एटीएम, हर घर नल, बँक मित्र आणि सुमारे २५ इतर उपक्रमांशी जोडल्या गेल्या आहेत. पॅक्सच्या उपनियमांमध्ये सुधारणा केल्यानंतर, देशभरातील जिल्हा सहकारी बँकांच्या निरीक्षकांना प्रशिक्षित करण्यात आले आहे. पॅक्सद्वारे महसूल निर्माण व्हायला हवा. जनौषधी केंद्राची सेवा पुरवणाऱ्या पॅक्सने गावातील लोकांमध्ये पुरेशी जनजागृती करून, बाजार भावापेक्षा कमी दरात त्यांच्या केंद्रांवर औषधे उपलब्ध आहेत, याची माहिती द्यावी, असे त्यांनी सांगितले.



**केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ**

मका आणि डाळी पिकविणाऱ्या शेतकऱ्यांनी एनसीसीएफ ॲपवर नोंदणी केली तर नाबार्ड आणि एनसीसीएफ संस्था शेतकऱ्यांकडून किमान हमी भावाने (एमएसपी) मका आणि डाळी खरेदी करू शकतात. तसेच शेतकऱ्याला बाजारात अधिक दर मिळत असेल, तर तो पीक बाजारात विकू शकतो. उंटाच्या दुधाचे औषधी गुणधर्म जाणून घेण्याबाबत संशोधन होत आहे. उंट पालकांना उंटाच्या दुधाला अधिक दर मिळवून देण्यासाठी औषधी गुणधर्मांचा वापर करून राजस्थान आणि गुजरात सरकार लवकरच एकत्र येऊन एक योजना सुरू करतील. उंट पालन व उंटाच्या दुधाचे दर वाढतील, तेव्हा त्यांच्या संवर्धनात फायदा होईल, असे शहा यांनी सांगितले.

## वैकुंठभाई मेहता राष्ट्रीय सहकारी व्यवस्थापन संस्था त्रिभुवन विद्यापीठाशी संलग्न

**पुणे –** येथील वैकुंठभाई मेहता राष्ट्रीय सहकारी व्यवस्थापन संस्थेला गुजरातमधील त्रिभुवन सहकार विद्यापिठाचे संलग्नत्व मिळाले आहे. विद्यापीठाची मान्यता मिळविणारी देशातील ही पहिली सहकारी संस्था असणार आहे, अशी माहिती केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी सांगितली.

त्रिभुवन विद्यापिठाची एक अविभाज्य घटक म्हणून मेहता संस्था काम करणार आहे असे नमूद करून ते म्हणाले, या संस्थेतील चार अभ्यासक्रम विद्यापिठाच्या अंतर्गत चालविण्यात येणार आहेत. चार दीर्घकालीन पदवी आणि सहा अल्पकालीन अभ्यासक्रमाच्या बरोबरीने आधुनिक डिजिटल तंत्रज्ञानाचा सहकार क्षेत्रातील वापर यावरील अभ्यासक्रम असणार आहे.सध्या संस्थेच्या वतीने विविध अभ्यासक्रम सुरू आहेत. त्यामध्ये व्यवसाय प्रशासन पदवी आणि सहकार व्यवसाय व्यवस्थापन हा अभ्यासक्रम सुरू आहे. तसेच या संस्थेला विद्यापिठाची मान्यता मिळाली असल्याने सहकार विषयक पूर्ण शैक्षणिक कामे या संस्थेला करता येणार आहेत. त्याचप्रमाणे सहकार क्षेत्राबाबतच्या संशोधनाला चालना देण्यात येणार आहे. त्यामुळे युवकांना नवे दालन खुले होणार आहे.

देशातील सहकारापासून समृद्धीकडे नेण्यासाठी महत्वाचे पाऊल असणार आहे असे नमूद करून ते म्हणाले, या माध्यमातून सहकार क्षेत्रातील अभ्यासक्रमासाठी एक बळकट राष्ट्रीय शैक्षणिक व्यासपीठ तयार होणार आहे.

## वर्षभरात किमान ७ हजार प्राथमिक सहकारी कृषी पतसंस्था स्थापन करणार

**पुणे –** महाराष्ट्रातील अनेक गावांत अजूनही विकास सोसायटी अथवा अन्य सहकारी संस्थाची पुरेशी उपलब्धता नाही. हे लक्षात घेऊन अशा गावात येत्या वर्षभरात किमान ७ हजार प्राथमिक सहकारी कृषी पतसंस्था स्थापन करण्यात येणार आहेत, अशी माहिती केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी सांगितली.

तसेच अडचणीत असणाऱ्या आणि प्रशासक असलेल्या जिल्हा बँका, सोसायटी यांना राज्य सहकारी बँक आणि नाबार्डकडून अर्थ पुरवठा करण्यास सुरुवात करण्यात आली आहे असे नमूद करुन ते म्हणाले, सहकार क्षेत्रातील विश्वासार्हता टिकवून अधिकाधिक प्रमाणात पारदर्शक कामकाज करण्यावर अधिक भर देण्यात येत आहे. तसेच सहकारी संस्था संगणकीकृत करण्यासाठी प्रयत्न सुरु असून आजवर देशांतील ६८ हजार सहकारी संस्था कामकाज संगणकीकृत करण्यात आले आहे.

सेवा विकास सोसायटी याआधी केवळ कर्ज देण्याचे काम करीत होत्या. परिणामी काही सोसायट्यांचे काम थंडावले होते. अशा सोसायट्यांचे सक्षमीकरण होण्यासाठी ग्रामीण भागात २५ विविध व्यवसाय सुरू करण्यास परवानगी देण्यात आली आहे. त्यामध्ये पेट्रोल पंप, गॅस एजन्सी अशा सेवा आहेत. त्याचप्रमाणे दूध संघ, मत्स्य व्यवसायासारख्या क्षेत्राला सोसायटीचा दर्जा देण्यात येणार आहे, असे त्यांनी सांगितले. देशाची अर्थव्यवस्था अधिक सक्षम आणि बलशाली होण्यासाठी सहकार मंत्रालयाने विशेष प्रयत्न सुरू केले आहे. त्याप्रमाणे देशातील ग्रामीण भागात २ लाख विकास सोसायटी सुरू करण्यात येणार आहेत, असे त्यांनी स्पष्ट केले आहे.

# राष्ट्रीय सहकार धोरणामुळे सहकार क्षेत्राला नवी दिशा

नवी दिल्ली – नुकतेच जाहीर करण्यात आलेले राष्ट्रीय सहकार धोरण यामुळे सहकार क्षेत्राला नवी दिशा मिळणार आहे, असे मत बँकिंग तज्ञ गौतम कोतवाल यांनी व्यक्त केले आहे. ते म्हणाले, देशातील ग्रामीण भागाचा आर्थिक विकास वाढविण्यासाठी खूपच उपयुक्त ठरणार आहे. डिजिटायझेशन, पारदर्शक कार्यप्रणाली, महिला आणि युवकांचा वाढता सहभाग, यामुळे सहकार क्षेत्राला नवसंजीवनी मिळणार आहे. तसेच देशाच्या जीडीपीमध्ये सहकार क्षेत्राचा वाटा वाढणार आहे आणि आर्थिक स्वायत्ततेला चालना मिळणार आहे, असे ते म्हणाले.

# सहकार कायद्यात सुधारणा होण्याची गरज - आरबीआय संचालक सतीश मराठे

## कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्हा सहकार भारती पदाधिकारी शिबिर यशस्वी

**कोल्हापूर –** महाराष्ट्र शासनाने विकसित महाराष्ट्र ध्येय उराशी बाळगून व्हिजन निश्चित करण्याचे ठरवले आहे, यातूनच विकसित भारताच्या दिशेने प्रवास असणार आहे. १५ ऑगस्टपर्यंत दिशा निश्चित होणार आहे. यामध्ये ३०-३५ सहकार संस्थांचे योगदान असणार आहे, असे आरबीआय संचालक आणि सहकार भारतीचे माजी राष्ट्रीय अध्यक्ष सतीश मराठे यांनी सांगितले. तसेच सध्याच्या सहकार कायद्यात सुधारणा होण्याची गरज आहे, असे त्यांनी नमूद केले.




कोल्हापूर जिल्ह्यातील नरसोबावाडी येथे कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्ह्यातील सहकार भारतीच्या पदाधिकाऱ्यांचे दोन दिवसांचे निवासी शिबिर पार पडले. शिबिरात तब्बल १९६ पदाधिकारी उपस्थित होते. कोल्हापूर विभागाचे रा. स्व. संघाचे भगतराम छाबडा, आवाडे बँकेचे अध्यक्ष स्वप्नील आवाडे, सहकार भारतीचे प्रदेश महामंत्री विवेक जुगादे, सागर चौगुले, उद्योजिका व सहकार भारतीच्या प्रदेश महिला प्रमुख वैशाली आवाडे यांच्या हस्ते प्रतिमा पूजन व दीपप्रज्वलन करण्यात आले. शिबिरात १० सत्रे घेण्यात आली. प्रत्येक तज्ञ मार्गदर्शकाला एकेक विषय देण्यात आला होता.

**※ सहकार कायद्यात सुधारणा होण्याची गरज –**

सहकारातून विकसित भारत या विषयावर मराठे म्हणाले की, महाराष्ट्र शासनाने विकसित महाराष्ट्र ध्येय उराशी बाळगून व्हिजन निश्चित करण्याचे ठरवले आहे. यातूनच विकसित भारताच्या दिशेने प्रवास असणार आहे. १५ ऑगस्टपर्यंत दिशा निश्चित होणार आहे. यामध्ये ३०-३५ सहकार संस्थांचे योगदान असणार आहे. देशात साधारणपणे साडे आठ लाख सहकारी संस्था असून ३० ते ३५ कोटी लोक या संस्थांशी जोडले आहेत. त्यामुळे विकसित भारताचे स्वप्न पाहताना सहकाराचे सहकार्य अनिवार्य आहे. सन १९०४ मध्ये सहकार कायदा अस्तित्त्वात आला. त्यात सुधारणा होणे महत्त्वाचे आहे. ज्याप्रमाणे कंपन्यांमध्ये परदेशी गुंतवणूक येते, त्याप्रमाणे सहकार संस्थात परदेशी गुंतवणूक (ऋऊख) येणे महत्त्वाचे आहे. औषध क्षेत्राने जगात आपला दबदबा निर्माण केला आहे. त्याप्रमाणे अन्य क्षेत्रात म्हणजे फळ प्रक्रिया, मासेमारी, दुग्ध प्रक्रिया इत्यादींवर लक्ष दिले पाहिजे. ग्रो प्रक्रिया क्षेत्रात केवळ २० ते २२ टक्के उद्योग आहेत, तेच परदेशात ८० टक्क्यांपर्यंत प्रमाण आहे. तसेच केवळ पतसंस्थांच्या मागे न लागता अन्य संस्था स्थापून उद्योग वाढवले पाहिजेत. विकसित महाराष्ट्र व भारतासाठी हे आवश्यक आहे. यासाठी भांडवल वाढवले पाहिजे, व्यवसाय वाढवले पाहिजेत, ग्राहक भांडार काढून मल्टिपल व्यवसाय केले पाहिजेत. यासाठी सहकार भारतीने मार्गदर्शन करून पुढाकार घेतला पाहिजे, असेही त्यांनी सांगितले.

**※ सहकारातून रोजगार निर्मिती –**

सहकार भारती आज व उद्या या विषयावर मार्गदर्शन करताना जुगादे म्हणाले की सहकारी चळवळीने अनेक उद्योग केले. रोजगार निर्माण केला यातून अनेकांचे संसार समृद्ध झाले. सहकाराला आदर्शवत करण्यासाठी आवश्यक मूल्ये सहकार भारतीने रुजवली आहेत. केंद्रात स्वतंत्र सहकार मंत्रालय झाले आहे. ही सहकार भारतीच्या कामाची फलश्रुती आहे. सहकार भारतीचे काम सर्व घटकापर्यंत पोहोचवावे असे आवाहन केले.

प्रदेश प्रमुख संजय परमणे यांनी चित्रफितीद्वारे सहकार भारती-कार्यक्रम व उपक्रम यांची माहिती सांगितली. यामध्ये संघटनात्मक कार्यक्रम, शिक्षात्मक कार्यक्रम, प्रकल्पात्मक कार्यक्रम, आंदोलनात्मक कार्यक्रम या माहितीचा समावेश होता. तालुक्यात पुढे घेण्यात येणार असणारे कार्यक्रम विचारात घेऊन वार्षिक नियोजन केले पाहिजे, असे त्यांनी सांगितले.

**※ महिला सक्षमीकरणावर भर हवा –**

तिसऱ्या सत्रात वैशाली आवाडे यांनी मार्केटिंग यावर विषयावर माहिती दिली. त्या म्हणाल्या, सध्या जाहिरातीचे युग आहे. त्यामुळे आवश्यकतेनुसार जाहिरात केली पाहिजे. आपण ज्या क्षेत्रात उतरणार आहोत, त्याची ग्राहकांना गरज आहे का? याचा आवश्यक विचार करायला हवा. सहकार भारतीने छोट्या उद्योजकांना उद्योग सुरू करण्यासाठी मार्गदर्शन केले पाहिजे. यासाठी सरकारी योजनांचा फायदा घेतला पाहिजे.

पुढील पानावर...



# कर्तबगार व कर्तृत्त्ववान कर्मचारी बँकांबरोबर राहण्यासाठी नवनवीन उपक्रम राबवावेत - शरद गांगल यांची अपेक्षा

**सांगली** - सहकारी बँकामध्ये मनुष्यबळाचे महत्व आणि उपयोगिता वाढली असून सहकारी बँकांचे फक्त फायनान्शियल ऑडिट होत नाही तर त्यांचे सोशल ऑडीटही होत असते. याचा बँकांनी गांभीर्याने विचार करायला हवा असे सहकार भारती भारती बँक प्रकोष्ठप्रमुख व ठाणे जनता सहकारी बँकेचे अध्यक्ष शरद गांगल यांनी सांगितले.



सहकार भारती सांगली महानगर शाखा, सांगली अर्बन को-ऑप. बँक जिल्हा अर्बन बँक असोसिएशन, गुरुवर्य लक्ष्मणराव इनामदार सहकार प्रशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय सहकार दिनानिमित्त येथे अर्बन बँकांचे अध्यक्ष, संचालक, मुख्य कार्यकारी अधिकारी, सरव्यवस्थापक यांच्यासाठी कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. पहिल्या सत्रात बँकिंग क्षेत्रातील नेतृत्वासमोरील आव्हाने या विषयावर गांगल यांनी मार्गदर्शन केले.

सहकारी बँकामध्ये मनुष्यबळाचे महत्त्व आणि उपयोगिता वाढली असून सहकारी बँकांचे फक्त फायनान्शियल ऑडिट होत नाही तर त्यांचे सोशल ऑडिटही होत असते. कर्मचारी वर्गाच्या योगदानामुळे बँकिंग सेवेचा विस्तार होत असतो. त्यामुळे कर्तबगार आणि कर्तृत्त्ववान कर्मचारी बँकांबरोबर राहण्यासाठी सातत्याने प्रोत्साहनपर नवनवीन उपक्रम राबविले पाहिजेत. कर्मचाऱ्यांना सातत्याने प्रशिक्षणाची आवश्यकता असते ते पूर्ण केले पाहिजे. कर्मचारी प्रशिक्षणावर होणारा खर्च हा खर्च नसून ती गुंतवणूक आहे, असेही ते म्हणाले.

सहकारी बँका रिलेशनशिप मॅनेजमेंटवर टिकून आहेत. यासाठी त्या ठिकाणचा सेवकवर्ग दीर्घकाळ टिकून राहण्यासाठी विशेष प्रयत्न होणे आवश्यक आहे. बँकेच्या अध्यक्षांनी वारंवार किंवा रोजच बँकेकडे जाणे आवश्यक नाही. सीईओंवर जबाबदारी टाकली पाहिजे. त्याचबरोबर, दोन टर्म्सची मर्यादा असल्यामुळे पुढचे संचालक कोण असतील याचाही विचार करून ठेवणे गरजेचे आहे, असे ते म्हणाले.

बोर्ड ऑफ अ‍ॅपरेंटीसशीप ट्रेनिंग(मुंबई)चे डेप्युटी डायरेक्टर डॉ. एन. एन. वडोदे यांनी अ‍ॅपरेंटीसशीप स्कीम व त्यांचे बँकांना फायदे यावर मार्गदर्शन केले. गुरूवर्य लक्ष्मणराव इनामदार सहकार प्रशिक्षण केंद्राचे समन्वयक डॉ. राजन पडवळ व रीसोन्स सोल्यूशन्सचे विवेक सिनारे यांनीही मनोगत व्यक्त केले.

प्रास्ताविक शिवाजी विद्यापीठ अधिसभा सदस्य आणि सहकार भारतीचे प्रदेश संपर्क प्रमुख संजय परमणे यांनी केले. वक्त्यांचा परिचय सहकार भारतीचे महानगर संघटन प्रमुख संदीप कुलकर्णी आणि प्रचार प्रमुख अवधूत ठोके यांनी करून दिला. सूत्रसंचालन महामंत्री शैलेश पवार यांनी केले. आभार सहकार भारतीचे महानगर बँक प्रकोष्ठ प्रमुख आणि सांगली अर्बन बँकेचे संचालक सागर घोंगडे यांनी मानले.

सांगली अर्बन बँकेचे अध्यक्ष गणेश गाडगीळ, राजारामबापू सहकारी बँकेचे अध्यक्ष विजय यादव, माजी अध्यक्ष प्रा. श्यामराव पाटील, अमरसिंह देशमुख, सहकार भारतीचे महानगर अध्यक्ष शशिकांत राजोबा, महेश्वर हिंगमिरे, सांगली अर्बन बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी उल्हास नायक व संचालक मंडळ यांचेसह जिल्ह्यातील अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकांचे अध्यक्ष, संचालक सीईओ एमडी उपस्थित होते.

मागील पानावरून....

## सहकार कायद्यात सुधारणा होण्याची गरज....

आज केवळ २५ टक्के योजनांचा फायदा घेतला जातो. सहकाराच्या माध्यमातून महिला सक्षमीकरण करणे महत्त्वाचे असून त्या माध्यमातून त्यांच्या उत्पादनांना बाजारपेठ मिळवून दिली पाहिजे.

प्रदेश कार्यालय प्रमुख श्रीकांत पटवर्धन यांनी प्रशिक्षण यावर प्रबोधन केले. शिक्षण व प्रशिक्षण यामधील फरक सांगून कार्यकर्ता प्रशिक्षित असावा, यावर जोर दिला. औदुंबर नाईक यांनी कोष कसा जमा करावा व कोणत्या मार्गाने मिळवावा, त्याचा विनियोग यावर मार्गदर्शन केले. सत्राचे अध्यक्षस्थान सांगली जिल्हा अध्यक्ष सुमंत महाजन, महामंत्री भारत निकम यांनी भूषविले. यावेळी गटवार चर्चा आयोजित करण्यात आली. त्यामध्ये विभागाचे प्रमुख चंद्रकांत धुळप, चंद्रकांत धुळासावंत, प्रविण बुलाख, संजय परमणे, औदुंबर नाईक, वैशाली आवाडे, सागर चौगुले व जवाहर छाबडा यांनी भाग घेऊन कार्यकर्त्यांच्या शंकाचे निरसन करून मार्गदर्शन केले. सागर चौगुले यांनी कार्यकर्ता व कार्यपद्धती सांगितले.

**※ अभ्यास वर्गात तीन जिल्हे सहभागी -**

अभ्यासवर्गाचा समारोप करताना प्रदेश संघटन मंत्री शरद जाधव म्हणाले की, या अभ्यास वर्गात २६ तालुक्यातील १९६ कार्यकर्ते सहभागी झाले. या कार्यकर्त्यांनी जिल्ह्यात, तालुक्यात जाऊन काम केले पाहिजे. दर महिन्याची दिवसभराची चिंतन बैठक घेऊन काम वाढवले पाहिजे. अभ्यासवर्गाला सातारा, सांगली व कोल्हापूर जिल्ह्याचे अध्यक्ष सर्वश्री रवींद्र भोसले, सुमंत महाजन, शशिकांत राजोबा, अरविंद मजलेकर, महामंत्री सर्वश्री शैलेश ढवळीकर, भारत निकम, शैलेश पवार, सांगली महिला प्रमुख सारीका मुळे उपस्थित होते. सूत्रसंचलन सारीका मुळे, श्रुती जोशी, सातारा सहसंघटन प्रमुख गणेश डुबल, संजय सातपुते, सागर हुपरे, शशिकांत कोडणीकर, चंद्रकांत धुळासावंत यांनी केले. अभ्यासवर्ग यशस्वी करण्यासाठी अभ्यासवर्ग प्रमुख सागर चौगुले यांच्यासह शरदचंद्र दिवाण, अरुण भबिर, बाळासाहेब टाणे, भारत निकम, महावीर मगदुम, सागर दानोळे यांनी परिश्रम केले.

## पतसंस्थांच्या थकित कर्ज वसुलीसाठी अधिकाऱ्यांची नियुक्ती



दिलीप पतंगे

**सोलापूर** - पतसंस्थांची थकित असणाऱ्या कर्जाच्या वसुलीस गती येणार असून यासाठी जिल्हा उपनिबंधक कार्यालयाकडून १६ अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. यासाठी जिल्हा सहकारी पतसंस्था महासंघाच्या वतीने सातत्याने पाठपुरावा करण्यात आला होता, अशी माहिती महासंघ अध्यक्ष दिलीप पतंगे यांनी सांगितली. सोलापूर जिल्ह्यात जवळपास एक हजार सहकारी पतसंस्था कार्यरत आहेत. पतसंस्थांचे कामकाज अधिक गतिमान होण्यासाठी आणि थकित कर्जवसुलीस गती यावी, यासाठी महासंघाच्या वतीने पाठपुरावा करण्यात येत होता. या मागणीला सकारात्मक प्रतिसाद मिळाला आहे, असे त्यांनी सांगितले.

# सहकार सप्ताहानिमित्त पतसंस्थांच्या कार्यक्रमांचे आयोजन यशस्वी



**यवतमाळ** – जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था व शहरातील नागरी सहकारी पतसंस्थांच्या सहकार्याने सहकार सप्ताहानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. मातोश्री वृद्धाश्रम येथील वृद्धांना भेटवस्तूचे वाटप करण्यात आले. संस्कृती संवर्धक मंडळाचे कोषाध्यक्ष अभय चोपडे यांनी संस्थेची माहिती सांगितली.

नागरी पतसंस्थांच्या सहकार्याने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था नाना चव्हाण, सहाय्यक निबंधक रिता निनावे, अजित डेहणकर, मुकुंद मेश्राम, विलास हिरुडकर, ओंकार पहुरकर, कैलास कटारे, गणेश राठोड सहकार क्षेत्रातील विविध संस्थांचे पदाधिकारी अजय मुंधडा, अमित भिसे, यशवंत पाटील, अनिल दंडे, अमोल बोदडे, अजय दंडे, राम साकळे, अनुराग कुळसंगे, आशिष भिसे, अतुल महाजन, राकेश मिश्रा, कवडू नगराळे, संदीप मेहता, संतोष उडाखे, संतोष गावंडे, मनीषा जगताप यांच्यासह विविध पतसंस्थेचे प्रतिनिधी उपस्थित होते.

# धुळे नंदुरबार महसूल कर्मचारी पतसंस्थांकडून गुणवंतांचा सन्मान




**नंदुरबार** – धुळे व नंदुरबार जिल्हा महसूल कर्मचारी सहकारी पतसंस्थेची ४७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात पार पडली. संचालक मंडळाच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष हिरालाल गुले होते.

उपसभापती श्रीकांत देसले, सचिव सुभाष बाविस्कर तसेच संचालक मंडळातील संजय शिंदे, महारु पाटील, सच्चिदानंद वळवी, उत्तम वाघ, लोटन धनगर, संतोष चौधरी, रवींद्र कानडे, दीपक महाले, संचालिका श्रीमती माया बिऱ्हाडे, श्रीमती बसंती पाडवी, स्वीकृत संचालक कैलास कंखरे व राजेश घोलप तसेच संस्थेचे व्यवस्थापक मुकेश सूर्यवंशी व शेख उपस्थित होते. प्रास्ताविक श्रीकांत देसले यांनी व सूत्रसंचालन सुभाष बाविस्कर यांनी केले. सभासदांच्या गुणवंत पाल्यांचा सत्कार करण्यात आला.

# आंतरराष्ट्रीय सहकार वर्षानिमित्त सहकार भारतीची संपर्क बैठक संपन्न

**यवतमाळ** – आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष तसेच आंतरराष्ट्रीय सहकार दिनानिमित्त आर्णी येथे संपर्क बैठक आयोजित करण्यात आली होती. बैठकीचे आयोजन अतुल वाकोडे आणि माधव सुर्वे यांनी केले. विविध संस्थेचे पदाधिकारी व कर्मचारी या सर्वांचा सत्कार करण्यात आला.

सहकार क्षेत्रात संस्कार हा सर्वात महत्त्वाचा अंग असून सहकारात काम करणारी व्यक्ती ही संस्कारित असली पाहिजे. हे काम सातत्याने सहकार भारती करीत आहे. हाच धागा पकडून राम साकळे जिल्हा महामंत्री राम साकळे यांनी सहकार भारतीची रचना आणि उद्देश समजावून सांगितले. श्याम लोखंडे, जिल्हा सहकार भारती अध्यक्ष श्याम लोखंडे, यांनी संघटित राहून सहकार कसा साकारता येतो, याचे महत्त्व पटवून दिले. प्रास्ताविक सहकार सुगंध मासिकाचे विदर्भ विभाग प्रमुख संतोष गावंडे यांनी तर आभार अतुल वाकोडे यांनी मानले.

अतुल वाकोडे (अध्यक्ष, अद्विता अर्बन क्रेडिट को. सोसायटी), माधव सुर्वे (अरुणवती नागरी सहकारी पतसंस्था), राजू वाघमारे (पिओसिट सॉफ्टवेअर), चव्हाण सर, सहव्यवस्थापक, प्रथमेश तुनकेवार, शेख राजिक, शेख दाऊद, उमेश लडके, पल्लवी भलगे, सोनिया तगाले, फरीनजहा युसुफ शहा आणि विविध संस्थेचे कर्मचारी उपस्थित होते.

# आंतरराष्ट्रीय सहकार वर्षाच्या निमित्ताने सहकार संवाद कार्यक्रमाचे आयोजन

**चंद्रपूर** – आंतरराष्ट्रीय सहकार वर्षाच्या निमित्ताने जिल्हा सहकार भारतीच्या वतीने सहकारी संस्थांच्या पदाधिकारी आणि संचालक यांच्यासाठी सहकार संवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

सहकार भारतीचे महामंत्री विवेक जुगादे, प्रदेश सचिव विनोद भीमनवार, नागपूर विभाग प्रमुख संजय रोकडे, सहविभाग प्रमुख विजय गोटे, जिल्हा अध्यक्ष सतीश दासमवार, महामंत्री पुष्पा गोटे आदी यावेळी उपस्थित होते.

# अकोला - वाशिम जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेला उत्कृष्ट बँक पुरस्कार प्रदान

**अकोला** – अकोला वाशिम जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेला अमरावती विभागातून उत्कृष्ट जिल्हा बँक पुरस्काराने नुकतेच गौरविण्यात आले आहे. नाबार्डच्या ४४ व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या एका समारंभात केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. यावेळी राज्याचे सहकार, पणन, वस्त्रोद्योग विभाग प्रधान सचिव प्रवीण दराडे उपस्थित होते.


# अरविंदराव भिडे - एक निग्रही कार्यकर्ता...!

सन १९८७, नुकताच सहकार भारतीच्या कार्यालयात रुजू झालो होतो. एक दिवस सतीश मराठे यांनी एक पत्र लिहायला सांगितलं आणि अरविंदराव भिडे यांना कॅनरा बँकेच्या मुंबईच्या ऑफिसमध्ये भेटायला सांगितलं. त्याप्रमाणे गेलो, प्रथम दर्शनी कडक शिस्तीचे अरविंदराव शांत, परंतु निग्रही स्वभावाचे असावेत अशी भावना झाली.




**सहकार भारतीचे ज्येष्ठ कार्यकर्ते, शांत, निग्रही स्वभावाचे सामाजिक बांधीलकीची जाणीव ठेवून कार्यरत असणारे अरविंदराव भिडे यांचे नुकतेच निधन झाले. त्यांच्या विषयीच्या भावना व्यक्त करणारा हा श्रद्धांजलीपर लेख...**

अरविंदराव मुळचे रायगड जिल्ह्यातील पालीचे. सन १९३९ सालचा त्यांचा जन्म. वयाच्या ११ व्या वर्षी ते शिक्षणासाठी मुंबईत आले. पोद्दार व रुपारेल कॉलेजमधून त्यांनी बी.कॉम. तसेच बी.ए. पदवी मिळवली. मैदानी खेळ, कुस्ती, व्यायामाची आवड होती. अनेक स्पर्धांमध्ये त्यांनी बक्षिसे मिळविली. एक हजार सूर्यनमस्कार घालण्याच्या स्पर्धेतही त्यांनी बक्षिस मिळविले. मुंबईत आल्यावर त्यांचा संघ कामाशी संपर्क आला. तो शेवटपर्यंत राहीला. काही काळ त्यांनी जनसंघाचेही काम केले. गृहिणी असलेल्या आशा वहिनीच्या भक्कम पाठिंब्यामुळे अनेक सामाजिक कामात सक्रिय सहभाग घेता आला. तरूणांनी उद्योजकतेकडे वळले पाहिजे, असा त्यांचा आग्रह असे. अतुल आणि आल्हाद या आपल्या दोन्ही मुलांना त्यांनी व्यवसाय करण्यास प्रोत्साहित केले.



अरविंदराव मालाड येथे राहत असत. एका मित्राला बँकेकडून कर्ज मिळत नव्हते. म्हणून शरदराव साठे, डॉ. वाकणकर अशा ५-६ समवयस्क मित्रांना बरोबर घेऊन अरविंदरावांनी सहकारी पतसंस्थेची स्थापना केली. त्याचे कार्यालयीन कामकाज राहत्या घरातूनच सुरू केले. पतसंस्थेचे रुपांतर मालाड सहकारी बँकेत झाले. अरविंदराव त्या बँकेचे संस्थापक संचालक होते. एक नावाजलेली बँक म्हणून ती बँक ओळखली जाते. मालाडमध्ये त्यांनी हमालांची सहकारी पतसंस्था स्थापन करण्यास प्रोत्साहन दिले.

सहकार भारतीच्या महाराष्ट्र प्रदेश कार्यकारणीच्या पुनर्रचनेचे काम सुरू होते. अरविंदरावांनी प्रदेश कार्यकारणीवर सह-कोषाध्यक्ष म्हणून काम करावे, अशी विनंती करणारे पत्र होते. सतीश मराठे यांच्या आग्रहाप्रमाणे त्यांनी सहकार भारतीचे सह-कोषाध्यक्ष पद स्वीकारले. त्यांच्यातल्या निग्रहाची, आर्थिक शिस्तीची ओळख होऊ लागली. सहकार भारतीची स्थापना झाल्यावर कार्यालयीन व्यवस्था नीटशी लागली नव्हती. त्यामुळे अरविंदरावांना अपेक्षित असलेल्या आर्थिक शिस्तीची वानवा होती. हिशेबात कोणतेही गैरव्यवहार किंवा गैरप्रकार नव्हते. परंतु त्याचे व्यवस्थित लिखाण, लेखापरीक्षण याची त्रुटी होती.

नुकतीच हृदय शस्त्रक्रिया झाल्यामुळे कॅनरा बँकेतून ते स्वेच्छा निवृत्ती घेतली होती व ते घाटकोपरला राहायला आले ठिकठिकाणची सहकार भारतीची पासबुकं गोळा करायची. खतावणी, लेजर लिहायचं, ट्रायल बॅलन्स, जमा खर्च खाते, बॅलन्स शीट तयार करायची. असे काम सुरू झालं. त्यांच्या मार्गदर्शनाप्रमाणे आठवड्यातून दोन-तीन वेळा प्रत्यक्ष भेट घ्यायची आणि वर्षा-वर्षांचे हिशेब पूर्णत्त्वास न्यायचे, अशा पद्धतीने बारा वर्षांचे हिशेब पूर्ण केले. हिशेब पूर्ण करण्याची ही प्रक्रिया खूप शिकण्यासारखी आणि आनंददायी होती. बॅलन्स शीट टॅली झाली की हिशेब पूर्ण. एकदा एका वर्षाचे हिशेब पूर्ण होईनात, सारखा फरक लागत होता, सगळ्या बाजूने तपासलं तरी फरक सापडेना रात्रीचे साडेआठ झालेले, अरविंदराव म्हणाले, आज बॅलन्स शीट तयार झाल्याशिवाय तू घरी जायचं नाहीस''आणि वहिनींना सांगितलं, आज उदय आपल्याकडे जेवेल. हाती घेतलेले काम पूर्णत्त्वास गेलेच पाहिजे, हा ध्यास यातून दिसला. हिशेब पूर्ण झाल्यावर त्याचे लेखापरिक्षण करण्यासाठी लेखापरिक्षक व ठाणे जनता सहकारी बँकेचे संचालक केळकर यांच्याकडे गेलो. तेथे भिडे म्हणाले, आम्ही हिशेब पूर्ण करायला उशीर लावलाय पण तुम्ही लेखा परिक्षणाला वेळ लाऊ नका.

अरविंदरावांनी जनकल्याण सहकारी बँकेत उपसरव्यवस्थापक म्हणून काम केलं. त्याचप्रमाणे डोंबिवली नगरी सहकारी बँकेतही उपसरव्यवस्थापक व प्रभारी सरव्यवस्थापक म्हणून काम केलं. वेळेबाबतची शिस्त, कामकाजातील काटेकोरपणा याबाबत कधीही तडजोड केली नाही. एका बँकेत एक कर्ज प्रस्ताव चर्चेला होता, कागदपत्रात काही त्रुटी होत्या. हे कर्ज प्रकरण मंजूर करण्यास तयार नव्हते. संचालक मंडळातील एका संचालकांचा हे कर्ज मंजूर करावे असा आग्रह होता. त्या व्यक्तीला कोणतीही बँक कर्ज देईल असे त्यांचे म्हणणे होते. हे ऐकल्यावर भिडे यांचा संयम संपला, कर्ज प्रकरणाच्या कागद हातात घेतले. त्या संचालकांसमोर ती ठेवली, कागदपत्रांवर कोणती बँक कर्ज देते, सहकारी बँकांमध्ये एवढा निडरपणा दाखवणारे अधिकारी वानगीदाखलच असतील. सहकारी बँकांबरोबरच अरविंदरावांनी अनुभव लहान सहकारी बँकांसाठीही उपयोगात आणला. महिला सहकारी बँक आर्थिक अडचणीत आली होती. त्यावेळी अरविंदरावांनी प्रत्यक्ष भिलई येथे राहून, बँकेचे कामकाज रुळावर आणण्यात भूमिका बजावली.

संघ काम करणाऱ्या कार्यकर्त्यांबाबत त्यांना आस्था होती. एकदा एका कार्यकर्त्याची एका बँकेत नोकरीसाठी निवड झाली होती. परंतु नियुक्ती पत्र नव्हते, हे अरविंदरावांना माहीत होते. नियुक्तीपत्र मिळण्यास विलंब होत आहे, हे त्यांच्या लक्षात आले. त्यांनी त्या कार्यकर्त्याला विचारले, काही अडचण आहे का? त्या बँकेच्या संबंधितांशी बोलू का? कार्यकर्त्यांची अडचण दूर करणे, त्यांच्यावर अन्याय होऊ न देणे, हे प्रथम कर्तव्य आहे, असे प्रत्यक्ष वागणूकीतून दाखवून देणारे अरविंदराव.

वयाच्या ६५ व्या वर्षांपासून साधारणत: ८१ वर्षांपर्यंत ते रेल्वे, एस.टी., टमटम प्रसंगी चालत प्रवास करून, साक्षर करण्यासाठी, प्राथमिक स्वच्छतेचे धडे देण्यासाठी आदिवासी पाड्यांवर ते जात असत. बचत गटाच्या माध्यमातून महिलांना स्वयंरोजगार मिळावा यासाठीही प्रयत्नशील असत. त्यासाठी काही सहकाऱ्यांना समवेत घेऊन एक कंपनीही स्थापन केली. काही जणांच्या निष्क्रियतेमुळे, असहकार्यामुळे व अयोग्य वागणुकीमुळे त्यांचा प्रयत्न असफल झाला. सामाजिक उपयुक्तता म्हणून, त्यांनी विवाह मंडळ चालवले.

सहकारी क्षेत्रात त्यांनी केलेल्या कामाची दखल घेऊन डोंबिवली नागरी सहकारी बँकेने त्यांचा ''सहकार मित्र'' पुरस्कार देऊन गौरव केला होता. पुरस्कार म्हणून मिळालेली रक्कमही त्यांनी सामाजिक संस्थांना देणगी म्हणून प्रदान केली. नि:स्वार्थी, शांत, निग्रही आणि कामाबाबत कडक शिस्त बाळगणारे अरविंदराव आता आपल्यात नाहीत. त्यांचे हे गुण अंगी बाळगणे व ते अंमलात आणणे, हीच त्यांना श्रद्धांजली ठरेल.

**- उदय पेंडसे ९८६९० ३४६६२** ***

# सहकार भारती पुणे जिल्हाध्यक्षपदी विनायक तांबे यांची निवड




**पुणे –** सहकार भारती पुणे जिल्हाध्यक्षपदी विनायक तांबे यांची निवड करण्यात आली आहे, असे सहकार भारतीचे पुणे विभागप्रमुख गिरीश भवाळकर यांनी जाहीर केले आहे. महामंत्रीपदी उत्तम फाळके, संघटन प्रमुख नितिन कुलकर्णी, सहसंघटन प्रमुख बाळासाहेब गावडे, महिला प्रमुख प्रतिभा कांचन यांची निवड करण्यात आली आहे. तसेच साखर कारखाना प्रकोष्ट प्रमुख भाऊसाहेब आवळे, सहप्रकोष्टप्रमुख अनंत निकम, दूध प्रकोष्टप्रमुख एम. ताकवणे, सहप्रमुख उदय आचार्य, पतसंस्था प्रकोष्टप्रमुख विनोद अष्टूल यांची निवड झाली आहे. तसेच कार्यकारिणी सदस्यपदी संजय वरुडे यांची निवड करण्यात आली आहे. सहकार भारतीचा अभ्यासवर्ग आळंदी येथे झाला. दोन दिवसाच्या प्रशिक्षण वर्गामध्ये कार्यक्रम आयोजित केलेला होता. यामध्ये एकूण ८ सत्र दोन दिवसात झाली.




**सत्र १:–** संघटनात्मक रचना व पदाधिकारी जबाबदारी या सत्रात विनय खटावकर केंद्रीय पदाधिकारी सहकार भारती यांनी मार्गदर्शन केले. सहकार भारतीची राष्ट्रीय कार्यकारिणी, क्षेत्र कार्यकारणी, तसेच विभाग आणि जिल्हा, तालुका स्तरावरील संघटना कशा प्रकारे आहे. त्यांची कामे कशा प्रकारे आहेत, याबाबत मार्गदर्शन केले. **सत्र २:–** राष्ट्रीय स्वयंसेवक संघ शताब्दी वर्ष पंचपरिवर्तन या क्षेत्रामध्ये मकरंद ढवळे यांनी मार्गदर्शन केले. संघ स्थापनेला १०० वर्षे पूर्ण होत असल्याने संघाकडून शताब्दी वर्षानिमित्त पंचसूत्री कार्यक्रम करत आहेत. स्व-बोध, पर्यावरण संवर्धन, कुटुंब प्रबोधन, समरसता, नागरिक कर्तव्य अशा पंचसूत्री याबाबत वक्त्यांनी माहिती सांगितली. **सत्र ३:–** सहकार भारती काल आज व उद्या सत्रामध्ये महामंत्री विवेक जुगादे यांनी मार्गदर्शन केले. सहकार भारतीची स्थापना सहकार भारतीचे सद्यस्थितीत चालू असलेले कार्य आणि सहकार भारती कडून भविष्यात होणारे कामे याबाबत माहिती सांगितली.

**सत्र ४:–** कोष व्यवस्था बँक खाते व जबाबदारी याबाबत औदुंबर नाईक सहकोष प्रमुख महाराष्ट्र प्रदेश यांनी माहिती सांगितली.

**सत्र ५:–** प्रचार प्रसार संपर्क बैठक व प्रवास या विषयावर सह संघटन प्रमुख प्रवीण बुलाख महाराष्ट्र प्रदेश यांनी माहिती सांगितली. **सत्र ६ :–** कार्यपद्धती व कार्यक्रम/उपक्रम या विषयावर संपर्कप्रमुख संजय परमणे महाराष्ट्र प्रदेश यांनी माहिती सांगितली. **सत्र ७:–** मुक्तचिंतन व्यवस्था परिचय – गिरीश भवाळकर, संजय परमणे, प्रवीण बुलाख यांनी प्रशिक्षणार्थींनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे दिली.

**सत्र ८:–** कार्यकर्ता विकास व निर्माण व समारोप या सत्रांमध्ये सहकार सुगंध मासिकाचे संपादक आणि केंद्रीय पदाधिकारी भालचंद्र कुलकर्णी यांनी मार्गदर्शन केले. सहकार भारती सहकार क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या वेगवेगळ्या सहकारी संस्थांचे संघटन करण्याचे काम करत आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ शताब्दी पंचसूत्रीचा सहकार भारतीमध्ये वापर कशाप्रकारे करायचा याबाबत माहिती सांगितली. दोन दिवसीय अभ्यासवर्गाची व्यवस्था करणाऱ्या कार्यकर्त्यांचा सत्कार करण्यात आला.

# राष्ट्रीय पातळीवरील सर्वोत्कृष्ट साखर कारखाना पुरस्कार 'अजिंक्यताराला' प्रदान

**सातारा –** येथील अजिंक्यतारा सहकारी साखर कारखान्याला देश पातळीवरील भारतीय शुगर्स संस्थेचा सर्वोत्कृष्ट साखर कारखाना हा राष्ट्रीय पातळीवरील प्रथम क्रमांकाचा पुरस्कार नुकताच प्रदान करण्यात आला आहे. कोल्हापूर येथील सोहळ्यात नॅशनल फेडरेशन ऑफ को-ऑपरेटिव्ह शुगर फॅक्टरीज अध्यक्ष हर्षवर्धन पाटील आणि भारतीय शुगरचे अध्यक्ष विक्रमसिंह शिंदे यांच्या हस्ते रोख बक्षीस १ लाख रुपये, चषक आणि प्रमाणपत्र प्रदान करून गौरविण्यात आले.




पुरस्काराबद्दल कारखान्याचे कार्यकारी संचालक आणि राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले, कारखान्याचे अध्यक्ष उपाध्यक्ष, संचालक मंडळ यांचे अनेकांनी अभिनंदन केले. कारखान्याचे कार्यकारी संचालक जिवाजी मोहिते यांनी सांगितले की, कारखान्याने सुरुवातीपासूनच शेतकऱ्यांचे हित जोपासले आहे. शेतकऱ्यांना उसाचे पेमेंट वेळेत अदा करण्याची परंपरा राखलेली आहे. कारखान्याला आजवर राज्य व राष्ट्रीय पातळीवरील ३० पुरस्कार मिळाले आहेत.




# सहकारी पतसंस्थांत कर्मचारी, अधिकारी व संचालकांना प्रशिक्षणाची गरज

**सांगली शिराळा** – सहकारी पतसंस्थांत कर्मचारी, अधिकारी व संचालकांना निरंतरपणे प्रशिक्षण देणे काळाची गरज आहे, असे जिल्हा उपनिबंधक सुनील चव्हाण यांनी सांगितले. आंतरराष्ट्रीय सहकार दिनानिमित्ताने आयोजित कार्यक्रमात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. प्रमुख वक्ते म्हणून डॉ. राजन पडवळ, सी. ए. अमित शिंत्रे, विवेक सिनारे होते.

सहायक निबंधक संभाजी पाटील, उपनिबंधक अजिंक्य इंगवले होते. अध्यक्षस्थानी सहकार भारतीचे प्रदेश संपर्क प्रमुख संजय परमणे होते. श्री दत्त नागरी पतसंस्था गुरूवर्य लक्ष्मणराव इनामदार सहकार प्रशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर व सहकार भारती सांगली जिल्हा यांच्या संयुक्त विद्यमाने हे प्रशिक्षण शिबीर घेण्यात आले होते.

श्री दत्त प्रतिमा, छत्रपती शिवाजी महाराज, स्व.लक्ष्मणराव इनामदार पूजन आणि दीपप्रज्वलन करण्यात आले. पतसंस्थेचे संस्थापक प्राचार्य डॉ. पी. बी. कुलकर्णी यांनी स्वागत व प्रास्ताविक करून सहकार चळवळीची स्थापना व व्याप्तीचा आढावा घेतला. स्व. लक्ष्मणराव इनामदार सहकार प्रशिक्षण केंद्र समन्वयक प्रा. डॉ. राजन पडवळ म्हणाले की, श्री दत्त नागरी पतसंस्थेचे काम आम्ही जवळून पाहिले आहे. कामाबरोबर इतर पतसंस्थांचे काम व्हावे ही तळमळ चांगली आहे. त्यांनी दोन तालुक्यातील प्रशिक्षण घेऊन चांगला उद्देश कामातून स्पष्ट केला आहे. नजीकच्या काळात शिवाजी विद्यापीठ, श्री दत्त पतसंस्था व सहकार भारती असे एकत्र जिल्ह्यांतील संस्थांना प्रशिक्षण देऊ या. यासाठी विद्यापीठ व दत्त संस्था यांच्यात लवकरच सामंजस्य करार करता येईल.

जिल्हा उपनिबंधक चव्हाण म्हणाले की, पतसंस्थेचे काम जवळून पाहिले आहे. आज त्यांनी हे प्रशिक्षण घेऊन त्याचे महत्व अधोरेखित केले आहे. त्यांनी सर्व जिल्ह्यातील सर्व पतसंस्था, बँकेत असे प्रशिक्षण आयोजित करावे असे सुचवले. अध्यक्षस्थावरून बोलताना परमणे म्हणाले, सहकार दिनी तीनही संस्थांनी मिळून चांगले प्रशिक्षण आयोजित केले आहे. स्व. लक्ष्मणराव इनामदार प्रशिक्षण केंद्र सांगली जिल्ह्यात सुरू करण्यात श्री दत्त नागरी पतसंस्थेची भागीदारी महत्वपूर्ण आहे, असे ते म्हणाले.

प्रा. डॉ. राजन पडवळ यांनी स्ट्रॅटेजिक मॅनेजमेंट या विषयावर, सनदी लेखापाल अमित शिंत्रे यांनी आयकर कायदा व पतसंस्था समोरील अडचणी यावर तर विवेक सिनारे यांनी केंद्र शासनाची अप्रेंटीशीप योजना पतसंस्थेसाठी कशी लाभदायक आहे, यावर माहिती सांगितली. अध्यक्ष प्रा. डॉ. श्रीकांत चव्हाण, उपाध्यक्ष बी. टी. निकम, सहकार भारती जिल्हाध्यक्ष सुमंत महाजन, विभागीय अध्यक्ष चंद्रकांत धुळप, संचालक सर्वश्री दिनेश हसबनीस, सुभाष खिलारे, सोमाजी कोळेकर, संचालिका सुखदा महाजन, उद्योगपती राजू देसाई, अनिल देशमुख इत्यादी उपस्थित होते. प्रशिक्षण नियोजन प्राचार्य डॉ. पी. बी. कुलकर्णी, सहकार अध्यक्ष सुमंत महाजन, अध्यक्ष पांडुरंग वाघमोडे व कार्यकारिणी, अध्यक्ष डॉ. पंकज पाटील व कार्यकारिणी, दत्त संस्थेचे कार्यलक्षी संचालक महेश कबाडे, सहा. कार्यलक्षी संचालक संजय विभुते, विजय पाटील यांनी केले. सूत्रसंचलन श्वेता जाधव यांनी तर आभार संघटन प्रमुख बजरंग कदम यांनी मानले.

# डिस्टीलरीजना धान्यांपासून इथेनॉल निर्मितीसाठी शासनाची परवानगी

**पुणे** – साखर कारखान्यातील डिस्टीलरीजना धान्यांपासून इथेनॉल निर्मितीसाठी शासनाने परवानगी दिली आहे. यासाठी वेस्ट इंडियन शुगर मिल्स असोसिएशनने सतत पाठपुरावा केला होता, असे असोसिएशन अध्यक्ष बी. बी. ठोंबरे यांनी सांगितले.

ते म्हणाले, शासनाने याआधी मळी आणि ऊसाच्या रसापासून इथेनोल निर्मितीसाठी परवानगी दिली आहे. महाराष्ट्र, उत्तर प्रदेश, बिहार, पंजाब, हरियाणा या राज्यात मोठ्या प्रमाणावर धान्य आधारित डिस्टिलरीची उभारणी करण्यात येऊन धान्यापासून निर्मिती करण्यात येत आहे. यामुळे साखर कारखान्यांची आर्थिक स्थिती सुधारण्यास हातभार लागला आहे. तसेच मका आणि भात उत्पादक शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनास चांगला दर मिळत आहे, म्हणून गेल्या तीन वर्षांपासून धान्यांपासून इथेनॉल निर्मितीसाठी परवानगी मिळावी. म्हणून सतत पाठपुरवा करण्यात येत होता. या निर्णयामुळे साखर कारखान्यांना वर्षभर डिस्टिलरी प्रकल्प सुरू ठेवता येणार आहे, असे ते म्हणाले.



महाराष्ट्रात मक्यापसून इथेनॉल करण्यास मोठा वाव आहे असे नमूद करून ते म्हणाले, कोरडवाहू शेतकरी मक्याचे उत्पादन घेऊन त्यापासून चांगले उत्पादन घेऊ शकतील. यादृष्टीने हा निर्णय उपयुक्त ठरणारा आहे. यामुळे आर्थिक सुधारणा होण्यास मदत होणार आहे. इथेनॉल उत्पादन वाढल्यास अन्य देशातून तेलाची आयात कमी होणार आहे आणि परकीय चलन वाचणार आहे आणि देश इंधनाच्या बाबत स्वयंपूर्ण होऊ शकणार आहे, असे ते म्हणाले.

शासनाच्या या भूमिकेमुळे साखर कारखान्यांना इथेनॉल निर्मितीच्या क्षेत्रामध्ये नवीन संधी उपलब्ध होणार असून आर्थिक वाढीला हातभार लागणार आहे.

# नागपूर नागरिक सहकारी बँकेचा ३४५१ कोटींचा विक्रमी व्यवसाय




**नागपूर –** नागपूर नागरिक सहकारी बँकेने ३४५१ कोटींचा विक्रमी असा व्यवसाय केला आहे. तसेच नजीकच्या काळात मोबाईल बँकिंग सुविधा सुरू करण्यात येणार आहेत, अशी माहिती बँक अध्यक्ष प्रा. संजय भेंडे यांनी बँकेच्या वार्षिक सभेत सांगितली. नुकत्याच संपलेल्या आर्थिक वर्षात बँकेला १६.५४ कोटी नफा झाला आहे, असे ते म्हणाले.

गेल्या १० वर्षांच्या तुलनेत बँकेने प्रगतीचा आलेख उंचावला आहे असे नमूद करून ते म्हणाले, ठेवीमध्ये २३५ कोटी आणि कर्ज वितरणात १७० कोटी इतकी वाढ झाली आहे. आरबीआयच्या सर्व निकषांची पूर्तता बँकेने केली आहे. एकूण ठेवी २९७५ कोटी तर कर्ज वाटप १३७६ कोटी करण्यात आले आहे.

मुख्य म्हणजे नेट एनपीए शून्य टक्के ठेवण्यात यश मिळाले आहे. तसेच स्वनिधी १२६ कोटी असून भाग भांडवल २.७९ कोटीने वाढले आहे. तसेच ८ टक्के लाभांश जाहीर करण्यात आला आहे.

बँक कर्जदारांसाठी विविध योजना तयार करण्यात आल्या आहेत तर बँकेच्या एकूण ४६ शाखांपैकी २७ शाखा स्वामालकीच्या जागेत कार्यरत आहेत. सभेचे सूत्रसंचालन मुख्य कार्यकारी अधिकारी आशुतोष पाठक यांनी तर उपमुख्यकार्यकारी अधिकारी राजेश एदलाबादकर यांनी विविध योजनांची माहिती सांगितली. उपाध्यक्ष अशोक अग्रवालांनी शोक प्रस्ताव मांडले व संजय ठाकर यांनी आभार मानले. सभेला संचालक, पदाधिकारी, अधिकारी, खातेदार उपस्थित होते.

# देशाच्या आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत सहकार चळवळीचे महत्त्वपूर्ण योगदान

**नागपुर –** देशाच्या आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत सहकार चळवळीचे महत्त्वपूर्ण योगदान आहे. तरीदेखील प्रत्येक क्षेत्रात सर्वांना सचोटीने काम करण्याची गरज आहे, असा सूर परिसंवादात काढण्यात आला. केंद्रीय सहकार मंत्रालयाचा वर्धापनदिन तसेच आंतरराष्ट्रीय सहकार वर्षानिमित्त केंद्रीय सहकार मंत्रालयाच्या स्थापनेनंतर सहकार क्षेत्रात झालेले बदल या विषयावर परिसंवाद आयोजित करण्यात आला होता.

सहकार भारती, सहकार विभाग आणि नागपुर जिल्हा सहकारी पतसंस्था महासंघ यांच्या संयुक्त विद्यमाने परिसंवाद आयोजित करण्यात आला होता. माजी आमदार आणि शिक्षक सहकारी बँक अध्यक्ष अनिल सोले अध्यक्षस्थानी होते. नागपूर नागरिक सहकारी बँक अध्यक्ष संजय भेंडे, सहकार भारती प्रदेश महामंत्री विवेक जुगादे, नागपूर जिल्हा सहकारी पतसंस्था महासंघ अध्यक्ष आणि गिरनार सहकारी सोसायटी अध्यक्ष राजेंद्र घाटे आणि सहकार विभागातील अधिकारी सहभागी झाले होते.

भेंडे यांनी सांगितले की, सर्वसामान्य जनतेला आर्थिक मदतीचा हात देणाऱ्या सहकारी संस्था महत्त्वाची भूमिका बजावत आहेत. केंद्रामध्ये स्वतंत्र सहकार मंत्रालय स्थापन झाल्यावर मोठ्या प्रमाणावर सहकार क्षेत्रात बदल झाले आहेत. आंतरराज्यीय सहकारी संस्थावर अंकुश लावण्याचे काम सहकार मंत्रालयाने केले आहे आणि ही बाब सर्व सामान्य जनतेच्या दृष्टीने उपयुक्त ठरली आहे.

वानखेडे यांनी सहकारी संस्थांचे संगणकीकरण, प्रधानमंत्री जन औषधी केंद्र, कृषी समृद्धी केंद्र, नोंदणीकृत सहकारी संस्थांचे सदस्यत्त्व, भारतीय बीज सहकारी संस्थेची करी प्रणाली, आदी विषयाची माहिती सांगितली. घाटे यांनी पतसंस्था महासंघाच्या समस्या मांडल्या.

# सहकार भारतीचे कार्य समाजाला दिशा देणारे – आमदार मंगेश चव्हाण

**नंदुरबार –** संस्कारक्षम आणि वैचारिक प्रगल्भता असलेले लोक सहकार क्षेत्रात असल्याने देशभरात सहकार भारतीच्या माध्यमातून समाजाला दिशा देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य सुरू आहे, असे आमदार मंगेश चव्हाण यांनी सांगितले.

चाळीसगाव येथे सहकार भारतीतर्फे जळगाव, धुळे, नंदुरबार, नाशिक जिल्ह्यातील कार्यकर्त्यांसाठी एक दिवसीय प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करण्यात आले होते. सहकार भारतीचे नाशिक विभागीय संपर्कप्रमुख शरद जाधव, राष्ट्रीय संघटनमंत्री दिलीप पाटील, राज्य उपाध्यक्ष दिलीप लोहार, सुधीर पगार, बन्सीलाल अंदोरे, रवींद्र नारखेडे, दीपक पंढरपूरकर उपस्थित होते. चर्चासत्रात शरद जाधव, धरणगाव येथील दिलीप पाटील, शिरपूरचे दिलीप लोहार, लासलगावचे स्वप्निल चौधरी, दोंडाईचा येथील केदारनाथ कवडीवाले यांनी मार्गदर्शन केले.

कार्यशाळेचे संयोजन सहकार भारतीचे चाळीसगाव येथील डॉ. विकास देवकर, शशिकांत बेहेडे व पदाधिकारी यांनी केले. नंदुरबार येथील सहकार




भारती जिल्हाध्यक्ष के. आर. पाठक, संघटनमंत्री महादू हिरणवाळे, महिला जिल्हाप्रमुख सुरेखा वळवी, सहप्रमुख श्रद्धा पाटील, किरण गायकवाड, बँक प्रकोष्ट प्रमुख बाळकृष्ण वाणी, प्रल्हाद भावसार पांडुरंग माळी, योगेश आर. चौधरी, धुळे येथील महानगर सचिव कृष्णा जाधव, प्रीती त्रिवेदी, शिरपूर येथील संघटन प्रमुख शशी चौधरी, प्रकाश चौधरी, जळगाव येथील गंगाराम गवळी तसेच पदाधिकारी सहभागी झाले होते.

# सॅफमधून सुटका नको, पी.सी.ए.चा झटका

भारतीय बँकिंग क्षेत्रामधील कमर्शियल किंवा व्यापारी बँकांवर रिझर्व बँकेचे संपूर्ण नियंत्रण असून नागरी सहकारी बँकांच्या बाबतीत मात्र अंशतः नियंत्रण आहे. जून २०२०मध्ये केंद्र सरकारने बँकिंग नियमन कायद्यामध्ये आमूलाग्र बदल करून रिझर्व बँकेचे नागरी बँकांवरील नियंत्रणाची व्याप्ती मोठ्या प्रमाणावर वाढवलेली आहे. या बदलानंतर रिझर्व बँक ऑफ इंडियाने नागरी बँकांना सहकारी बँका म्हणून असणाऱ्या सवलती हळुहळू कमी करत अन्य व्यापारी बँकांच्या बरोबरीने निकष आणण्याचे प्रयत्न सुरू केले आहेत. त्यामध्ये अनेक बाबींबाबत हे बदल आता अंमलात येण्यास सुरुवात झाली असून त्यापैकीच एक प्रमुख बदल म्हणजे पर्यवेक्षीय बंधने अर्थात सुपरवायझरी ॲक्शन फ्रेम म्हणजे सॅफ या नियंत्रण प्रणालीमध्ये बदल केला असून पी.सी.ए. म्हणजेच प्रॉम्प्ट करेक्टिव्ह ॲक्शन ही व्यापारी किंवा कमर्शियल बँकांना लागू असणारी नियंत्रण प्रणाली आता नागरी बँकांनादेखील लागू झाली आहे.



गणेश निमकर
९८२२५ ६८५५०

उपचारापेक्षा खबरदारी चांगली ("Prevention is better than cure') असे नेहमीच म्हटले जाते. रिझर्व बँक ऑफ इंडियानेदेखील बँकांच्या आर्थिक आरोग्यावर लक्ष ठेवत असताना संकटांची चिन्हे दर्शवणाऱ्या बँकांच्या समस्या अधिक गंभीर होण्यापूर्वी ठेवीदारांचे हित जपण्यासाठी तसेच बँकांची एकूणच आर्थिक स्थिरता राखण्यासाठी सन २००२ पासून व्यापारी अथवा कमर्शियल बँकांसाठी पी.सी.ए. ही नियंत्रण प्रणाली सुरू केली आहे. त्याचबरोबर नागरी सहकारी बँकांच्या बाबतीत अशाच धर्तीवर नियंत्रण ठेवणे व वेळीच हस्तक्षेप करून बँकांचे बिघडणारे आर्थिक आरोग्य सुधारण्यासाठी सुपरवायझरी ॲक्शन फ्रेम म्हणजे सॅफ ही नियंत्रण प्रणाली सन २०१२ पासून सुरू केली होती.

या दोन्ही नियंत्रण प्रणालींमध्ये बँकांचा आर्थिक कमकुवतपणा कमी करणे, संदर्भात बँकांवरती काही बंधने निर्धारित केली जातात व काही विशिष्ट कृती संदर्भात विशिष्ट कृती प्रतिबंधित देखील केल्या जातात. यामध्ये बँकांच्या कामगिरीचे रिझर्व्ह बँकेकडून वारंवार निरीक्षण व परीक्षण केले जाते व झालेल्या प्रगतीबाबतचा आढावा घेऊन सुधारणात्मक उपाय योजना करण्याबाबत सूचित केले जाते.

निर्धारित सुधारणा करण्याबाबत बँकांना काही कालमर्यादा दिली जाते आणि या कालमर्यादेमध्ये अपेक्षित प्रगती न दिसल्यास सर्व समावेशक बंधने लागू करून ठेवीदारांना ठेव संरक्षण रक्कम देण्याबाबतची कार्यवाही करण्यास सुरुवात केली जाते म्हणजेच थोडक्यात त्या बँकेचे अस्तित्त्व हळुहळू संपवले जाते.

यापूर्वी रिझर्व बँकेची नागरी बँकांवर बँकेच्या आकारमानानुसार विशिष्ट नियंत्रण करण्याची पद्धत नव्हती. पूर्वी बँकेचा कोणताही आकारमान असला तरी सरसकट एकाच प्रकारचे निकष पूर्तता करण्याचे बंधन होते.

रिझर्व्ह बँकेने नागरी सहकारी बँकांवर सूक्ष्म नियंत्रण करण्यासाठी आता चार प्रकारात वर्गीकरण केलेले असून यापुढे प्रत्येक वर्गीकरणानुसार निकष पूर्ती व नियंत्रण पद्धत बदलणार आहे. जे अनेक बदल झाले आहेत किंवा होत आहेत त्या अनेक बदलांपैकी सुपरवायझरी ॲक्शन फ्रेम म्हणजे सॅफ बंधनांमध्ये केलेला बदल हादेखील खूप महत्त्वाचा बदल आहे.

दिनांक ०१.०४.२०२५ पूर्वी सर्वच नागरी सहकारी बँकांसाठी सुपरवायझरी ॲक्शन फ्रेम म्हणजे सॅफ अंतर्गत नियंत्रण केले जात होते. मात्र आता दिनांक ०१.०४.२०२५ पासून रिझर्व बँक ऑफ इंडियाने या वर्गीकरणातील प्रथम म्हणजेच टियर एक वर्गीकरण असलेल्या (टियर एक बँका म्हणजे रु.१०० कोटी रुपयांपर्यंतच्या ठेवी असलेल्या नागरी बँका व कितीही रकमेच्या ठेवी असलेल्या सर्व युनिट (कोणतीही शाखा नसलेली) आणि पगारदार नागरी बँका समाविष्ट आहेत.) बँकांसाठी पूर्वीचीच सुपरवायझरी ॲक्शन फ्रेम म्हणजे सॅफ नियंत्रण प्रणाली कायम ठेवली असून वर्गीकरण दोन ते चार मधील (रु. १०० कोटींचे पुढील रकमेच्या ठेवी असणाऱ्या बँका) बँकांसाठी मात्र व्यापारी अथवा कमर्शियल बँकांना लागू असणारी त्वरित सुधारणात्मक कृती अर्थात पीसीएच्या धर्तीवर ही नियंत्रण कार्यप्रणाली लागू केली आहे.

त्वरित सुधारणात्मक कृती अर्थात पीसीए ही नियंत्रण या कार्यप्रणालीमध्ये देखील आता सरसकट नियंत्रण पद्धती राहणार नसून, या वर्गीकरणात असणाऱ्या बँकांचे जोखीमनिहाय तीन प्रकारात उपवर्गीकरण केले जाणार आहे. हे उपवर्गीकरण प्रामुख्याने भांडवल पर्याप्तता प्रमाण, निव्वळ एनपीए व नफा क्षमता या तीन प्रमुख निकषांच्या आधारावर केले जाणार असून या उपवर्गीकरणानुसार त्या त्या बँकांवरचे निर्बंध अथवा बंधने यामध्ये बदल होणार आहेत. थोडक्यात ज्या बँकेची जोखीम अधिक असेल त्या बँकेवर अधिक नियंत्रण व बंधने येणार आहेत.

पूर्वीच्या सुपरवायझरी ॲक्शन फ्रेम म्हणजे सॅफ अंतर्गत असणाऱ्या नियंत्रण कार्यप्रणालीमध्ये ही तरतूद नव्हती तर या वर्गवारीतील सर्वच बँकांसाठी एकसारखेच निकष होते. आता त्वरित सुधारणात्मक कृती अर्थात पीसीए ही नियंत्रण या कार्यप्रणालीमधील या तीन उपवर्गीकरणामुळे रिझर्व बँकेला नेमकी कोणती बँक जास्त आर्थिक आजारी आहे किंवा कोणत्या बँकेचा आर्थिक आजार हा बळावत चालला आहे हे तातडीने समजणार असल्याने, त्यानुसार रिझर्व बँक त्या त्या बँकेवरचे नियंत्रण अथवा बंधनांमध्ये तातडीने बदल करणार आहे. या तिन्ही उपवर्गीकरणांमध्ये कोणत्याही उपवर्गीकरणात असणाऱ्या बँकेवर काही अनिवार्य बंधने राहणार आहेत. तसेच काही विवेकी अर्थात प्रुडेन्शियल बंधने राहणार आहेत. अर्थात वर्गीकरणानुसार या बंधनांची अथवा नियंत्रणाची तीव्रतादेखील कमी जास्त होणार आहे.

पूर्वीच्या सुपरवायझरी ॲक्शन फ्रेम म्हणजे सॅफ व आताच्या त्वरित सुधारणात्मक कृती अर्थात पीसीएच्या बंधनांमध्ये रिझर्व बँकेने आमूलाग्र बदल केलेले आहेत. पूर्वीच्या सुपरवायझरी ॲक्शन फ्रेम म्हणजे सॅफ बंधनांमध्ये रिझर्व बँक प्रशासकीय बाबींमध्ये कोठेही हस्तक्षेप करताना दिसत नव्हती. त्यामध्ये केवळ आर्थिक जोखीम विचारात घेऊन आर्थिक निकषांच्या आधारावरती बंधने व नियंत्रण सीमित होती. त्वरित सुधारणात्मक कृती अर्थात पीसीएच्या बंधनांमध्ये रिझर्व बँकेने नागरी बँकांच्या प्रशासकीय बाबींमध्ये देखील (विशेषतः संचालक, कर्मचारी) यांच्या बाबतीत हस्तक्षेप केलेला दिसून येतो.

पुढील पानावर...

# सहकारी तत्त्वावरील सोसायटींना राज्य सहकारी बँक कर्ज उपलब्ध करणार



**पुणे –** सहकारी तत्त्वावरील सोसायटींना राज्य सहकारी बँक कर्ज उपलब्ध करून देणार आहे. यामुळे शेतकऱ्यांना दिलासा मिळणार आहे, अशी माहिती बँकेचे प्रशासक विद्याधर अनास्कर यांनी सांगितली.

राज्यात प्रतिवर्षी २१ हजार सोसायट्यांच्या माध्यमातून खरीप आणि रब्बी हंगामासाठी साधारण २४ ते २५ हजार कोटींचा कर्जपुरवठा करण्यात येतो. राज्यातील काही सहकारी बँका आर्थिकदृष्ट्या अडचणीत असल्यामुळे शेतकरी वर्ग अडचणीत आला होता. म्हणून केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी राज्य सहकारी बँकेला कर्ज विषयात लक्ष घालण्याची विनंती केली होती. त्यानुसार राज्य सहकारी बँकेने प्राथमिक कृषी सहकारी संस्थांना कर्ज देण्याचे मान्य केले. त्यामुळे याबाबतचा प्रस्ताव केंद्र सरकारकडे पाठविण्यात आला होता.

ज्या सहकारी सोसायट्यांना कर्ज पुरवठा करण्यात येणार आहे, त्या सोसायट्या सलग तीन वर्षे नफ्यात असाव्यात आणि अनुत्पादक कर्ज १० टक्क्यांपेक्षा अधिक असू नये आणि संस्था आर्थिकदृष्ट्या सक्षम असाव्यात, असे त्यांनी सांगितले.

# कल्याण जनता सहकारी बँकेच्या वतीने विविध उपक्रम



**कल्याण –** कल्याण जनता सहकारी बँकेच्या वतीने आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष आणि गुरुपौर्णिमेच्या निमित्ताने विविध उपक्रम करण्यात आले. त्यानिमित्त कल्याण, पुणे उल्हासनगर, येथील बँक शाखांमध्ये भारतमातेच्या प्रतिमेची स्थापना करण्यात आली.

यावेळी बँक संचालक, अधिकारी सदस्य, ग्राहक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. सामाजिक बांधिलकीच्या जाणीवेतून बँकेच्या वतीने अनेकविध उपक्रम राबविण्यात येतात.

बँकेच्या विविध उपक्रमांना खातेदार तसेच नागरिक आणि हितचिंतक यांच्याकडून सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे.

**पुढील पानावर...**

# सॅफमधून सुटका नको, पी.सी.ए.चा झटका

या बंधनांबाबतचा सविस्तर तपशील रिझर्व बँकेने त्यांच्या या संदर्भातील परिपत्रकामध्ये दिलेला आहे. नागरी सहकारी बँकांनी या संदर्भात या परिपत्रकाचा सखोल अभ्यास करून या निर्बंध किंवा बंधनामध्ये आपली बँक येणार नाही, याची अधिक दक्षता घेण्याची गरज आहे. प्रत्येक बँकेने त्याबाबतचा वेळोवेळी आढावा घेऊन आपले आर्थिक आरोग्य बिघडलेले नाही ना? किंवा बिघडण्याच्या वाटेवर नाही ना? याची देखील तपासणी अथवा चाचपणी करून त्यावर स्वतःच उपाययोजना करून पथ्ये पाळणे गरजेचे आहे.

रिझर्व बँक ऑफ इंडिया ही सर्वच बँकांची निर्धारित कालावधीनुसार प्रत्यक्ष बँकेत येऊन तपासणी करत असते. तसेच वेळोवेळी बँकेकडून विविध प्रकारची माहिती मागवून त्या माहितीचे विश्लेषण करून बँकेच्या आर्थिक आरोग्याचा आढावा घेत असते. प्रत्यक्ष तपासणीच्या वेळी रिझर्व बँक प्रत्येक बँकेचे आर्थिक आरोग्य व परिस्थिती पाहून त्या त्या बँकेच्या ठेवीदारांना ठेव रक्कम परत देण्याची सक्षमता असल्याची खात्री करत असते. या तपासणीनंतर रिझर्व बँक प्रत्येक बँकेला एक मानांकन (रेटिंग) किंवा ग्रेडेशन देत असते.

रिझर्व बँकेच्या नियमांनुसार हे मानांकन (रेटिंग) किंवा ग्रेडेशन अत्यंत गोपनीय स्वरूपाचे असून, कोणत्याही बँकेला ते जाहीरपणे प्रकट करता येत नाही. त्याची गोपनीयता ठेवण्याचे बंधन बँकांवर असते. अशाच प्रकारे पर्यवेक्षीय बंधनाबद्दल देखील रिझर्व बँक कोठेही जाहीर प्रकटन न करता प्रत्येक बँकेच्या आरोग्याची कल्पना त्या त्या बँकेच्या व्यवस्थापनाला देत असते. एखाद्या बँकेचे आर्थिक आरोग्य तात्कालिक कारणामुळे कमकुवत होऊ शकते व त्यामध्ये नंतर सुधारणादेखील होऊ शकते. मात्र अशा स्थितीत दरम्यानच्या काळात ठेवीदारांमध्ये कोणत्याही प्रकारची घबराट किंवा ठेवीदारांमध्ये बँकेबद्दल अविश्वास निर्माण होऊ नये, म्हणून रिझर्व बँक ही गोपनीयता पालन करण्याची दक्षता घेत असते.

रिझर्व बँक ऑफ इंडियाने सुपरवायझरी ॲक्शन फ्रेम म्हणजे सॅफ नियंत्रण प्रणालीबद्दलचे परिपत्रक रद्द करून याबद्दल नवीन त्वरित सुधारणात्मक कृती अर्थात पीसीए बाबतचे परिपत्रक जारी केले असल्याने, पूर्वीच्या रद्द झालेल्या परिपत्रकांमुळे ज्या बँकांवर अशी नियंत्रणे होती, ती नियंत्रणेदेखील रिझर्व बँकेने रद्द करण्यास सुरुवात केली आहे. मात्र रिझर्व्ह बँकेच्या या कृतीचा अनेक ठिकाणी वेगळा अर्थ घेतला जात आहे असे दिसून येते.

आता रिझर्व बँकेचे आमच्या बँकेवर यापुढे कोणतेच पर्यवेक्षीय बंधन किंवा नियंत्रण राहाणार नाही, अशा थाटामध्ये काही बँका त्याची जाहिरात करताना दिसत आहेत. वास्तविक ही बाब बँकेचे सभासद व ठेवीदार यांचे पुरते मर्यादित स्वरुपात त्यांना समजण्याबद्दल कोणाचाच आक्षेप असणार नाही. परंतु जाहीररीत्या त्याचे सेलिब्रेशन करणे हेदेखील योग्य नाही. नजीकचे वैधानिक लेखा परीक्षण किंवा रिझर्व बँकेच्या नजीकच्या तपासणीच्या वेळी बँकेचे आर्थिक आरोग्य पुन्हा तपासले जाणार आहे आणि अशावेळी बँकेचे आर्थिक आरोग्य कमकुवत होत असल्याची लक्षणे दिसल्यास, त्या त्या वर्गवारीनुसार रिझर्व बँक पुन्हा बंधने लागू करणार आहे, हे बँकांनी विसरून चालणार नाही.

अनेक वेळेला बंधनातून मुक्त झाल्यावर मुक्त विहार करण्याचा मोह आवरत नाही आणि अशाच एखाद्या बेसावध क्षणी नेमके रिझर्व बँकेच्या ते निदर्शनास आल्यास बँक पुन्हा निर्बंधामध्ये जाऊ शकते. रिझर्व बँक ऑफ इंडियाने एक प्रकारे नागरी बँकांना सध्या ही एक चांगली संधी दिलेली असून या संधीचा नागरी बँकांनी जास्तीत जास्त उपयोग करून भविष्यात आपली बँक सॅफ किंवा पीसीएच्या कोणत्याच बंधनात अडकणार नाही यासाठी अधिक दक्ष व सावध राहण्याची गरज आहे. थोडक्यात भविष्यात 'सॅफमधून सुटका मात्र पीसीएचा बसला झटका' अशी परिस्थिती होणार नाही याची सतर्कता ठेवावी लागेल..

**– गणेश रा. निमकर पुणे.**
**मो. ९८२२५ ६८५५०**

*****

# बँकिंग क्षेत्रात यशाची नवी कवाडे

## ग्राहक संबंध आणि व्यवसाय वाढीसाठी अभिनव रणनीती

सध्याच्या स्पर्धात्मक बँकिंग जगात केवळ पारंपरिक पद्धतीने काम करून चालणार नाही तर ग्राहकांपर्यंत पोहोचणे, त्यांचे समाधान करणे आणि नवीन व्यवसाय निर्माण करणे यासाठी नाविन्यपूर्ण दृष्टिकोन आवश्यक आहे. उत्कृष्ट कल्पनांच्या आधारे, ग्राहक संबंध अधिक दृढ कसे करू शकतो आणि व्यवसाय कसा वाढवू शकतो, यावर विवेचन.




**व्यंकटेश कुलकर्णी**

**९४०३० ८०७५१**


**※ ग्राहक संबंधांची पेरणी –**

**दीर्घकालीन विश्वास निर्मिती –** गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार आणि कौतुक : दहावी, बारावीतील गुणवंत विद्यार्थ्यांची यादी मिळवून त्यांच्याशी संपर्क साधावा. त्यांना व पालकांना भेटून अभिनंदन करावे. फुलासोबत पेन भेट देणे, पालकांचे कौतुक करणे, यातून भविष्यातील शिक्षणासाठी एज्युकेशन लोनसारख्या संधी निर्माण होऊ शकतात. यासोबतच शहरातील नुकतेच डॉक्टर, सीएची परीक्षा उत्तीर्ण झालेले विद्यार्थी हे भविष्यात बँकेसाठी मोठे ग्राहक ठरू शकतात. ही केवळ भेट नाही, तर भविष्यातील संबंधांची पेरणी आहे.

**※ माजी ग्राहकांशी पुन्हा संपर्क साधा –** जे ग्राहक काही कारणास्तव बँकेतून बाहेर पडले होते त्यांच्याशी पुन्हा संपर्क साधा. बँकेच्या नवीन योजना, आकर्षक व्याजदर आणि सुधारित सेवांबद्दल माहिती द्या. जुने संबंध पुन्हा जोडल्याने नवीन व्यवसायाची दारे उघडतात.

**※ सध्याच्या ग्राहकांकडून नवीन संदर्भ मिळवा –** चांगल्या आणि समाधानी ग्राहकांकडून त्यांच्या मित्र-मैत्रिणी, नातेवाईक किंवा सहकाऱ्यांची नावे मिळवा. त्यांनाच विनंती करा की तुम्हीच त्यांना आम्ही देत असलेल्या सेवांविषयी सांगा. जेव्हा कोणी आपल्याविषयी समोरच्या व्यक्तीला समाधानकारक माहिती देतो, तेव्हा त्याचा परिणाम जास्त चांगला होतो. त्यानंतर तुम्ही त्यांच्याशी संपर्क साधून तुमच्या सेवांची माहिती द्या. समाधानी ग्राहकांकडून मिळणारे संदर्भ हे सर्वात प्रभावी मार्केटिंग ठरते.

**※ नवीन व्यवसाय शोध आणि वाढीसाठी स्मार्ट पद्धती –**

**नवीन व्यवसायांना भेटी आणि क्रॉस-सेलिंग :-**

शहरात कोणताही नवीन व्यवसाय सुरू झाल्यास त्याला आवर्जून भेट द्या. भलेही तो व्यवसाय थेट तुमच्या हातातून गेला असेल, पण त्यातून क्रॉस-सेलिंगच्या (Cross-selling) अनेक संधी मिळू शकतात. हॉटेल्स, शोरूम्स, हॉस्पिटल्स, इंडस्ट्रीज, शाळा - या सर्वांना विविध बँकिंग सेवांची (उदा. सॅलरी अकाउंट्स, करंट अकाउंट्स, कर्जे) गरज असते. ही भेट केवळ सदिच्छा नाही, तर भविष्यातील व्यवसायासाठी पायाभरणी असते.

**※ डॉक्टरांसाठी विशेष 'होम टू बँक'/'हॉस्पिटल टू बँक' सेवा :-** डॉक्टरांसाठी 'होम टू बँक' किंवा 'हॉस्पिटल टू बँक' सेवा सुरू करा. त्यांचे दैनंदिन कलेक्शन घ्या आणि ते महिनाभर त्यांच्या चालू खात्यात ठेवा. महिना अखेरीस हे पैसे एफडीमध्ये (FD) रूपांतरित करून पावती त्यांच्या घरी किंवा दवाखान्यात पोहोचवा. ही सेवा त्यांच्यासाठी वेळेची बचत करेल आणि बँकेवरील त्यांचा विश्वास वाढवेल. आपला CASA तर वाढेल भविष्यात लहान मोठे वाहन वैद्यकीय उपकरणे किंवा हॉस्पिटल बांधकामासाठी कर्ज खातेदेखील मिळेल.

**※ पिग्मी एजंट महत्वाचा दुवा :-**

**माहितीचा उत्तम स्रोत – पिग्मी एजंट** हे बाजारातील आणि ग्राहकांशी संबंधित माहितीचा एक उत्कृष्ट स्रोत आहेत. त्यांच्याकडे असलेल्या माहितीचा उपयोग नवीन ग्राहक शोधण्यासाठी आणि व्यवसायाच्या संधी ओळखण्यासाठी करा. पिग्मी एजंट हा दिवसभर शहरात फिरत असतो. त्यामुळे त्याला गावातील सर्व घडामोडी माहीत असतात. उदा. नवीन व्यवसाय सुरु झाला, कोणी शेती विकली, कोणी घर विकले. यातून आपण त्या लोकांशी सपर्क साधल्यास आपल्याला शेती विक्रेत्याकडून ठेव व घर विक्रेत्याकडून ठेव तर ज्याला घर विकले तो कर्जदारदेखील मिळू शकतो.

**※ डेटाचा योग्य वापर आणि कार्यक्षम कर्मचारी व्यवस्थापन –**

**इनवर्ड ACH/NACH चे विश्लेषण आणि टॉप-अपची संधी :-**

आयटी विभागाकडून तुमच्या बँकेत येणाऱ्या इनवर्ड ACH (Automated Clearing House) आणि NACH (National Automated Clearing House) व्यवहारांची माहिती घ्या. हे कर्ज सामान्यतः एनबीएफसी (NBFC) सारख्या जास्त व्याजदराच्या संस्थांकडून घेतलेले असते. तुमच्याकडे त्यांच्या परतफेडीचा ट्रॅक रेकॉर्ड असल्याने, त्यांना टॉप-अप (Top-up) कर्जाची ऑफर द्या. हे कमी व्याजदरात देऊन तुम्ही बँकेकडे आकर्षित करू शकता.

**※ उच्च टर्नओव्हर असलेल्या चालू खात्यांवर लक्ष केंद्रित करा :-** आयटी विभागाकडून चांगल्या टर्नओव्हर असलेल्या करंट अकाउंट्सची माहिती मिळवा. त्यांना व्यावसायिक कर्जे, वर्किंग कॅपिटल आणि इतर आकर्षक योजना ऑफर करून बँकेशी अधिक जोडण्याचा प्रयत्न करा.

**※ स्टाफ आणि वेळेचे कार्यक्षम व्यवस्थापन –** शाखेतील गर्दीचा वेळ आणि कमी गर्दीचा वेळ ओळखून, प्रत्येक कर्मचाऱ्याला लहान रकमेच्या कर्जासाठी उदा. ५०,००० ते २,००,००० पर्यंतची कर्जे यासाठी प्रतिदिन १०० ते ५००च्या हप्त्यांच्या वसुलीचे लक्ष्य द्या. प्रत्येक कर्मचाऱ्याला किमान १० अशा खात्यांचे टार्गेट द्या. दिवसभरात प्रत्येकाला बाहेर पडण्यासाठी वेळ काढायला शिकवा यासाठी एकमेकांची कामे करण्यासाठी प्रेरित करा. यातून लहान व्यवसायांची खाती मिळतील त्यांना बँकेचा आधार मिळेल आणि बँकेला नियमित व्याजाचे उत्पन्न मिळेल. हळुहळू अशा ग्राहकांना त्यांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी छोटी छोटी कर्जे देऊन 'फॅमिली बिझनेस कॉन्सेप्ट' डेव्हलप करा.

**※ कर्मचाऱ्यांच्या पगाराची खाती उघडा –** बँकेतील मोठ्या सी सी (Cash Credit) लिमिट असलेल्या फर्म्स आणि इंडस्ट्रीजमधील कामगारांची आणि कर्मचाऱ्यांची सॅलरी अकाउंट्स (Salary Accounts) उघडा. यामुळे CASA (Current Account Savings Account) बेसमध्ये वाढ होईल. या salary account holder ला छोटी छोटी कर्ज देता येतील, salary overdraft accounts मिळतील.

**※ व्यावसायिक भागीदारी आणि बाह्य मार्केटिंग –** सीए फर्म्ससोबत संबंध - शहरातील सीए फर्म्ससोबत चांगले संबंध ठेवा. त्यांच्याकडून चांगले प्रस्ताव मिळवा. शक्यतो कमिशनवर काम करणाऱ्या सीएंना टाळा. त्यांच्या स्वतःच्या ग्राहकांचे प्रस्ताव जरूर घ्या. परंतु सीएच्या प्रस्तावांवर काम करताना बँकर्सनी अधिक सावधगिरी बाळगणे आवश्यक आहे. जितकी कर्ज फाईल टापटीप रंगीत फ्लॅग लावून आलेली तितकी ती काळजीपूर्वक पाहणे आवश्यक असते, हे कायम लक्षात ठेवा.

**※ इतर बँकांच्या मॅनेजरसोबत सपर्क / मैत्री :-** शहरातील इतर बँकांच्या

मॅनेजरसोबत मैत्री वाढवा त्यांच्याशी संपर्क वाढवा, यातून सिंडिकेटेड/कन्सोर्टियम लोन बिझनेस मिळू शकतो. राष्ट्रीयीकृत बँकांमध्ये नियमांमुळे काही प्रस्ताव नाकारले जातात. परंतु सहकारी बँकांमध्ये काही प्रमाणात लवचिकता असल्याने असे प्रस्ताव तुम्ही स्वीकारू शकता. अशा प्रस्तावांची माहिती मिळवून त्यांच्या संपर्कात रहा, कर्ज प्रकरण योग्य असल्यास त्याबाबतीत विचार करा.

**※ रिअल इस्टेट ब्रोकर मैत्री :–** शहरातील रिअल इस्टेट ब्रोकर मंडळींच्या नेहमी संपर्कात राहा, यांचेकडून तुम्हाला दोन्हीही व्यवसाय वाढीसाठी ग्राहक मिळू शकतात. म्हणजे ज्याने आपली प्रॉपर्टी विक्री केली, त्याची ठेव तर ज्याने खरेदी केली त्याला गरज असल्यास कर्ज. तसेच या ब्रोकर छान उपयोग जेव्हा एखाद्या NPA खात्याची मालमत्ता आपल्याला auction मध्ये विकायची असते. त्यावेळीदेखील यांची मदत होते. याशिवाय एखाद्या कर्जाला जेव्हा एखादी property security म्हणून घेतो, त्यावेळी तीची real market value आपल्याला यांचेकडून correct समजू शकते. अशा या महत्त्वाच्या व्यक्तींसमवेत संपर्कात राहून तुम्ही व्यवसाय वाढवू शकता.

**※ बिल्डर आणि गृहकर्ज योजना :–** शहरातील बिल्डर्सच्या नवीन साईटवर बँकेचे बॅनर लावा. त्यांचे कार्यालयात गृहनिर्माण योजनांबद्दल (Housing Scheme) माहिती पत्रक ठेवा. शाखा व्यवस्थापकांनी (Branch Manager) आपले व्हिजिटिंग कार्ड आणि loan documents ची चेकलिस्ट बिल्डरच्या ऑफिसमध्ये ठेवावी. बिल्डरनाही त्यांचे फ्लॅट लवकर विकायचे असतात. फ्लॅट घेणाऱ्याला देखील कर्ज पाहिजे असते आणि बँकेला कर्ज द्यायचे असते. येथे दोन्ही गरजूंचे हित साधले जाते.

**※ ग्राहक सेवा आणि जागृती :–** डॉरमंट खाती पुन्हा सक्रिय करा आणि अप–सेलिंग करा : जी खाती दीर्घकाळापासून निष्क्रिय (Dormant) आहेत, त्यांना पुन्हा सक्रिय करा आणि नवीन योजनांबद्दल माहिती देऊन अप–सेलिंग (Up-selling) करा.

**※ व्यवसाय सर्वेक्षण – दररोज प्रत्येक बँक कर्मचाऱ्याने सर्व्हेसाठी बाहेर जावे :** बँकेचा व्यवसाय वाढवायचा असेल तर त्यासाठी बाहेर फिरावे लागते. कर्मचारी वर्गाला बँकेच्या सेवांची सखोल माहिती असणे आवश्यक असते. बँकेच्या सर्व सेवा, सर्व्हिस चार्जेस, कर्ज योजना आणि ठेव योजना (Deposit Schemes) यांची सखोल माहिती, तसेच कोणत्याही प्रकारचे खाते उघडण्यासाठी आवश्यक कागदपत्रांबद्दल अद्ययावत माहिती तुमच्याकडे असावी. प्रत्येक कर्मचाऱ्याने दररोज एक व शनिवारी रविवारी २/३ ठिकाणी भेटी दिल्यास व्यवसाय मिळेल. एखाद्या वेळी कदाचित त्वरित ग्राहक बँकेशी जोडल्या जाणार नाही. परंतु भविष्यात त्याला काही गरज भासल्यास तो पहिला सपर्क तुमच्या बँकेशी करेल.

**※ ग्राहक कॉर्नर तयार करा : –** बँकेत एक 'ग्राहक कॉर्नर' तयार करा, जिथे शाखेचा किंवा बँकेच्या चांगल्या ग्राहकाचे कौतुकास्पद कामाची माहिती लावा. दुसरा एक कॉर्नर असा तयार करा, जिथे ग्राहकांना तुमच्या बँकेच्या सर्व सेवांबद्दल आणि योजनांबद्दल सहज माहिती मिळेल.

**※ कार्यक्रमांना उपस्थिती –** शहरात होणाऱ्या आर्थिक क्षेत्रातील कार्यक्रमांना, व्याख्यानमाला, मेळावे, लग्न समारंभ, आनंद आणि दुःखप्रसंगी उपस्थित राहा. यामुळे तुमचे नेटवर्क वाढेल आणि नवीन व्यवसाय संधी मिळतील.

**※ मोठ्या कार्यक्रमांमध्ये बँकिंगची माहिती –** शहरातील कोणत्याही मोठ्या कार्यक्रमस्थळी (उदा. प्रदर्शन, जत्रा, सामाजिक कार्यक्रम) तुमच्या बँकेची माहिती पत्रके आणि बॅनर लावा. यामुळे सामान्य लोकांपर्यंत तुमच्या बँकेची पोहोच वाढेल.

**※ सणांच्या वेळी विशेष योजना –** सणांच्या वेळी विशेष योजना (उदा. कर्ज योजनांवर व्याजदरात, छाननी शुल्कामध्ये सूट ठेव योजनांवर अधिक व्याज) सुरू करा. यामुळे ग्राहकांना आकर्षित करणे सोपे होईल व नवीन कर्जदार मिळतील. हे सर्व मुद्दे केवळ सूचना नाहीत, तर दैनंदिन कामकाजाचा अविभाज्य भाग असायला हवेत. प्रत्येक बँक कर्मचारी हा एक मार्केटर असतो, हे लक्षात घेऊन या कल्पना प्रत्यक्षात आणल्यास निश्चितच बँकेला नवी उंची गाठता येईल. चला, एकत्र येऊन या उद्दिष्टांकडे वाटचाल करूया!

**– व्यंकटेश कुळकर्णी. प्रशिक्षण केंद्र प्रमुख.**
**सहकार भारती सहकार प्रशिक्षण**
**सहकारी संस्था मर्यादित, कराड.**

*****

# सहकारातून दुधाचा नवा ब्रँड तयार करावा

**मुंबई –** दूध उत्पादनाच्या क्षेत्रात अन्य राज्याप्रमाणे महाराष्ट्रानेदेखील सहकार क्षेत्राच्या माध्यमातून स्वतंत्र ब्रँड तयार करावा अशी सूचना राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी केली आहे. आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष आणि केंद्रीय सहकार मंत्रालय दिनाचे औचित्य लक्षात घेऊन राज्याच्या सहकार, पणन आणि वस्त्रोद्योग विभागाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात ते बोलत होते.

सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, राज्यमंत्री पंकज भोयर, सहकार आयुक्त दीपक तावरे आदी यावेळी उपस्थित होते. सहकार मंत्री पाटील म्हणाले की, राज्याच्या विविध भागात साखर कारखाने, पतसंस्था आणि मोठ्या प्रमाणावर सहकारी बँकांचे जाळे पसरले आहे. त्याबरोबर ग्रामीण भागाचा विकास करणाऱ्या संस्थादेखील सक्षम झाल्या पाहिजेत व सहकार चळवळ बळकट होण्यासाठी प्रयत्न करण्याची गरज आहे असे ते म्हणाले. राज्यमंत्री भोयर यांनी मनोगत व्यक्त केले. सहकार विभागाच्या विविध उपक्रमाबाबत सहकार आयुक्त तावरे यांनी सादरीकरण केले.

व्यापारी मित्र
अमृतपर्व
25 K वर्गणीदार

कर व व्यापारी विषयक कायद्यातील
क्लिष्ट विषयांची सहज सोप्या भाषेत
माहितीसह आर्थिक गुंतवणूक,
आरोग्याविषयी माहिती देणारे
व्यापारी बांधवांचे हक्काचे एकच व्यासपीठ

स्थापना १९५०
**व्यापारी मित्र**

मासिकातील एखाद्या माहितीने आपला लाखो रुपयांचा फायदा होऊ शकतो.

संस्थापक संपादक : स्व. श्री. जी. डी. शर्मा

Payment Getway link

**भारतात कुठेही**
**निश्चित अंक मिळण्यासाठी**
**मॅगझीन पोस्टिंगसह वर्गणीदर**

| ३ वर्षांसाठी | २ वर्षांसाठी | १ वर्षांसाठी |
|---|---|---|
| २९०० | २००० | १०५० |

'परशुराम कुटी', १०६/९, एरंडवणा, पुणे – ४११००४
फोन (०२०) २५४३ १०९४ (W) : 94218 80290
E-mail : sampadak@vyaparimitra.com

# पतसंस्थाच्या व्यवहारांची व्याप्ती वाढली, कर्ज मर्यादा अपुऱ्या

सहकारी पतसंस्थेच्या आर्थिक व्यवहारांची व्याप्ती वाढली. त्यात ठेवींमध्ये, भांडवलामध्ये वाढ झाल्यानंतर कर्ज वितरण मर्यादाही वाढायला हव्यात. अन्यथा पतसंस्थांना उपलब्ध निधीतून नेटका उपयोग करण्यात अडचणी येतात. सभासदांच्या वाढत्या गरजा, अपेक्षा पतसंस्थांना पूर्ण करता येत नाही. स्पर्धात्मक वातावरणात पतसंस्थांच्या वाढीसाठी अडथळे निर्माण होतात.

भारत जागतिक स्तरावर ४थी अर्थव्यवस्था झाली. पण पतसंस्था चळवळीत त्याच परिवर्तन दिसावे, यासाठी कर्ज मर्यादा वाढवून देण्यासाठी गेल्या ५ वर्षांत यंत्रणेला कोणतीही निकड जाणवली नाही. कारण गांभीर्याने घेण्याचा घटक पतसंस्था नाही.



**ॲड. दीपक पटवर्धन**
**मो.: ९८२२१ २८९२२**

बँका आणि पतसंस्था यांची उद्दिष्ट वेगळी आहेत. पतसंस्थांनी भांडवल उभारणी, ठेव उभारणी आणि उपलब्ध निधीतून योग्य प्रमाणात कर्ज वितरण करून वितरित कर्जाची वसुली यावर लक्ष केंद्रित करणे अपेक्षित आहे. मात्र एकंदर आर्थिक परिस्थितीचा पतसंस्थांच्या आर्थिक व्यवहारांवर परिणाम होत असतो. तरीही बँकिंग व्यवस्थेपेक्षा काही अधिक लवचिक पद्धतीने पतसंस्थांनी काम करणे अपेक्षित असते. कारण बँका या ग्राहकाशी व्यवहार करत असतात. आर्थिक सेवा देत असतात. मात्र पतसंस्था भागधारकाला आर्थिक सेवा देत असतात. भागधारकाची संस्थेच्या भांडवलात गुंतवणूक असते. स्वाभाविकपणे सभासदांच्या गरजा लक्षात घेऊन त्यानुरूप पतसंस्थांची धोरणे असतील तर त्याचा उपयोग अधिक होतो. सध्या असलेली यंत्रणा पतसंस्थांना गांभीर्याने घेत नाहीच. त्याचवेळी बँकिंग व्यवस्था बरहुकूम तंतोतंत कार्यपद्धती पतसंस्थांना लागू करावी अशी अपेक्षा धरतात.



पतसंस्था चळवळीला आरबीआयच्या कडक निकषानुसार कामकाजाचे निकष लागू करण्याकडे कल जाणवतो पण आरबीआय अन्य बँकांसाठी संपूर्ण व्यवस्था देते. आरबीआय दर तीन महिन्यांनी रिव्ह्यू घेऊन धोरण लागू करते. धोरणामध्ये बदल करते. बँकांवर नियंत्रण ठेवण्यासाठी त्यांची यंत्रणा सक्षम आहे. अनेक प्रकारच्या कायदेशीर सुविधा बँकिंग व्यवस्थेला उपलब्ध आहेत. मात्र या कशाची उपलब्धता पतसंस्थांना नाही. पतसंस्थांच्या पायात बेड्या घालून त्यांना स्पर्धेत धावायला लावायचे अस धोरण दिसत. मुळात पतसंस्था व्यवस्थेवर यंत्रणेने विश्वास दाखवायला हवा. ज्या पतसंस्था सुरू आहेत. लहान-मोठे व्यवहार करत आहेत ते सर्व संचालक, पदाधिकारी, अधिकारी, कर्मचारी यांच्याबाबत त्यांच्या सभासदांना वाटणारा विश्वास यावर पतसंस्था चालल्या आहेत. शासकीय यंत्रणा, नियामक यंत्रणा या कागदावर आहेत. प्रत्यक्षात पतसंस्था स्वत:ची लढाई लढत आहेत.

**※ डिजिटल सेवा गरज पण कुठेच साधा उल्लेखही नाही –**

आजच युगे हे डिजिटल युग आहे. डिजिटल युगाचा स्वीकार पतसंस्थांनाही अपरिहार्य आहे. पण नियामक मंडळ या संदर्भात धोरण ठरवत नाही. संस्थांच्या पोटनियमात सहकार कायद्यात डिजिटायझेशनचा नामोल्लेख नाही. अन्य बँकांना हाताशी धरून मिन्नतवाऱ्या करून डिजिटल सेवा सभासदांना उपलब्ध करून द्याव्या लागत आहेत. डिजिटल मोड वापरताना त्यासंदर्भात नेमक धोरण हवं. अनेक सॉफ्टवेअर कंपन्या वेगवेगळी सॉफ्टवेअर देतात. मोबाईल बँकिंगही त्यात अंतर्भूत असते. मात्र या सगळ्यांचा वापर करण्यासाठी पतसंस्थेच्या पोटनियमात नियामक मंडळाच्या परिपत्रकात डिजिटल व्यवहारांसंदर्भात स्पष्ट निर्देश हवेत. पतसंस्था मोठ्या प्रमाणात RTGS NEFT क्यू आर कोड इत्यादी व्यवहार करतात. मात्र मोठ्या प्रमाणावर होणाऱ्या या डिजिटल व्यवहारांची दखल घ्यावी. त्या संदर्भाने नियमन करावे, असं नियामक मंडळाला वाटत नाही. याचं कारण पतसंस्थांना गांभीर्याने घ्यायचे नाही.

**※ बोथट झालेली वसुली आयुध –**

पतसंस्थांना वसुली हा मूळ मुद्दा खूप सतावतो. याचे मुख्य कारण वसुली संदर्भात असलेले कायदे वेळकाढू आणि प्रभावहीन झालेत. त्यातही अनेक वेळा शासकीय यंत्रणा वसुली यंत्रणेत हस्तक्षेप करतात आणि वसुली यंत्रणेचा प्रभाव क्षीण होतो. महाराष्ट्र सहकार कायदा कलम ४९ हा पगारातून कर्ज हप्ता कपात करण्याचा अधिकार बंधपत्राचे माध्यमातून कर्जदार, जामीनदार ड्रॉइंग ऑथॉरिटीला देतात. मात्र या कायदेशीर तरतुदींना फाटे फोडून ही कपात कशी करायला लागू नये, याकडेच शासकीय यंत्रणेचा भर असतो. त्यामुळे नोकरदार, पगारदार वर्गाकडची थकबाकीही वसूल करताना अडथळे येतात.

**※ पैशाचा शासकीय यंत्रणेत पतसंस्था दुर्लक्षित –**

पतसंस्था या सभासदांकडून ठेवी उभारून त्या पैशाचा विनियोग करत असतात. यात मोठे उत्तरदायित्व दडलेले असते. पतसंस्था ही व्यवस्था अत्यंत उपयुक्त आहे, म्हणूनच याची वाढ मोठ्या प्रमाणावर झाली. या व्यवस्थेवर जनतेचा मोठा विश्वास आहे. या व्यवस्थेची उपयुक्तता अनेक वेळा अधोरेखित झाली आहे. शासकीय यंत्रणा संस्था चालकांना त्या त्या संस्थेचा आर्थिक परफॉर्मन्स, याचा फारसा विचार न करता सर्वच संस्थांना एका तराजूत तोलतात. प्रामुख्याने शासकीय यंत्रणेला पतसंस्था चालकासंदर्भात विश्वास वाटत नाही आणि त्यामुळे सापत्न वागणूक पतसंस्था चळवळीला दिली जाते. त्यामुळे ही चळवळ शासकीय यंत्रणेला दुर्लक्षितच ठेवायची आहे का? असा प्रश्न सतावतो.

संस्थाचालकांनी अधिक जागृत होऊन डोळसपणे संस्था संचालन केले पाहिजे. कायद्यातील तरतुदी, पोटनियमातील तरतुदी यांची माहिती अभ्यासपूर्वक घेतली पाहिजे. कार्यक्षेत्रातल्या संधी, नवी व्यवसाय केंद्रे, सभासदांच्या गरजा त्यातील बदल याबाबत सजगता ठेवून धोरणे परिस्थितीनुरूप बनवली पाहिजेत. सहकारतत्त्व आणि अर्थकारणाच्या यशस्वीतेसाठी आवश्यक असणारी व्यावसायिकता याचा समन्वय राखत संस्था संचालन करणे ही काळाची गरज आहे.

**– डॉ. दीपक पटवर्धन, रत्नागिरी**

***




# नागरी सहकारी बँकांच्या विकासासाठी केंद्रीय सहकार मंत्रालय, रिझर्व्ह बँक कटिबद्ध - सतीश मराठे

**नाशिक –** देशभरातील सहकारी बँकांच्या सर्वांगीण विकासासाठी केंद्रीय सहकार मंत्रालयाबरोबरच रिझर्व्ह बँकदेखील विविध उपाययोजना अवलंबित असल्याचे रिझर्व्ह बँकेचे संचालक सतीश मराठे यांनी सांगितले. येथे झालेल्या सहकारी बँक पदाधिकाऱ्यांच्या कार्यशाळेत ते बोलत होते.

सहकार भारती सहकार प्रशिक्षण सहकारी संस्थेच्या वतीने येथे आयोजित करण्यात आलेल्या एक दिवसीय प्रशिक्षण शिबिरात ते बोलत होते. महाराष्ट्रातील ४७ सहकारी बँकांचे ११५ अध्यक्ष, उपाध्यक्ष, संचालक पदाधिकारी कार्यशाळेमध्ये सहभागी झाले होते.

नागरी सहकारी बँकांसमोरील आव्हाने व संधी यावर बोलताना ते म्हणाले की, देशाच्या अर्थव्यवस्थेत सहकाराचा महत्त्वपूर्ण वाटा आहे, पण हा वाटा वाढविण्याची गरज आहे. नागरी सहकारी बँकांनी अत्याधुनिक आणि व्यावसायिक भूमिका ठेवून अधिक सक्षमपणे काम करण्याची गरज आहे. देशभरातील सर्व प्रकारच्या सहकारी संस्थांबाबत विचार करण्यात आला आहे.

महाराष्ट्र अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक फेडरेशनचे अध्यक्ष सीए अजय ब्रम्हेचा यांनी रिझर्व्ह बँकेच्या अर्बन सहकारी बँकेकडून असलेल्या अपेक्षा यावर विस्तृत भाष्य केले. ज्येष्ठ बँकिंग तज्ञ व विचारवंत सीए प्रकाश पाठक यांनी नेतृत्व विकास व संचालक निर्मितीचे नियोजन यावर बोलताना सांगितले की, सहकार क्षेत्रात पारदर्शकता ठेवल्यास नवीन सभासद येतील, त्यातून नवीन संचालक तयार होतील, यात तरुणांना विशेष स्थान मिळण्याची गरज आहे. सहकार क्षेत्रात रोजगार निर्मितीदेखील मोठ्या प्रमाणावर होत आहे, याबाबत देखील जनजागृती करण्याची गरज आहे.

कार्यशाळेचा समारोप सहकार भारतीचे राष्ट्रीय संघटनमंत्री संजय पाचपोर यांनी केला. त्यांनी सहकार भारतीच्या देशभरातील कामाचा आढावा घेतला आणि सहकारी बँकांच्या कामगिरीचे कौतुकही केले. कार्यशाळेत प्रशिक्षण संस्थेचे अध्यक्ष संजय बिर्ला, उपाध्यक्ष शरद जाधव, सहकार भारती महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष दत्ताराम चाळके, महासचिव विवेक जुगादे तसेच प्रशिक्षण संस्थेचे संचालक डॉ. मुकुंद तापकीर, सहकार सुगंधचे संपादक भालचंद्र कुलकर्णी, उदय पेंडसे, संध्या कुलकर्णी उपस्थित होते. प्रशिक्षण प्रमुख व्यंकटेश कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन केले.

# कोल्हापूर नागरी बँक सहकारी असोसिएशन संचालक मंडळाची निवडणूक बिनविरोध

**कोल्हापूर –** कोल्हापूर जिल्हा नागरी बँक सहकारी असोसिएशनची संचालक मंडळाची निवडणूक बिनविरोध झाली आहे. एकूण १५ संचालक बँक सहकारी असोसिएशनवर निवडून आलेले आहेत.

सर्वसाधारण गटातून १०, महिला राखीव गटातून २ इतर मागासवर्गीय गटातून १ अनुसूचित जाती जमाती गटातून १ आणि भटक्या जाती/जमाती विशेष मागास प्रवर्ग गटातून १ असे १५ जण कोल्हापूर जिल्ह्यातील विविध सहकारी बँकांतील संचालकाची असोसिएशनच्या संचालकपदी निवड झाली आहे.

श्री वारणा सहकारी बँकेचे निपुण कोरे, कोल्हापूर अर्बन बँकेचे शिरीष कणेरकर, पंचगंगा बँकेचे राजाराम शिपुगडे, श्री महालक्ष्मी बँकेचे राजेंद्र किंकर, श्री वीरशेव बँकेचे सूर्यकांत पाटील, राजश्री शाहू गव्हर्नमेंट सर्व्हंट बँकेचे रवींद्र पंदारे, श्री भरत अर्बन बँकेचे विठ्ठल मोरे, राजे विक्रमसिंह घाडगे बँकेचे मारुती पाटील, श्री यशवंत बँकेचे प्रकाश देसाई, ॲड. शामराव शिंदे, सत्यशोधक सहकारी बँकेचे महेंद्र शिंदे, दि गणेश सहकारी बँकेचे मंदार धर्माधिकारी, पार्श्वनाथ बँकेचे संजय देसाई, दि कमर्शियल बँकेचे रवींद्र व्हटकर, कोल्हापूर महिला बँकेच्या विजया जाधव, श्री नृसिंह सरस्वती बँकेच्या दिपाली मिसाळ असे संचालक बिनविरोध निवडून आले आहेत.

नूतन संचालकांचे सभासदांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

# आंतरराष्ट्रीय सहकारिता वर्षानिमित्त आयोजित विविध कार्यक्रमांना उस्फूर्त प्रतिसाद

**नाशिक, वणी –** आंतरराष्ट्रीय सहकारिता वर्षानिमित्त नागरी सहकारी पतसंस्था आणि सहकारी संस्था सहायक निबंधक यांच्या संयुक्त विद्यमाने ३० जून ते ६ जुलै या कालावधीत विविध कार्यक्रमाचे आयोजन करून सहकार सप्ताह उत्साहात साजरा करण्यात आला. सहायक निबंधक सचिन कूळमेथे अध्यक्षस्थानी होते.

सहकार कायद्यातील कलम १०१ अंतर्गत आभासी दावा दाखल करणे, यावर सहायक निबंधक सचिन कूळमेथे यांनी तर ग्रामीण पतसंस्थांसाठी कर्जबाबत नियम यावर केशव नागरी सहकारी पतसंस्था मुख्य कार्यकारी अधिकारी दीपक दीकुंडवार यांनी माहिती सांगितली. सप्ताहाच्या कालावधीत स्वच्छता अभियान रक्तदान शिबिर आरोग्य शिबिर आणि सहकार दिंडीचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमात विविध सहकारी संस्थाचा मोठ्या प्रमाणावर सहभाग होता .

# सहकारी संस्थांच्या खर्चाचे व्यवस्थापन

सहकारी संस्थांनी विशेषतः नागरी सहकारी बँका व पतसंस्थांनी कामकाज करताना कराव्या लागणाऱ्या प्रशासनिक खर्चाचे नियोजन व व्यवस्थापन करणे ही बाब आवश्यक असते. सहकारी संस्थांनी केलेला खर्च हा प्रामुख्याने त्यांच्या उपविधीतील उद्देशांची पूर्तता करण्यासाठीच केला पाहिजे. ही प्राथमिक व महत्त्वाची बाब लक्षात ठेवून खर्चाचे नियोजन व व्यवस्थापन केले पाहिजे. नागरी सहकारी बँकांसाठी लागू असलेल्या लेखापरीक्षण वर्गवारीच्या CAMELS RATING प्रमाणे प्रशासनिक खर्चाची मर्यादा ही १% असून राज्यातील पतसंस्थांसाठीचे नियामक मंडळाचे परिपत्रक दिनांक १०/०५/२०१९ अन्वये ही मर्यादा २% निश्चित केली आहे. नियामक मंडळास असा अधिकार हा सहकार कायद्याच्या कलम १४४-८अ प्रमाणे प्राप्त झालेला आहे. वरील १% व २% ह्या मर्यादांची परिगणना करताना हे प्रमाण खेळत्या भांडवलाच्या प्रमाणात असून संस्थेच्या उत्पन्नाच्या प्रमाणात नाही म्हणजेच संस्थेचा व्यवसाय जेवढा जास्त असेल तेवढे खेळते भांडवल अधिक व खर्च मर्यादाही जादा असते. ही बाब या ठिकाणी लक्षात घ्यावी. त्यामुळे संस्थेचे उत्पन्न वाढविले म्हणजे अशा खर्चाची मर्यादाही वाढेल असे नाही.



**संतोष मानूरकर**
**९८५०७ ८३९८३**

**आता आपण प्रशासनिक खर्चात कशाचा समावेश होतो हे पाहू :-**

*** आस्थापना खर्च –** पगार, बोनस, भत्ते, भविष्य निर्वाह निधी, सेवानिवृत्ती लाभ इ.

*** प्रशासनिक खर्च –** प्रिंटिंग व स्टेशनरी, दूरध्वनी, भ्रमणध्वनी, संचालक मंडळ प्रवास व सभा भत्ते.

प्रचार व प्रसिद्धी खर्च, पोस्टेज, सभासमारंभ, भाडे, वीमा, कायदा फी, हिशेब तपासणी फी, प्रवास, इंधनखर्च, दुरूस्ती व देखभाल खर्च, वीज खर्च, निवडणूक खर्च तरतूद, सहकार शिक्षण व प्रशिक्षण खर्च/तरतूद, आयकराव्यतिरिकत इतर कर इ.

(ठेवी व बाहेरील कर्जावरील व्याज, आयकर, थकव्याज तरतूद, उत्पादक व अनुत्पादक जिंदगीची तरतूद यांचा व्यस्थापन खर्चात समावेश होत नाही.)

सहकारी संस्थांची नफा क्षमता ही संस्थेस मिळत असलेल्या उत्पन्नाबरोबरच ती अशा उत्पन्नातून किती खर्च करते व प्राप्त ढोबळ नफ्यातून असा खर्च वजा जाता तिला निव्वळ नफा किती शिल्लक राहतो यावर अवलंबून असते. त्यासाठी उत्पन्न व खर्च यांचे नियोजन व व्यवस्थापन यास अनन्यसाधारण महत्त्व आहे. उत्पन्नाचे नियोजन व व्यवस्थापन करताना उत्पन्नाची गळती (Leakage of income) होणार नाही याची काळजी घेण्याबरोबरच ठेवींवर दिलेले (देय) व्याज व वाटप कर्जावर प्राप्त व्याज अधिक गुंतवणुकीवरील व्याज यांच्यामध्ये योग्य तो दुरावा (Margin) संस्थेने राखल्यास संस्थेचे उत्पन्न योग्य व पुरेसे असेल. आता खर्चाच्या बाबतीत त्याचे नियोजन व व्यवस्थापन कसे करावे या बाबीवर आपण चर्चा करूया.

*** प्रशासनिक खर्चाचे व्यवस्थापन खालीलप्रमाणे करावे –**

**१. अंदाजपत्रक तयार करणे :–** बँकांनी/पतसंस्थांनी अनुक्रमे १% व २% ची मर्यादा राखण्यासाठी त्याची तयारी ही आर्थिक वर्षाच्या सुरुवातीपासूनच केली पाहिजे. अन्यथा वर्षसमाप्तीनंतर आर्थिक पत्रके निश्चित केल्यानंतर खर्चाची मर्यादा ओलांडल्याची बाब लक्षात आल्यावर त्यावर कोणताही उपाय असत नाही. अंदाजपत्रकास मंजुरी हा जरी वार्षिक सभेच्या मंजुरीचा विषय असला तरी वर्षारंभी असे अंदाजपत्रक तयार करून संचालक मंडळाच्या मान्यतेने साधारण सभेच्या मंजुरीस अधीन राहून त्याप्रमाणे खर्च करावा व वार्षिक सभेत ही तेच अंदाजपत्रक सादर करून त्यास मंजुरी घ्यावी व कायद्यातील तरतुदीचे ही पालन करावे.

ज्याअर्थी, प्रशासनिक खर्चाची मर्यादा ही खेळत्या भांडवलावर आधारित आहे, त्याअर्थी संस्थांनी सर्वात प्रथम आपला आगामी वर्ष या संकल्पित ताळेबंद (Tentative Balance-Sheet) तयार करून साधारणपणे आपले खेळते भांडवल जास्तीत जास्त अचूकपणे निश्चित करण्याचा प्रयत्न करावा. त्यानंतर खेळत्या भांडवलाच्या २% येणारी रक्कम निश्चित केल्यास आपण कोणत्या बाबींवर किती खर्च करावा, याची जास्तीत जास्त अचूकपणे मांडणी करता येईल व वर्षभर वेळोवेळी त्याचा आढावा घेतल्यास नियामक मंडळाने घालून दिलेल्या मर्यादा उल्लंघनाचा प्रश्न उद्‌भवणार नाही.

**२. उद्देशविरहित, अनावश्यक खर्चांना प्रतिबंध :–**

१. सहकारी संस्थांनी खर्च करताना खालील तत्त्वे पाळावीत.

संस्थेच्या उद्येगाशी संबंधित नसलेले खर्च करता कामा नये. ज्या खर्चामुळे संस्थेच्या उत्पन्नात कोणतीही भर पडणार नाही, असे खर्च करू नयेत.

वैयक्तिक खर्च हे संस्थेमध्ये टाकू नयेत. उदा. इंधन खर्च आवश्यकता नसल्यास केवळ अंदाजपत्रकीय तरतूद आहे म्हणून खर्च करू नये.

महाराष्ट्र शासनाचे सहकार विभागाने सहकार कायदा कलम ७९-अ अन्वये दि. २ मार्च २००० रोजी सहकारी संस्था व बँकांना निदेश दिले असून त्याप्रमाणे कोणत्याही सहकारी संस्थेने / बँकेने कोणत्याही व्यक्तीच्या स्वागतानिमित्त, जन्मदिनानिमित अगर तत्सम कोणत्याही प्रयोजनानिमित्त संस्थेच्या/बँकेच्या नावाने महाराष्ट्र शासनाचे सहकार विभागाने सहकार कायदा कलम ७९-अ अन्वये दि, २ मार्च २००० रोजी सहकारी संस्था व बँकांना निदेश दिले असून त्याप्रमाणे कोणत्याही सहकारी संस्थेने/बँकेने कोणत्याही व्यक्तीच्या स्वागतानिमित्त, जन्मदिनानिमित अगर तत्सम कोणत्याही प्रयोजनानिमित्त संस्थेच्या/बँकेच्या नावाने वृत्तपत्रात, मासिकात अथवा नियतकालिकामध्ये जाहीरात देऊ नये. मात्र, संस्था स्वतःच्या व्यवसाय वृद्धीच्या दृष्टिकोनातून सहाय्य होईल अशा जाहिरातीवर प्रतिबंध नाही.

**३. भांडवली खर्च हा महसुली खर्च म्हणून टाकू नये :–**

वेबसाईट विकसन तसेच सॉफ्टवेअर खर्च यांसारखे खर्च त्यांचा कालावधी लक्षात घेऊन एका वर्षापेक्षा जादा कालावधीसाठी त्यांचा व्यवसायास उपयोग होणार असल्याने असे खर्च हे महसुली खर्च म्हणून नफा-तोटा खाती खर्ची न टाकता त्यांना 'भांडवली खर्च' समजून योग्य तो जमाखर्च करणे उचित असते. अन्यथा संस्थेला घालून दिलेली मर्यादा ही अशा खर्चामुळे ओलांडली जाऊ शकते.

**४. तरतुदी :–** Accounting Standared-29 प्रमाणे Provision means present obligation from a past event. संस्थांनी ज्या त्या वर्षातील आवश्यक त्या कायदेशीर देणी रकमांच्या तरतुदी आवश्यक त्या प्रमाणात केल्याच पाहिजेत. तरतूद न करणे किंवा आवश्यक तेवढी तरतूद न करणे या दोन्ही बाबी या सदर Accounting Standard चे उल्लंघन ठरते. कमी तरतूद केल्यामुळे किंवा अजिबात तरतूद न केल्यामुळे प्रशासनिक खर्चाची मर्यादा पाळल्याचे चित्र निर्माण न करता आवश्यक त्या तरतूदी केल्याच पाहिजेत. उदाहरणार्थ,

१. माहे मार्चच्या पगाराची तरतूद करून ही ताळेबंदात देयतेला दिसलीच

**पुढील पानावर...**

## राजर्षी शाहू सहकारी बँकेचा ४१ वा वर्धापनदिन उत्साहात

**पुणे –** राजर्षी शाहू सहकारी बँकेचा ४१ वा वर्धापन दिन उत्साहात साजरा करण्यात आला. बँकेचे अध्यक्ष शांताराम धनकवडे यांनी बँकेच्या विविध सेवा-सुविधा याबाबतची सविस्तर माहिती सांगितली. संचालक सुधाकर पन्हाळे यांनी बँकेच्या आजवरच्या वाटचालीबाबत माहिती सांगितली. मुख्य कार्यकारी अधिकारी बाळासाहेब डोईफोडे यांनी मनोगत व्यक्त केले. संचालक, अधिकारी, पदाधिकारी, ग्राहक, खातेदार यावेळी उपस्थित होते.

## सकाळ प्रेस कामगार सहकारी पतसंस्थेच्या अध्यक्षपदी अरुण सुर्वे

**पुणे –** सकाळ प्रेस कामगार सहकारी पतसंस्थेच्या अध्यक्षपदी मुख्य उपसंपादक अरुण सुर्वे आणि सचिवपदी सुनील जगताप यांची एकमताने निवड करण्यात आली. पतसंस्थेच्या संचालक मंडळाची बैठक झाली. त्यामध्ये आगामी वर्षासाठी नवीन पदाधिकारी निवडण्यात आले आहेत. संस्थेची वार्षिक उलाढाल १३ कोटी असून संस्थेच्या वतीने सदस्यांसाठी विविध योजना राबविण्यात येतात. गेल्या वर्षी संस्थेने सदस्यांना १३ टक्के लाभांश दिला होता.

## सहकार क्षेत्रात पर्यटन वाढीसाठी मार्गदर्शन आवश्यक - मराठे

**गोवा –** सहकार क्षेत्रात पर्यटन वाढीसाठी त्याचबरोबर व्यवसाय वाढीसाठी आवश्यक असणारे मार्गदर्शन होण्याची आवश्यकता असल्याचे मत आरबीआय संचालक आणि सहकार भारतीचे माजी राष्ट्रीय अध्यक्ष सतीश मराठे यांनी सांगितले. गोवा सहकार भारती प्रदेश कार्यकारिणी बैठक झाली त्यावेळी ते बोलत होते.

राष्ट्रीय महामंत्री दिलीप पाटील, राष्ट्रीय कार्यकारिणी सदस्य प्रकाश वेळीप, वल्लभ साळकर, प्रदेश अध्यक्ष अशोक गावडे, आदी उपस्थित होते. सुरुवातीला प्रदेश सचिव महेश आमोणकर यांनी सहकार गीत सादर केले. अध्यक्ष गावडे यांनी स्वागत आणि प्रास्ताविक केले. पाटील यांनी नवीन सदस्य नोंदणी आणि सहकार भारती भवन निधी याविषयी माहिती सांगितली. गोवा सहकार भारतीचे त्रैवार्षिक अधिवेशन नजीकच्या काळात आयोजित करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले. तसेच आगामी सहकार सप्ताहात आयोजित करण्यात येणाऱ्या विविध कार्यक्रमाची आखणी करण्यात आली. सूत्रसंचालन महामंत्री रघुवीर बस्त यांनी तर सरिता बोरकर यांनी आभार मानले.

मागील पानावरून...

## सहकारी संस्थांच्या खर्चाचे व्यवस्थापन

पाहिजे, अशी तरतूद न केल्यास केवळ अकरा महिन्यांच्या पगाराचा खर्च चालू वर्षात दिसेल व आगामी वर्षात तो तेरा महिन्यांचा दिसेल.

२. निवडणूक खर्चाची तरतूद ही सहकारी नियम ४९-अ प्रमाणे प्रतिवर्षी करणे आवश्यक आहे. अन्यथा अशी तरतूद न केल्यास आगामी काळात ज्या वर्षी संस्थेमध्ये प्रत्यक्षात निवडणूक होईल, त्यावर्षी असा संपूर्ण खर्च हा एकाच आर्थिक वर्षात पडेल व संस्था विहित खर्चाची मर्यादा कदाचित ओलांडेल.

**५. सेवक निवृत्ती लाभ :–** Accounting Standard-15 प्रमाणे सेवकांना सेवानियमांप्रमाणे द्यावयाचे लाभ जसे की भविष्य निर्वाह निधी, उपदान, रजा पगार इत्यादी. अशा खर्चाची प्रतिवर्षी संस्थांनी तरतूद करावी. अन्यथा एखाद्या आर्थिक वर्षात संस्थांचे काही कर्मचारी मोठ्या संख्येने सेवानिवृत झाल्यास व त्यांचे सेवानिवृत्ती लाभ हे एकाच आर्थिक वर्षात खर्ची पडल्यास संस्था खर्चाची विहित मर्यादा पाळू शकणार नाही.

**६. रौप्य महोत्सव, सुवर्ण महोत्सव खर्च :–** संस्था आगामी काळात रौप्य महोत्सव, सुवर्ण महोत्सव साजरा करणार असल्यास अशा खर्चासाठी संस्थेने कोणतेही नियोजन केले नसल्यास असा महोत्सव ज्या आर्थिक वर्षात साजरा होणार आहे, त्या आर्थिक वर्षात संस्थेने असा एकरकमी खर्च केल्याने त्यावर्षी विहित खर्चाची मर्यादा ओलांडण्याची शक्यता असते. तसेच असे खर्च हे काही चालू वर्षी खर्ची टाकण्याची बाब नाही किंवा असा खर्च ही काही कायदेशीर तरतूद नाही. सहकारी नियम ४९-अ मध्ये कोणत्या खर्चाची संस्थांनी तरतूद करावी. यामध्ये अशा खर्चाच्या तरतुदींचा अंतर्भाव नाही. असा खर्च संस्थांनी करण्याचे ठरविले असल्यास अशा प्रसंगापूर्वीच काही वर्षे अगोदर निव्वळ नफ्यातून म्हणजेच नफा वाटणीतून पुढे काही वर्षे त्यासाठी तरतूद करावी. वार्षिक सभेत त्यास मंजुरी घ्यावी. अशा निधीच्या विनियोगाचे नियम बनवून त्यास ही वार्षिक सभेची मंजुरी घ्यावी व अशा निधी निर्मितीचा उपविधीमध्ये समावेश नसल्याने अशा विनियोग नियमावलीस संबंधित निबंधक कार्यालयाची मान्यता घेणे उचित ठरते.

**७. देणगी/अंशदानः–** सामाजिक बांधिलकी हे सहकाराचे एक उदात्त तत्त्व असून सहकार कायदा कलम ६९ प्रमाणे सहकारी संस्था या सार्वजनिक प्रयोजनासाठी/धर्मादाय कारणासाठी देणगी / अंशदान देऊ शकतात. धर्मादाय या शब्दाच्या व्याख्येत गरिबांना मदत, त्यांचे शिक्षण, औषधोपचार, नवीन रस्त्यांची बांधणी, शाळेची इमारत, वाचनालये उघडणे, पूरग्रस्तांसाठी मदत करणे व तत्सम सार्वजनिक हिताच्या बाबींचा समावेश होतो. संस्थांनी देणगी देण्यास्तव सहकार कायद्यानेच परवानगी दिलेली आहे. अर्थात एखाद्या आर्थिक वर्षात कोणत्याही तरतुदीविना अशी रक्कम दिल्यास नफा तोटा खात्यावर विपरीत परिणाम होऊन संस्था विहित खर्चाची मर्यादा ओलांडण्याचा धोका असतो. तसेच कलम ६९ मध्ये देखील धर्मादाय निधी हा नफा विभागणीतूनच उभारणी करण्याची तरतूद आहे. तरी संस्थांनी आपल्या निव्वळ नफ्याच्या विनियोगातून ज्या त्या वर्षी २०% च्या मर्यादेत असा निधी उभा करावा व याच कलमात सांगितल्याप्रमाणे महाराष्ट्र राज्य सहकारी संघ, पुणे या राज्य शासनाने मान्यता दिलेल्या संस्थेकडे रीतसर प्रस्ताव दाखल करून तिच्या पूर्व-मान्यतेने सार्वजनिक प्रयोजनासाठी आपले योगदान द्यावे म्हणजे कायद्यातील तरतुदींचे पालनही होईल व विहित खर्चाची मर्यादाही ओलांडली जाणार नाही.

**✻ समारोप :–** Carrot Stick Policy प्रमाणे पतसंस्थांनी २%ची खर्चमर्यादा पाळल्यास तिला लेखापरीक्षण वर्गवारी निश्चिती परिपत्रकाप्रमाणे पूर्ण १५ गुण मिळतील व संस्थांनी ही मर्यादा ओलांडल्यास त्या प्रमाणात हे गुण कमी कमी होत जाऊन खर्चाच्या मर्यादेने ३% ची मर्यादा ओलांडल्यास संस्थेस शून्य गुण मिळतील. थोडक्यात मर्यादा पालनास्तव बक्षिस (Carrot) मिळेल व मर्यादा ओलांडल्यास एक प्रकारची छडी (Stick) मिळेल म्हणून सहकारी पतसंस्थांनी विहित खर्चाची मर्यादा पाळण्यासाठी वर्षारंभापूर्वी नियोजन करावे. वर्षभरात वेळोवेळी अशा खर्चाचा आढावा घेऊन त्याचे व्यवस्थापन करावे व आपला कारभार काटकसरीने करावा.

**– संतोष मानूरकर**
M.Com, CAIIB, D.T.M.,G.D.C.A
**विशेष लेखापरीक्षक वर्ग–२, सोलापूर**
**मो. नं. – ९८५०७ ८३९८३**

*****

# आर्थिक व्यवहारात नैतिकता आणि प्रामाणिकपणा हवा - सीए श्रीराम देशपांडे



**अंबाजोगाई –** आर्थिक व्यवहारात नैतिकता आणि प्रामाणिकपणा हा श्रीमंतीचा अलंकार असून नियोजन करताना जिद्द, चिकाटी यावर भर असला पाहिजे, असे सीए श्रीराम देशपांडे यांनी सांगितले.

येथील पूर्णवादी सहकारी बँकेच्या शाखा वर्धापन दिनानिमित्त आयोजित ग्राहक मेळाव्यात मंत्र श्रीमंतीचा या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. व्यासपीठावर बँकेचे अध्यक्ष डॉ. सुभाष जोशी, टॅक्स प्रॅक्टिशनर संघटनेचे अध्यक्ष विजय वालवडकर, भाजपा प्रदेश प्रवक्ते राम कुलकर्णी, संचालक ज्योतीश्वर भालेराव, विश्वंभर थिगळे, मुख्य कार्यकारी अधिकारी राजेश कुलकर्णी व्यवस्थापक महेश पारगावकर होते.

बँक अध्यक्ष डॉ. जोशी यांनी शाखेच्या आर्थिक वृद्धीबाबत माहिती सांगितली बँकेची सुरू असलेली वाटचाल,ग्राहक सभासदांचा असलेला विश्वास व समाजातील वेगवेगळ्या घटकांसाठी सुरू केलेल्या योजनांचा आढावा त्यांनी सादर केला.

आर्थिक उत्पन्न वाढवताना काय उपाययोजना केल्या पाहिजेत? यासाठी अनेक उदाहरणासहित देशपांडे यांनी पटवून देऊन. ते म्हणाले, गुंतवणुकीची क्षमता वाढते. अंगी असलेला आळस माणसाला श्रीमंत कधीच करू शकत नाही. व्यवसायाचा बारकाईने अभ्यास करावा. किमान सहा महिने खर्चाच्या नोंदी ठेवायला हवी. एकूण उत्पन्नापैकी वन थर्ड गुंतवणूक करत चला व संयम हाच खरा श्रीमंत उन्नतीचा मार्ग असल्याचे त्यांनी सांगितले. शाखाधिकारी शैलेश रुईकर यांनी सूत्रसंचालन केले.

## राज्य सहकारी संघ निवडणुकीत सहकार पॅनलची बाजी

**पुणे –** नुकत्याच पार पाडलेल्या महाराष्ट्र राज्य सहकारी संघाच्या संचालक मंडळाच्या पंचवार्षिक निवडणुकीत सहकार पॅनलने बाजी मारली आहे. एकूण २१ पैकी १९ जागा पॅनलने जिंकल्या आहेत. निवडणुकीच्या ९ जागा बिनविरोध निवडून आल्या आहेत तर दोन अपक्ष उमेदवार विजयी झाले आहेत. संचालकांच्या १२ जागासाठी एकूण ३० उमेदवार रिंगणात होते. प्रत्यक्षात ७०.८ टक्के मतदान झाले. राज्यातील १२ विभागात १४ केंद्रावर मतदान झाले.

## वाई अर्बन बँकेवरील आरबीआयचे निर्बंध शिथिल

**वाई –** कोरोना काळानंतर वाढलेल्या एनपीएमुळे कर्जवाटप आणि ठेवींवर मोठ्या प्रमाणावर निर्बंध लावण्यात आले होते. पण आता वाई अर्बन बँकेवरील आरबीआयचे निर्बंध शिथिल झाले आहेत, अशी माहिती बँक अध्यक्ष अनिल देव यांनी सांगितली. गेल्या चार वर्षांत बँकेने नुकत्याच संपलेल्या आर्थिक वर्षात नफा मिळविला आहे, असे ते म्हणाले.

निर्बंध कमी झाल्याने बँक आता चांगल्या कर्जदारांना कर्ज पुरवठा करू शकणार आहे असे नमूद करून ते म्हणाले, ठेवींच्या व्याज दरात वाढ करण्यात येणार आहे त्याचा फायदा ठेवीदार यांना होणार आहे. तसेच वाहन कर्जावरील व्याज दर कमी करण्यात आले असून गृह आणि व्यवसायसाठीच्या कर्जासाठी माफक व्याज दर असणार आहे. यावेळी उपाध्यक्ष डॉ. शेखर कांबळे आणि संचालक, अधिकारी उपस्थित होते.

# विश्वेश्वर बँकेचा नॅफकबकडून गौरव

**पुणे –** शेड्युल्ड दर्जा मिळाल्याबद्दल येथील विश्वेश्वर सहकारी बँकेला नवी दिल्ली येथील नॅफकब संस्थेच्या वतीने नुकतेच एका कार्यक्रमात गौरविण्यात आले आहे. बँक अध्यक्ष अनिल गाढवे, उपाध्यक्ष राजेंद्र मिरजे, तसेच बँक व्यवस्थापन मंडळ सदस्य यावेळी उपस्थित होते. बँकेने विविध योजना सुरू केल्या आहेत. बँकेच्या महाराष्ट्र आणि कर्नाटक राज्यात ३० शाखा कार्यरत आहेत, अशी माहिती अध्यक्ष गाढवे यांनी सांगितली.

# पलूस सहकारी बँकेचा एकूण व्यवसाय १ हजार ६२ कोटींपेक्षा अधिक

**सांगली, पलुस –** नुकत्याच संपलेल्या आर्थिक वर्षात पलूस सहकारी बँकेने एकूण व्यवसाय १ हजार ६२ कोटींपेक्षा अधिक केला आहे, अशी माहिती बँकेच्या ६० व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत सांगण्यात आली. तसेच ठेवी ६२० कोटी पेक्षा अधिक तर कर्ज वाटप ४४१ कोटी पेक्षा अधिक झाले आहे, असे बँक अध्यक्ष वैभव पुदाले यांनी सांगितले. शून्य टक्के एनपीए राखण्यात बँकेला यश मिळाले आहे, असे त्यांनी नमूद केले. मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल घारे यांनी अहवाल वाचन केले तर विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्यांचा यावेळी सत्कार करण्यात आला. मुकेश मुळे यांनी सूत्रसंचालन केले. चंद्रकांत गोंदिल यांनी आभार मानले.

## कर्मवीर भाऊराव पाटील पतसंस्था अध्यक्षपदी भारती चोपडे

**सांगली –** येथील कर्मवीर भाऊराव पाटील नागरी सहकारी पतसंस्था अध्यक्षपदी भारती चोपडे यांची तर उपाध्यक्षपदी एस. पी. मगदुम यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. सहय्यक निबंधक ए. एन. कोली अध्यक्षस्थानी होते. संस्थेच्या सध्या ६४ शाखा कार्यरत आहेत. संचालक रावसाहेब जिंनगोंडा पाटील यांनी स्वागत केले. मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल मगदुम यांनी आभार मानले.

## दि कोल्हापूर अर्बन को-ऑप. सहकारी बँकेत वेतन करार

**कोल्हापूर –** दि कोल्हापूर अर्बन को-ऑप. सहकारी बँक आणि आणि बँक कर्मचारी संघटना यांच्यात नुकताच वेतन वाढीबाबत करार झाला आहे. त्यानुसार कर्मचाऱ्यांना ६ टक्के वेतनवाढ करण्यात आली आहे. तसेच मागील थकबाकीपोटी तब्बल २.४४ कोटीचा फरक देण्यात येणार आहे. या करारामुळे कर्मचारी वेतनात साधारणपणे २००० ते ४५०० रुपये इतकी वाढ होणार आहे. हा करार १ जूले ते ३० जून ३० या कालावधीसाठी असणार आहे.

# सहकारी संस्थांच्यामुळे सर्वसामान्य जनतेच्या विकासाला हातभार

**सोलापूर –** सहकारी संस्थांच्यामुळे सर्वसामान्य जनतेच्या विकासाला हातभार लागला आहे, असे मत जिल्हा सहकारी पतसंस्था महासंघ अध्यक्ष दिलीप पतंगे यांनी सांगितले. आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष आणि सहकार दिनाच्या निमित्ताने सहकारी रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते. जिल्हा बँक प्रशासक कुंदन भोळे, महावीर बँक अध्यक्ष दीपक मुनोत, कामगार महासंघ अध्यक्ष शंकर चौगुले, गृहनिर्माण संस्था महासंघ अध्यक्ष जी. पी. कदम, सहायक निबंधक आबासाहेब गावडे उपस्थित होते. रॅलीचे दरम्यान सहकार गीत आणि जिल्हा बँक गीत लावण्यात आले.

# देवगिरी नागरी सहकारी बँकेस शेड्यूल्ड बँकेचा दर्जा - सदस्यांना १२ टक्के लाभांश



**छत्रपती संभाजी नगर –** देवगिरी नागरी सहकारी बँकेस प्राप्त झालेला शेड्यूल्ड बँकेचा दर्जा आणि इंटरनेट बँकिंगसाठी रिझर्व्ह बँकेकडून मान्यता मिळाली आहे. याबद्दल बँकेच्या ४२ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत उपस्थितांनी आनंद व्यक्त केला. बँक अध्यक्ष किशोर शितोळे यांनी सादरीकरणातून वर्षभराची कामगिरी सदस्यांसमोर मांडली. या सभेत सदस्यांना १२ टक्के लाभांश जाहीर करण्यात आला.

बँकेचे अध्यक्ष किशोर शितोळे यांनी पीपीटीच्या माध्यमातून बँकेची वर्षभरातील आर्थिक कामगिरी कर्जवाटप डिजिटल उपक्रम व सामाजिक योगदानाचे सविस्तर विवरण मांडले. ३१ मार्च अखेर बँकेचा एकूण व्यवसाय हा रु. २०४.०९ कोटीने वाढून रु. २४१९ कोटी इतका झाला आहे. एकूण व्यवसायात बँकेने ९.२१ एवढी वाढ केली आहे. ठेवींमध्ये १०.७७ टक्के तर कर्जात ६.९० टक्के वाढ झाली आहे. कर्ज ठेवीचे प्रमाण (सीडी रेशो) हा ६५ टक्के एवढा राखण्यात बँकेस यश मिळाले आहे. बँकेचा निव्वळ नफा हा रु. ३९.२४ कोटी एवढा आहे.

बँकेस नुकताच रिझर्व्ह बँकेतर्फे शेड्यूल्ड बँकेचा दर्जा मिळाला असून लवकरच इंटरनेट बँकिंग सेवा ग्राहकांसाठी कार्यान्वित करून देण्यात येईल सभासदांना सभा सुरू असतानाच १२% लाभांश देण्याचा ठराव पारित करून पुढील काही क्षणात सभासदांच्या खात्यात लाभांश जमा करण्यात आला.

सभेस महाराष्ट्र राज्याचे इतर मागास बहुजन विकास व दिव्यांग कल्याण मंत्री अतुल सावे यांची उपस्थित होते. त्यांनी देवगिरी बँकेच्या प्रगतीचे कौतुक करत सहकार क्षेत्रात बँकेचे स्थान मजबूत होत चालल्याचे नमूद केले. बँकेस शेड्यूल्ड बँकेचा दर्जा प्राप्त झाल्याबद्दल संचालक मंडळांचे अभिनंदन केले. बँकेचे सभासद व कर्मचारी यांच्या दहावी व बारावीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. या विद्यार्थ्यांना भेटवस्तू व प्रमाणपत्र देऊन त्यांचे अभिनंदन करण्यात आले.

बँकेचे आजी माजी संचालक, अनिल भालेराव, हरीश कुलकर्णी, धनजंय धामणे, रमेश जाधव, राम भोगले, पी. यू. कुलकर्णी, माजी आमदार नितीन पाटील, दामूअण्णा नवपुते, बापू घडामोडे, देवजीभाई पटेल, संजय गायकवाड, राजूभाऊ बागडे, सभासद उपस्थित होते. बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीण नांदेडकर यांनी सूत्रसंचालन केले. उपमुख्य कार्यकारी अधिकारी रूपेंद्र कोयाळकर यांनी आभार मानले. यावेळी उपमुख्य कार्यकारी अधिकारी दत्ता शिंदे यांच्यासह अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## भाविकांच्या सेवेसाठी सहकार भक्तिरथाचे लोकार्पण

**पंढरपूर –** श्री क्षेत्र पंढरपूरमध्ये श्री पांडुरंगाच्या दर्शनासाठी येणाऱ्या आणि त्यातही वृद्ध दिव्यांग, ज्येष्ठ महिला यांना मंदिरापर्यंत जाता यावे, यासाठी राज्य सहकारी बँकेच्या वतीने इ-बसची उपलब्धता करण्यात आली आहे. बसचे लोकार्पण नुकतेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. बँकेचे प्रशासक विद्याधर अनास्कर आणि आणि पदाधिकारी उपस्थित होते. एका अर्थाने हा सहकाराचा भक्तिरथ भाविकांच्या सेवेसाठी उपलब्ध करण्यात आला आहे.

याबाबत श्री विठ्ठल - रुक्मिणी मंदिर समितीच्या वतीने बँकेला सेवाभावी तत्वावर बस मिळण्याबाबत विनंती करण्यात आली होती. त्यावर बँकेने तत्काळ सकारात्मक प्रतिसाद देऊन बस उपलब्ध केली. बँकेच्या वतीने मुख्यमंत्री फडणवीस यांचा सन्मान करण्यात आला. सहकार राज्यमंत्री पंकज भोयर, आमदार अभिजीत पाटील, तसेच समितीचे पदाधिकारी उपस्थित होते. प्रशासक अनास्कर यांनी सांगितले की, बस पूर्णपणे वातानुकूलित असून बससाठी सुमारे २२ लाख रुपये खर्च झाला आहे. ही बस मंदिरास देणगी म्हणून भेट देण्यात आली आहे. बसचा फायदा भाविकांना होणार आहे.

## सहकारातून समृद्धी प्रत्यक्षात आणणे शक्य आहे



**नंदूरबार –** कष्ट आणि आर्थिक नियोजन केल्यास सहकारातून समृद्धी होते. पतपेढी समृद्ध व्हावी यासाठी कर्जदार उद्याचा ठेवीदार होईल. पं. दीनदयाल उपाध्याय पतपेढीचा प्रत्येक सभासद समृद्ध झाला पाहिजे. यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे, असे पतपेढीचे अध्यक्ष नानाभाऊ माळी यांनी सांगितले.

पतपेढीची वार्षिक सर्वसाधारण सभा झाली. व्यासपीठावर उपाध्यक्ष मोहन चौधरी होते. संचालक मंडळाच्या हस्ते दीप प्रज्वलन व भारत माता आणि पं. दीनदयाल उपाध्याय यांच्या प्रतिमेस माल्यार्पण करण्यात आले. अध्यक्ष माळी म्हणाले, चाळीस वर्षांपूर्वी लावण्यात आलेल्या रोपट्याचे वटवृक्षात रूपांतर होत आहे. सन १९८५ पासून सेवाभाव कायम ठेवून पतसंस्थेचे कार्य सुरू आहे. पतपेढीचे हित आणि सर्वांगीण विकासासाठी आगामी काळात सभासद कुटुंब मेळावा, आरोग्य शिबिर, प्रशिक्षण, पर्यटन विविध उपक्रमांना प्राधान्य देण्यात येईल. पतपेढीच्या सभासदांना प्राप्त नफ्यातून १५ टक्के लाभांश देण्यात येणार आहे. सभासदांचा व कर्जदारांचा विमा उतरवणे, गरजवंत सभासदांना वैद्यकीय मदत म्हणून दहा हजार रुपयांपर्यंत निधी देणे, अशा योजनांची माहिती सांगितली.

उपाध्यक्ष चौधरी म्हणाले, पतपेढीला सातत्याने ‘अ’ वर्ग मिळाला असून एनपीए शून्य टक्के आहे. संचालक रणवीरसिंग पाडवी यांनी आगामी वर्षासाठीच्या अंदाज पत्रकाचे वाचन केले. सचिव पांडुरंग माळी यांनी इतिवृत्त वाचले. संचालक आनंदा माळी, मुकेश मराठे, प्रसाद बेहेरे, भगवान बागुल, राधेश्याम सोनार, संचालिका जयश्री माळी, कल्पना फटकाळ उपस्थित होते. संचालिका पुष्पा पटेल यांनी आभार मानले.

# शाखाधिकारी - संस्था हित आणि संवादाचा सेतू

शाखाधिकारी हा प्रत्येक पतसंस्थेचा चेहरा असतो, या चेहऱ्यासोबतच त्याचे सहकारी (स्टाफ) असतात. त्यांच्याशी शाखाधिकाऱ्यांची वागणूक कशी आहे, यावर पतसंस्थेची-शाखेची वृद्धी अवलंबून असते. शाखाधिकारी हसरा असावा, बोलका असावा, अभ्यासू असावा या बरोबरच तो आपल्या सहकाऱ्यांशी चांगला संवाद साधणारा, त्यांचे हित जपणारा, वेळप्रसंगी कमीपणा घेऊन, त्यांना मोठेपणा देणारा असायला हवा, त्यांच्या आनंदात आपला आनंद, तर त्यांच्या दुखा:त पाठीराखा असावा.



**वासुदेव काळे**
**९८२२८ ३७०२५**

शाखाशिकारी हा सहकाऱ्यांवर विश्वास ठेवणारा याबरोबरच ज्ञानदाता, मनापासून शिकवणारा असला पाहिजे. अधिकार देताना मोठ्या मनाचा असेल तर सहकारी शंभर टक्के साथ देतात.

मधुर संवाद कौशल्य ठेवणारा, सहकाऱ्यांवर विश्वास ठेवणारा व त्यांच्या गुणगौरवात सर्वांत पुढे असेल तर सहकारी झोकून काम करतील. या बरोबर कामाचा आदर्श घालून देणारा, दिशादर्शक व संस्था हितामध्ये तडजोड न करणा असेल तर सहकारी त्याचा आदर करतात. सहकाऱ्यांचे शाखाधिकाऱ्यांच्या हालचालींवर/कामाच्या पद्धतींवर लक्ष असते, ते त्याचेच अनुकरणही करत असतात.

सहकाऱ्यांना शाखाधिकाऱ्यांचा प्रेमळ धाक असायला हवा, वचक असायला हवा पण तो कार्यकृतीतूनच! न धाक, दडपशाही, अबोला धरून, ग्रुपिंग करून, त्यांना टाळून!






आपला आनंद त्यांच्यात वाटायला शिकलं पाहिजे, सर्वांना सोबत घेऊन सेलिब्रेशन करायला शिका. त्यांचे वाढदिवस, आनंदाचे क्षण त्यांच्या अगोदर शाखाधिकाऱ्यांनी नोंद घेऊन साजरे केले तर त्यांच्या मनात आपोआप आदरभाव निर्माण होईल. संस्थेचे वरिष्ठ ज्या सूचना देतात, आदेश देतात त्याचे पालन करताना शाखाधिकाऱ्यांची देहबोली कशी आहे, चेहऱ्यावरील हावभाव काय असतात, वरिष्ठ संस्थेतून बाहेर गेल्यानंतर ते आपल्या वरिष्ठांबद्दल काय भावना व आदर ठेवून आहेत, याकडे त्यांचे लक्ष असते.

सर्व सहकाऱ्यांना समान न्याय हा कामाचा स्थायीभाव ठेवणे आवश्यक असते. आपल्या सोबत कितीही स्टाफ काम करत असला तरी त्याच्या जबाबदारीत, टेबल वाटपात, अधिकारात वारंवार बदल करणे, त्यांचे अधिकार गोठवणे या कृती शाखाधिकाऱ्यांप्रती नाराजी वाढवणाऱ्या अविश्वास निर्माण करण्याबरोबरच त्यांची मॅनेजमेंटवरील श्रद्धाही डळमळीत करणाऱ्या असतात. कारण शाखाधिकारी मॅनेजमेंटला विचारून, चर्चा करुन हे निर्णय घेत असतो. याचे भान शाखाधिकाऱ्यांनी ठेवणे आवश्यक आहे.

**❊ ग्राहक हित सर्व प्रथम** – हा कार्यमंत्र असला पाहिजे. ग्राहकांच्या समस्या त्वरित निकाली काढणे, पारदर्शी सेवा देण्यावर भर देणे, त्यांना सन्मानपूर्वक वागणूक देणे, हसतमुख राहाणे हे आपल्या सहकाऱ्यांच्या मनावरही कार्यमंत्र म्हणून रुजवणे याची जबाबदारी शाखाधिकारी यांची असते.

**❊ दुवा** – मॅनेजमेंट व स्टाफ यांच्यामधील दुवा म्हणून काम करणारा शाखाधिकारी प्रिय असतो न की, गैरसमज पसरवणारा! आपल्यापेक्षा एक रुपया आपल्या सहकाऱ्यांना विविध अलाऊन्समधून कसा जास्त मिळेल, याकडे त्याने लक्ष देणे आवश्यक आहेच पण त्यासाठी तो सपोर्ट असावा. कामाच्या बाबतीत तो सर्व सहकऱ्यांना मदत करणारा, मार्गदर्शन करणारा असण्याबरोबरच सर्व कामात परिपूर्ण असायला हवा. शाखातील सहकाऱ्यांना त्याच्या पदानुसार, पदभारानुसार, सिनिऑरीटीनुसार जबाबदारी व योग्य तो आदर, सन्मान करणारा असेल तर सर्व सहकारी स्वत:ला सुरक्षित समजतात.

पतसंस्थेच्या शाखा जेवढ्या जास्त तेवढे याबाबत दक्ष राहाण्याचे मॅनेजमेंटचे धोरण असायला हवे. सहकार हा एकच धर्म, एकच पंथ हा मूलमंत्र ठेवणे महत्वाचे! शाखाधिकारी यांना सर्व सहकाऱ्यांना समजून घेताना तारेवरची कसरत करावी लागते. त्यांना एकाच वेळी ग्राहक, शाखा, स्टाफ, मॅनेजमेंट व इतर जबाबदाऱ्यांची सांगड घालावी लागते, वारंवार वरिष्ठांनी त्याच्यासोबत चर्चा! मीटिंग करायला हव्यात, सकारात्मकता, ऊर्जा देणाऱ्या, कामाला दिशा मिळेल अशा ट्रेनिंगमध्ये वारंवार त्यांना सहभागासाठी पाठवायला हवे. यातून पतसंस्था, शाखांची वृद्धी तर होईलच व शाखाधिकारी परिपक्व, अनुभवसंपन्न, कृतिशील होतील.


**– वासुदेव काळे.**
**श्री सिद्धीविनायक पतसंस्था परिवार, श्रीरामपूर. संचालक – महाराष्ट्र राज्य सह. पतसंस्था फेडरेशन.**
**अध्यक्ष – सहकार भारती, अहिल्यानगर (उ) जिल्हा.**
**मो. नं. – ९८२२८ ३७०२५**


❊❊❊❊❊

## महावीर सहकारी पतसंस्थेने ११३ कोटी ठेवीचा टप्पा ओलांडला

**सांगली –** येथील महावीर सहकारी पतसंस्थेने ११३ कोटी ठेवीचा टप्पा नुकताच ओलांडला आहे. तसेच संस्थेच्या सर्व शाखांमध्ये वीज बिल भरणा सुविधा सुरू करण्यात आली आहे अशी माहिती संस्थेचे अध्यक्ष राजगोंडा पाटील यांनी सांगितली. संस्थेने बिनविरोध निवडणुकीची परंपरा कायम ठेवण्यात यश मिळविले आहे.

संस्थेचे भाग भांडवल ३ कोटी २२ लाख असून राखीव निधी २ कोटी १२ लाख आहे. ठेवी ११३ कोटी ४९ लाख तर कर्ज ८७ कोटी ३७ लाख आहे. गुंतवणूक ३८ कोटी २१ लाख तर खेळते भांडवल १३२ कोटी १६ लाख आहे. निव्वळ नफा ६१ लाख २८ हजार इतका झाला आहे. तसेच एनपीए शून्य टक्के ठेवण्यात यश मिळाले आहे. संस्थेच्या सध्या १४ शाखा कार्यरत आहेत. तसेच विविध पुरस्काराने संस्थेला सन्मानित करण्यात आले आहे, असे ते म्हणाले.

## पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचा वैकुंठभाई मेहता पुरस्काराने गौरव

**पुणे –** पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेला नुकतेच वैकुंठभाई मेहता पुरस्काराने गौरविण्यात आले आहे. बँक अध्यक्ष डॉ. दिगंबर दुर्गाडे, उपाध्यक्ष सुनील चांदेरे, तसेच अन्य संचालक यांनी पुरस्कार स्वीकारला. राज्य सहकारी बँक असोसिएशनच्या वतीने पुरस्कार प्रदान करण्यात आला. नाबार्डच्या वतीने बँकेला उत्कृष्ट जिल्हा बँक म्हणून पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात आले आहे. बँकेने ठेवी, कर्ज, वसुली, स्वनिधी नफा, नेटवर्थ, एनपीए, सीडी रेशो या सर्व क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी नोंदविली आहे.

## स्टेट बँक नगर सहकारी गृहरचना सोसायटी अध्यक्षपदी लक्ष्मण लोहकरे पाटील

**पुणे –** स्टेट बँक नगर सहकारी गृहरचना सोसायटीच्या नुकत्याच झालेल्या पंचवार्षिक निवडणुकीत श्री सिद्धिविनायक पुनर्विकास पॅनेलने सर्व जागा जिंकून घवघवीत यश मिळविले आहे. सोसायटीच्या अध्यक्षपदी लक्ष्मण लोहकरे पाटील यांची सलग दुसऱ्या वेळेस निवड करण्यात आली आहे. सचिव म्हणून प्रमोद पवार आणि खजिनदारपदी भगवान गायकवाड यांची निवड करण्यात आली आहे. यावेळी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून सचिन चव्हाण यांनी काम पाहिले.

## माळेगाव सहकारी साखर कारखान्यावर श्री नीलकंठेश्वर पॅनलची बाजी

**पुणे –** बारामती तालुक्यातील माळेगाव सहकारी साखर कारखान्यांच्या निवडणुकीत राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार गटाच्या नेतृत्वाखाली श्री नीलकंठेश्वर पॅनलने बाजी मारली. एकूण २१ जागांपैकी २० जागांवर घवघवीत यश मिळविले आहे तर कारखान्यांच्या अध्यक्षपदाची धुरा उपमुख्यमंत्री पवार यांच्याकडे आली आहे.

कारखान्याच्या उपाध्यक्षपदी संगीता कोकरे यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. दोनही पदासाठी प्रत्येकी एकेक अर्ज दाखल झाल्याने दोन्ही पदांची निवडणूक बिनविरोध पार पडली. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून यशवंत माने यांनी काम पाहिले. कारखान्याचे माजी पदाधिकारी तसेच अधिकारी यावेळी उपस्थित होते. नूतन पदाधिकाऱ्यांचे सभासदांनी तसेच हितचिंतकांनी अभिनंदन करून आगामी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.


## सहकार भारती सहकार प्रशिक्षण सहकारी संस्था मर्या; कराड
### (शासन मान्यताप्राप्त शिखर प्रशिक्षण संस्था)

मान्यताप्राप्त शिखर प्रशिक्षण संस्था म्हणून महाराष्ट्र शासनाने आमच्या प्रशिक्षण संस्थेचे नाव अधिसूचित केले आहे. अधिसूचित संस्थेकडून सहकारी संस्थांनी प्रशिक्षण घेणे अनिवार्य आहे. नागरी सहकारी बँका, सहकारी पतसंस्था, गृहनिर्माण संस्था इ. सर्व संस्थाकरिता संचालक, पदाधिकारी, कर्मचारी व सभासदांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम घेतले जातात.

### *नागरी सहकारी बँकांसाठी*

आमची संस्था बँकेच्या गरजेप्रमाणे दर्जेदार प्रशिक्षण कार्यक्रमांचे आयोजन बँकेच्या ठिकाणी जाऊन करते. अन्य प्रशिक्षण कार्यक्रमांबरोबरच नवीन भरती, स्टाफसाठी प्रारंभिक प्रशिक्षण कार्यक्रम, पदोन्नतीपूर्व प्रशिक्षण तसेच **पदोन्नती परीक्षांचेही वाजवी दरात आयोजन करते.** तरी याचा लाभ सहकारी बँकांनी घ्यावा. वरील सेवांसाठी कृपया संपर्क साधावा.

**श्री. व्यंकटेश कुलकर्णी (प्रशिक्षण प्रमुख) – ९४०३० ८०७५१**

**श्री. माधवेंद्र कोरडे – (फक्त मेसेजसाठी) ९८५०५ ७१४०५**

* **प्रशिक्षण कार्यालय –** फ्लॅट नं. ३, रामेश्वर अपार्टमेंट, साई सर्व्हिस पेट्रोल पंपामागे, पूलाची वाडी, डेक्कन जिमखाना, पुणे ४११ ००४ ई–मेल : sahakarbharati1416@gmail.com

# वणा नागरीक सहकारी बँकेला वसंतदादा पाटील उत्कृष्ट सहकारी बँक पुरस्कार प्रदान



**हिंगणघाट –** वणा नागरिक सहकारी बँकेला आर्थिक वर्षे २०२३-२०२४ या वर्षाचा महाराष्ट्र स्टेट को-ऑप. बँक असोसिएशनचा नागपूर विभागामधून पद्मभूषण कै. वसंतदादा पाटील उत्कृष्ट नागरी सहकारी बँक पुरस्कार नुकताच प्रदान करण्यात आला.

मुंबई येथे महाराष्ट्र राज्याचे सहकारी मंत्री बाबासाहेब पाटील यांच्या अध्यक्षतेखाली आणि महाराष्ट्र राज्याचे सहकार राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर सारस्वत को-ऑप. बँक अध्यक्ष गौतम ठाकूर यांच्या उपस्थितीमध्ये बँकेचे संस्थापक अध्यक्ष सुधीर कोठारी यांनी पुरस्कार स्वीकारला.

बँकेजवळ ५८९ लक्ष भाग भांडवल, ठेवी २४८ कोटी तर कर्जवाटप १७२ कोटी आणि गुंतवणूक ९१ कोटी तर निव्वळ नफा हा ५०२ लक्ष झालेला होता. बँकेचे संस्थापक अध्यक्ष सुधीर कोठारी यांनी मनोगत व्यक्त केले.

बँकेला मिळालेल्या या पुरस्काराबद्दल सुधीर कोठारी, बँकेचे संचालक मंडळ डॉ. निर्मेश कोठारी, सुरेश सायंकार ओमप्रकाश डालीया, डॉ. दिलीय जोबनपुत्रा, हिम्मतराव चतुर, विपीन पटेल, अक्षय ओस्तवाल, सुरेश नैतानी, अविनाश गांधी, डॉ. वरूण लोढा, मनिष चितलांगे, ज्ञानेश्वर लोणारे, सिद्धार्थ दारूंडे, विद्या उत्तमराव भोयर, पूनम महादेवराव बादले यांचे अभिनंदन केले.

# हिंगणघाट सहकार भारतीच्या बैठकीत विविध विषयांवर व्यापक चर्चा

**हिंगणघाट –** हिंगणघाट सहकार भारतीच्या बैठकीत विविध विषयांवर व्यापक चर्चा करण्यात आली. अध्यक्षस्थानी हिंगणघाट तालुका सहकार भारती अध्यक्ष रामदास खेकारे तर प्रमुख अतिथी वर्धा जिल्हा सहकार भारती अध्यक्ष प्रभाकर कोळसे, महामंत्री श्यामकुमार खत्री, तालुका सहकार भारती उपाध्यक्ष अनिल चौधरी होते.

उपाध्यक्ष अनिल चौधरी, तानाजी अर्बनचे नंदकुमार सिंगरु, एरा अर्बनच्या सपना जाना, प्रा. लिना शेंडे, महिला बँकेच्या व्यवस्थापक सोनाली मुसळे, पौर्णिमा सिंगरु, शंकर चंदनखेडे, निखील धोटे, प्रतिक ढोकपांडे, रुपेश बुट्टे, संजय तराळे, शेखर दाते, आचल थुल, इंद्र मोटवानी, योगिता दलाल, पुनम कळमकर, प्रांजल भजभुजे, साक्षी जांबुतकर, स्वेता वकील उपस्थित होते. वर्धा येथे पार पडलेल्या जिल्हा कार्यकारिणी बैठकीची माहिती खेकारे यांनी सांगितली. सूत्रसंचालन तानाजी अर्बन नागरी सह पतसंस्थेचे संस्थापक नंदकुमार सिंगरु तर आभार अनिल चौधरी यानी मानले.


## दि इचलकरंजी इंडस्ट्रियल को-ऑप. इस्टेट लिमिटेड; इचलकरंजी

रजि. नं. पी २९६९/१०/१९५९

उद्योगनगर, इचलकरंजी ४१६ ११५ फोन नं. (०२३०) २८३६४१७ / २४३६४१८

**संस्थेचे अधिकृत शेअर भांडवल**
रुपये ९ कोटी

**खपलेले शेअर भांडवल**
रुपये २,९१,२१,०७७/-

**सभासद संख्या**
४३५७

**संस्थेने सामाजिक कार्यासाठी उपलब्ध करून दिलेल्या जागा व इमारती**

१) फुलचंद शहा गार्डन
२) कै. बाबासाहेब खजिरे स्मृतीभवन
३) कै. बाबासाहेब खजिरे शिक्षण संस्थेचे नाईट कॉलेज
४) समाजवादी प्रबोधिनी
५) उद्योगनगर पोष्ट ऑफिस
६) विमा योजना हॉस्पिटल
७) मेडीकल असो. टी.बी. क्लिनीक
८) कॉमन हॉल ७
९) सहकारी बँका - ७
१०) इन्शुअरन्स ऑफिस - २
११) वैद्यमापन शास्त्र ऑफिस (वजन माप)
१२) पेट्रोल डिझेल पंप विभाग २
१३) औद्योगिक ट्रेनिंग सेंटर

**औद्योगिक वसाहतीची जमीन**
३८।। एकर, ६८ एकर व १०० एकर

**प्रदीप बाळासो पोवार** मॅनेजर | **महादेव शंकर कांबळे** व्हा. चेअरमन | **राहुल प्रकाश खजिरे** चेअरमन

**✻ संचालक मंडळ ✻**

श्री. सुनिल सातगोंडा पाटील, श्री. सागर विजय कोईक, श्री. प्रकाश राजाराम नवनाळे, श्री. आदाप्पा भरमू हांडे, श्री. राजेंद्र महादेव बिद्रे, श्री. आनंद गिरधारीलाल मालू, श्री. उदय शंकर आदर्शे, श्री. विजयकुमार रामस्वरुप पारीक, श्री. निलेश बापूलाल चंगेडिया, श्री. सुहेल दस्तगीर बाणदार, श्री. किरण हिंदुराव कांबळे, श्रीमती उमा रविंद्र मुरदंडे, सौ. हसिन रियाज गैबान.

**✻ संस्थेचे सर्व सभासद व कर्मचारी वर्ग ✻**

# को-ऑपरेटिव्ह आणि एनबीएफसी

Non Banking Finance Companies - एनबीएफ सी - बिगर बँकिंग वित्तीय कंपन्यांची कर्ज वितरण प्रक्रिया जलद असल्याने बरेचदा सहकारी बँकांकडे जी कर्ज प्रकरणे पूर्वी येत होती ती आता अशा कंपनीकडून कर्ज घेऊ लागली आहेत. त्याचा नकारात्मक परिणाम सहकारी बँकांना भोगावा लागत आहे.




**वंदना धर्माधिकारी**
९८९०६ २३९१५


दोन्हींचा स्टेट्स वेगळा आहे, कार्य कृती उत्पन्न आणि नफा सर्व भिन्न भिन्न आहेत. दोन्हीवर आरबीआयचा वर्चस्व आहे. काही बंधने एनबीएफसी यांना आहेतच. त्यांना बँकेचे दर्जा दिलेला नसल्याने काही बंधने आहेत. ओळख बँक म्हणून नाही. त्याने ते चेकबुक देऊ शकत नाहीत. सहकारी बँकांसमोर आणखीन एक प्रतिस्पर्धी म्हणून कंपन्या उभ्या ठाकल्या. काही अटींवर काही कंपन्या समाजातील गरजूंना कर्जाऊ रक्कम देण्यास पात्र ठरवल्या आहेत.

सुरूवातीला काही ठराविक कर्ज देता देता आता त्यांच्याकडून इतर काही गरज पुरविण्यासाठी कर्ज मंजुरी होताना दिसते. तेव्हा अनेकजण बँकांकडे न जाता एनबीएफसीकडून कर्ज मागणी करताना दिसतात. त्यामुळे बँकांसमोर प्रतिस्पर्धी त्रासदायक ठरू लागला आहे. कंपनीकडे अत्यावश्यक टेक्नॉलॉजी सहज उपलब्ध आहे. त्याबरोबर शिक्षित मनुष्यबळ आहे, हा नाही तर लगेच दुसरा कोणीतरी ते काम करू शकतो. त्यामुळे कामे पटापट कामे होतात. प्रपोजल छाननी कमी वेळात जलद गतीने होते. थोड्या प्रश्नांवर मंजुरी लगेचच, त्यामुळे लोकांना तिथून कर्ज घेणे अधिक सोयीचे, विना चौकशीचे, सोपी कागदपत्रे असे सहजगत्या मिळणारे कर्ज घेणे सोयीस्कर वाटणारच. यामध्ये आधारकार्ड ओळख पटकन होते, ऑनलाईन माहिती पुरवली जाते, नवीन खाते सहज काढले जाते, ठराविक फॉर्म भरून ईमेल वा व्हॉट्सपवर सर्व ते पुरवले जाते. संवाद होतो, थोडकी कागदपत्रे देऊन मंजुरीचा मेसेजदेखील मोबाईलवर झळकतो. पैसे पाठवायला मिनिट पुरते. आपोआप काही मिनिटांत कर्ज रक्कम खात्यात आल्याचा आनंद वेगळाच अनुभवला जातो. ते बँकेत जाणे नको, तिथल्या स्टाफबरोबर चर्चा नको, त्यांचे प्रश्न नको, की अधिकारी मंडळींशी बोलणे नको.

✻ **फिनटेक कंपन्या** - इलेक्ट्रॉनिक डिजिटल आर्थिक व्यवहार करताना पैशांची देवाणघेवाण महत्त्वाची असते. अशा व्यापारांसाठी आवश्यक टेक्नॉलॉजी देण्याचे महत्त्वाचे जबादारीचे काम फिनटेक कंपन्यांकडून देण्यात येते. ग्राहकांच्या दृष्टीने सोयीस्कर अशा सुविधा दिल्या जातात. वित्तीय कंपन्यांकडून सर्व प्रकारच्या आर्थिक क्षेत्रांशी अत्यावश्यक असलेली टेक्नॉलॉजी देण्यात येते. जी अतिशय महत्त्वाची गोष्ट बँकांसह अशा कंपन्यांना देखील लागतेच लागते. तेव्हा फिनटेक कंपन्यांनादेखील नव्याने अधिक प्रमाणात एनबीएफसीबरोबर काम करणे ओघाने आले आहे.

जे काम बँकांकडून केले जाणे अपेक्षित असते. ते काम इथे मोबाईलवर केल्याने बँकेकडे कर्ज मागणी करणाऱ्या लोकांची संख्या दिवसेंदिवस घटत चालली आहे. संपूर्ण देश मोबाईल प्रेमी झाला. त्याने सर्वप्रकारे त्याचा उपयोग करायला सुरुवात करूनही बराच काळ झाला. त्याचा फायदा एनबीएफसीकडून कर्ज घेताना दिसतो, तेव्हा नवीन तंत्रज्ञानाची निकड त्वरित पूर्ण करण्यासाठी बँकांना धावपळ करावी लागत आहे. डिजिटल बँकिंग ही काळाची गरज आहे. सहकारी बँकांनीदेखील डिजिटल सेवा उत्तम रीतीने देत आहेत. अनेक सहकारी बँका टेक्नॉलॉजी आधारित बँकिंग यशस्वी करीत आहेत. बँकांवर इतरही बंधने असतात, नवीन तंत्रज्ञान माहीतगार कर्मचारी भरती करणे आवश्यक झाले. तेही केले जाते. नवीन कर्जाची गरज असलेली व्यक्ती शोधून त्याला बँकेकडे आणणे महत्त्वाचे झाले आहे. त्यांना सगळेच लवकर हवे असते, कमी वेळ, कमी खर्च आणि मोठे कर्ज, त्यावर व्याजदरासह इतर सवलती देणे सहकारी बँकांना करणे शक्य नसते.

कर्ज वसुली आखीवरेखीव पद्धतीने केली जाते. आधीच फोन करून हप्त्याची आठवण केली जाते. त्यामुळे हप्ता चुकविणे जरा कर्जदाराला अवघड जाते. इथे कर्ज व्याजदर बँकांच्या दरापेक्षा बहुतेक ठिकाणी अधिक असतो. बँकेतील व्याज आकारणी पद्धत आणि कंपनीची पद्धत वेगवेगळी असते. त्यातील फरक कर्जदारास समजेलच असे नाही. ते कर्ज नक्कीच ग्राहकास महाग पडते. विविध प्रकारचे चार्जेस घेतले जातात, त्याची आधी कल्पना दिली असेलच असेही नसते.

ज्या सहकारी बँकांनी भविष्याची गरज ओळखून दहा वर्षांपूर्वीच तंत्रज्ञानाचा स्वीकार केला असेल डिजिटल सेवा, सुविधा, ग्राहकसेवा, कर्ज मंजुरी वाटप, वसुलीसह इतर सर्व गोष्ट त्यांनी अवगत केलेल्या आहेत. हे सगळे पाहता बँकिंग सेक्टरमध्ये अजूनही खूप काही करायला जागा आहे, भारतीय रिझर्व्ह बँकेने सहकारी मंत्रालय स्थापन केल्याने सर्वच सहकारी बँका गरुड झेप घेण्याच्या तयारीत आहेत. रिझर्व्ह बँक आणि मंत्रालय दोन्हीमुळे नक्कीच नजीकच्या भविष्यात अधिकाधिक प्रगती बँकिंग क्षेत्रात नजरेत येणार आहे.


**वंदना धर्माधिकारी**, Vandana10dyahoo.co.in
M - 9890623915 ✻✻✻✻



**पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित, पुणे**

स्थापना ४ सप्टेंबर १९१७
मुख्य कार्यालय - ४ ब, बी.जे.रोड, पुणे - ४११ ००१
फोन नं. : ०२० २६३०४१०० www.pdccbank.com

**१०७ वर्षांचा गौरवशाली इतिहास असणारी देशातील अग्रगण्य जिल्हा बँक**

✻ **बँकेच्या विविध कर्ज योजना** ✻
- शेतीपूरक कारणासाठी अ. मु. कर्ज
- वाहन कर्ज
- सोनेतारण कर्ज
- शेतीकर्ज - शासकीय अनुदानित कर्ज योजना - १०.५०%
- व्यावसायिक कॅश क्रेडिट
- ग्राहक उपयोगी वस्तू कर्ज
- औद्योगिक कर्ज
- गृह कर्ज

✻ **बँकेच्या अत्याधुनिक सुविधा** ✻
- एनी ब्रँच बँकींग
- आरटीजीएस
- एनईएफटी
- मोबाईल बँकींग
- यूपीआय सुविधा
- ई-कॉमर्स
- लॉकर सुविधा उपलब्ध

✻ किफायतशीर व्याजदर ✻ जलद कर्ज पुरवठा ✻ सुलभ कर्ज प्रक्रिया

**बँकेची आर्थिक स्थिती ३१/०३/२०२५ अखेर**
- ठेवी - १४७६६.८४ कोटी
- कर्जे - १२०५९.०३ कोटी
- एकूण व्यवसाय -२६८२५.८७ कोटी

**आकर्षक व्याजदर**
दि. २३/०६/२०२५ पासून ठेवीवरील व्याजदरात वाढ २ वर्षांकरिता ७.००% (ज्येष्ठ नागरिकांना अधिक १% व्याजदर)

✻ **विद्यमान संचालक मंडळ** ✻

मा.प्रा.डॉ. दिगंबर गणपत दुर्गाडे – अध्यक्ष
मा. सुनील काशिनाथ चांदेरे – उपाध्यक्ष
मा. अनिरुद्ध यशवंत देसाई – मुख्य कार्यकारी अधिकारी

अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा.

**सहकार सुगंध मासिकात माहिती देणे, वर्गणी भरणे तसेच जाहिरातींसाठी जिल्हा प्रतिनिधींशी संपर्क साधावा ही विनंती - संपादक**

**श्री. संतोष गावंडे :** रिजनल हेड (विदर्भ) 9420116337

**श्री. विनायक भिसे :** रिजनल हेड (पश्चिम महाराष्ट्र व कोकण) 9923396312

| पश्चिम महाराष्ट्र विभाग | | |
|---|---|---|
| रहाटणी, पुणे | श्री. डी. एस. कुलकर्णी | 9420655316 |
| पिंपरी चिंचवड | श्री. शिरीष लिपारे | 9762830555 |
| इचलकरंजी | श्री. प्रशांत कुलकर्णी | 9421172965 |
| सोलापूर जिल्हा | श्री. चंद्रकांत धोंडे | 9881139150 |
| संगमनेर | श्री. विजय भिडे | 9975516360 |
| बेलापूर, जि. नगर | श्री. अरविंद शहाणे | 9922707677 |
| सातारा | श्री. विनायक भिसे | 9923396312 |
| **कोकण विभाग** | | |
| मुंबई-अंधेरी | श्री. रामकृष्ण आवारे | 9619318544 |
| मुंबई-विक्रोळी | श्री. प्रभाकर कांबळे | 9594293734 |
| मुंबई-जोगेश्वरी | श्री. गणेश खिलारे | 9322161526 |
| मुंबई-बोरिवली | श्री. केशव खाडे | 9969825835 |
| डोंबिवली | श्री. संदीप गव्हाणे | 7738449033 |
| पालघर | श्री. सदानंद पावगी | 8888880680 |
| मुरूड, जंजिरा | श्री. मेघराज जाधव | 9561710445<br>9421164777 |
| मुंबई-सायन | श्री. भरत चिंचोले | 7021862169 |

| उत्तर महाराष्ट्र विभाग | | |
|---|---|---|
| जळगाव | श्री. विश्वास कुलकर्णी | 9922653022 |
| पिंपळनेर, धुळे | श्री. सुर्यकांत जगताप | 9552570515 |
| नंदूरबार | श्री. महादू हिरणवाळे | 9823842991<br>8208147121 |
| नाशिक | श्री. राजीव चंद्रात्रे | 9403261226 |
| नाशिक | श्री. नितीन बीबीकर | 9665778497 |
| **मराठवाडा विभाग** | | |
| छत्रपती संभाजीनगर | श्री. योगेश भोसले | 9421704116 |
| पैठण | श्री. देवेश इनामदार | 9404981212 |
| लातूर | श्री. शरद दिवे | 8275020460 |
| परभणी | श्री. संतोष पाथरीकर | 9763012439 |
| परभणी | श्री. मंगेश पाठक | 8149355759 |
| जालना | ॲड. दशरथ इंगळे | 9422723784 |
| **विदर्भ विभाग** | | |
| नागपूर | श्री. महेश राव | 9545741474 |
| यवतमाळ | श्री. संतोष गावंडे | 9420116337 |
| भंडारा | श्री. मुकुंदा पांढरीपांडे | 9420514872 |

## सहकारी संस्थांना अत्यंत उपयुक्त खालील पुस्तके सहकार सुगंध कार्यालयात विक्रीसाठी उपलब्ध आहेत.

| क्र. | पुस्तकाचे नाव | किंमत |
|---|---|---|
| १ | सहकार महर्षी ग्रंथ | १५००/- |
| २ | सहकार बँकांचे कर्ज व्यवस्थापन | ३५०/- |
| ३ | नागरी सहकारी बँकेचे प्रशिक्षण | १२५/- |

**पुस्तकांसाठी संपर्क : ८८०५९ ८१६७३**

वरील पुस्तकांसाठी रक्कम तसेच सहकार सुगंधची वर्गणी भरण्यासाठी सहकार सुगंधच्या वरील जिल्हा प्रतिनिधींशी संपर्क साधावा किंवा खालील बँक खात्यात रक्कम जमा करण्यासाठी खालील क्यूआर कोड वापरावा.

सहकार सुगंधची वर्गणी १ जानेवारी २०२५ पासून-
**वार्षिक रु. ७००/- त्रैवार्षिक रु. १८००/-**

**UPI ID**
**SahakarSugandha@DNSbank**

**A/c Name : Sahakar Sugandha**
**Bank Name : Dombivali Nagari Sahakari Bank Ltd.**
(Sihagad Road, Pune Branch)
**Current a/c No. : 078011100000065**
**IFS Code - DNSB0000078**

**UPI ID**
**SahakarSugandha@SBI**

**A/c Name : Sahakar Printing & Publications Pvt. Ltd.**
**Bank Name : State Bank of India**
(Hingne Khurd, Pune Branch)
**Current a/c No. : 36931889346**
**IFS Code - SBIN0007159**

**कृपया वर्गणी जमा केल्यानंतर आपला नाव व पत्ता पुढील ई मेलवर कळवा. sahakar.sugandha@gmail.com**

**महाराष्ट्रात जिल्हा प्रतिनिधी नेमणे आहेत. संपर्क : ८८०५९८१६७३**

AURO®
SINCE 1948

ISO CERTIFIED
ISO
ISO 9001 : 2008

BIS Certified
IS : 550 CM/L.No.7200069405
IS : 550 CM/L.No.3740863
IS : 550 CM/L.No.2863066
IS : 550 BIS Certified



SALES & SERVICES

ALL MAHARASHTRA REGION

CASH SAFE I GOLD SAFE I VAULT I LOCKER CABINET
JEWELLER'S SAFE I PETROL PUMP SAFE

Our trusted partners for 75 years

Bank of Baroda | Union Bank | UCO BANK | HDFC BANK | DCB BANK | RBL BANK | Saurashtra Gramin Bank | IndusInd Bank | IDBI BANK | KALYAN | Johnson | SENCO | Reliance | Shell | fincare | BDCC

Contact : Mrs. Suvarna Kshirsagar
Office Address : 1453, Shop No. 06, Shiv Parvati Society, Behind Janata Sahakari Bank. Khadilkar Path, Bajirao Road, Shukrawar Peth, Pune -411002
mtc1506pune@yahoo.com www.aurombica.com
7559283467 I 9685061515 I 9879791521


THE YAVATMAL URBAN CO-OP. BANK LTD., YAVATMAL
Regd.No. YML/BNK/114
दि यवतमाळ अर्बन
को-ऑप बँक लि., यवतमाळ
|| साहसे श्री : प्रतिवसति ||
मुख्य कार्यालय : एल.आय.सी. चौक, गार्डन रोड, यवतमाळ - ४४५००१
Website : www.yavatmalurbanbank.com
अमृत वर्षा
पुनर्गुंतवणुक ठेव योजना
दि. ०१ जुन २०२५ ते दि. ३१ मार्च २०२६
गुंतवणूक कालावधी
४४४ दिवसांकरिता
योजनेचा सामान्य व्याजदर 6.60%
केवळ ज्येष्ठ नागरिकांकरिता 7.10%
अधिक माहितीकरीता शाखा व्यवस्थापकाशी संपर्क साधावा.
| डॉ. नितीन खर्चे अध्यक्ष | अजिंदरसिंह चावला उपाध्यक्ष | श्रीधर कोहरे मुख्य कार्यकारी अधिकारी
संचालक - श्री. अजय विठ्ठलदासजी मुंधडा, श्री.आशिष हरिहरराव उत्तरवार, श्री.प्रशांत अरुण माधमशेट्टीवार, श्री.संजय चिंतामणराव डेहणकर,
श्री.प्रमोद मधूकरराव धुर्वे, ॲड.श्री.प्रफुल्लसिंह लक्ष्मणसिंह चौहान, श्री.गोवर्धन दयाराम राठोड, श्री.परिमल प्रेमकुमार देशपांडे, डॉ.श्री.महेश दामोधर सारोळकर,
श्री.वसंता रामजी सुपारे, श्री.संतोष विष्णूकांत पेन्शनवार, श्रीमती मिरा राजेश घाटे, सौ.शिला राजेश्वर निवल, श्री.नरेंद्र देवराव देशपांडे (तज्ञ संचालक),
श्री.संतोष विठ्ठलराव कुचनकर (तज्ञ संचालक)

## सहकार चळवळीतील महनीय व्यक्तींचा जीवनप्रवास
## महाराष्ट्रातील १७५ कार्यकर्तृत्वांचा सचित्र आलेख




**सहकार भारती प्रकाशित**
**सहकार सुगंध निर्मित...**

# सहकार महर्षी




### सहकार चळवळीतील प्रत्येकाने आवर्जून वाचावा असा ग्रंथ

**सहकार महर्षी ग्रंथ - प्रतींनुसार विशेष किंमत (कुरिअर मोफत)**

| | | |
|---|---|---|
| १ ते ५ ग्रंथ घेतल्यास | - | रु. १५००/- प्रमाणे प्रती ग्रंथ |
| ६ ते १० ग्रंथ घेतल्यास | - | रु. १३५०/- प्रमाणे प्रती ग्रंथ |
| ११ व त्यापेक्षा अधिक घेतल्यास | - | रु. १२००/- प्रमाणे प्रती ग्रंथ |

A/c Name :
Sahakar Printing & Publications Pvt. Ltd.
Bank Name :
State Bank of India
Branch :
Hingne Khurd, Pune Branch
Current a/c No. : 36931889346
IFS Code : SBIN0007159

UPI ID SahakarSugandha@SBI
सोबत दिलेला QR कोड स्कॅन करून ऑनलाईन पेमेंट करावे व तसे कार्यालयास कळवावे.

- महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक संस्थेचा प्रतिष्ठेचा पुरस्कार प्राप्त
- सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांनी शिफारस केलेला ग्रंथ

**बुके नको 'बुक' देऊ या! आपल्याकडे येणाऱ्या प्रत्येकाला 'सहकार महर्षी' ग्रंथ देऊ या!**



१५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!
सांगली अर्बन बँकेच्या विविध कर्ज योजना
कार लोन
होम लोन
गोल्ड लोन
एमएसएमई लोन
एज्युकेशन लोन
धन्वंतरी लोन
* व्याजदर - नियम व अटी लागू.
बँकिंग साक्षरता अभियाना अंतर्गत
सांगली अर्बन बँक घेऊन आली आहे १० वर्षावरील अज्ञानाचे वैयक्तिक नांवावर "मायनर सेव्हिंग" खाते. शालेय, महाविद्यालयीन विद्यार्थी, युवकांमध्ये बचतीची सवय लागावी, तसेच बँकींग व्यवहारांचीही ओळख व्हावी, यासाठी १० वर्षावरील वयाच्या अज्ञान मुला-मुलींचे त्यांच्या वैयक्तिक नांवावर सेव्हिंग खाते उघडता येणार आहे.
₹. 200/-* भरा
सेव्हिंग खाते उघडा
किमान शिल्लक मर्यादा नाही
सुविधा : ATM Card चेक बुक
आपल्या पाल्यांना बँक व्यवहार, बचत याची प्राथमिक माहिती घेण्याची सुवर्णसंधी
अधिक माहितीसाठी आमच्या नजीकच्या शाखेशी संपर्क साधा.
मोबाईल : ७८८८००९७१८
Since 1935
SUB
SUB का साथ, आपका विकास
सांगली अर्बन को-ऑप. बँक लि., सांगली
(शेड्युल्ड को-ऑप. बँक)
प्रधान कार्यालय : ४०४, खणभाग, सांगली ४१६४१६, फोन : (०२३३) १३७६२३६ /३७/३८



सहकार भारतीचे मुखपत्र सहकार सुगंध निर्मित
नागरी सहकारी 2026
बँक / पतसंस्था दैनंदिनी
नागरी सहकारी बँकांसाठी रिझर्व्ह बँकेच्या सर्व परिपत्रकांचा मराठीत संक्षिप्त गोषवारा तसेच QR कोडच्या मदतीने RBI ची सर्व मूळ परिपत्रके उपलब्ध असणारी एकमेव दैनंदिनी व नागरी सहकारी पतसंस्थेच्या दैनंदिनीमध्ये गेल्या तीन वर्षातील सर्व महत्वाच्या परिपत्रकांचा समावेश
देशभरातील नागरी सहकारी बँका व पतसंस्थांच्या संख्येनुसार आर्थिक स्थितीच्या उपयुक्त माहितीसह...
नागरी सहकारी बँक दैनंदिनी 2026
नागरी सहकारी बँक दैनंदिनी २०२६
किंमत रु. 500/-
अधिक प्रतींसाठी विशेष सवलत
आजच नोंदणी करा!
किंमत रु. 400/-
अधिक प्रतींसाठी विशेष सवलत
आजच नोंदणी करा!
नागरी सहकारी पतसंस्था दैनंदिनी २०२६
नागरी सहकारी पतसंस्था दैनंदिनी 2026
सहकार भारतीचे मुखपत्र 'सहकार सुगंध' कार्यालय : ऑफिस नं. १५, विष्णुप्रिया अपार्टमेंट, गणेशमळा, सिंहगड रोड, पुणे - ४११०३० मो. : 8805981673 ईमेल : sahakar.sugandha@gmail.com


NUCC®
NIRMAL UJJWAL CREDIT CO-OP. SO. LTD., NAGPUR (MULTI-STATE)
NUCC
ESTD. 1989
निर्मल उज्वल(TM)
क्रेडिट को-ऑप. सोसा. लि. नागपूर (मल्टीस्टेट)
स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव, तुमच्या स्वप्नपूर्तीस नवे बळ!
तुमचं घर, सोनं, मालमत्ता किंवा वाहन –स्वप्न काहीही असो,
आम्ही देतो त्याच्या पूर्ततेसाठी जलद आणि विश्वासार्ह कर्ज!
LOAN
MORTGAGE LOAN
HOUSING LOAN
GOLD LOAN
VEHICLE LOAN
DEPOSIT
13 MONTHS | 9% & 9.5%
24-36 MONTHS | 9.5% & 10%
181-364 DAYS | 9%
151 DAYS | 8.5%
AUGUST 15th
HAPPY INDEPENDENCE DAY
कमी व्याजदर
सोपी कागदपत्रे
जलद प्रक्रिया
विश्वासार्ह सेवा
आजच संपर्क करा
अधिक माहितीसाठी भेट द्या
(अटी व शर्ती लागू )*.
Add:193, Nandanvan Main Road, Nagpur - 09 | Ph No. 0712-2740800
Email : nirmalujjwal@gmail.com | Website : www.nirmalujjwal.com

safeage
Security Products Pvt. Ltd.

# OM SALES CORPORATION



## All our Products are BIS Standards

Our Certificates

ISO 14001 : 2004

IS 5244 : 2014 CM/L-7500087614

IS 550 : 2014 CM/L-3978088

IS 11188 : 2014 CM/L-2870669

ISO 9001 : 2008



Electronic safe | Depository safe | Gold Safe | Fire Resistant Cabinet | Fire Resistant Filing Cabinet | Industrial Locker | Compactor

**Nilesh Bonde Mob.: 9850120090 / 8698337947**

**Website : www.omsalescorportion.net I Id : omsales.safeage@gmail.com**

**Add. : S.No. 179, Fuge Vasti, Behind Pyramid Hotel, Near Gajanan Maharaj Mandir, Magzine Chowk, Bhosari-Alandi Road, Bhosari - 411039.**

**Factory Add - Safeage Security Products Pvt. Ltd., Shiye, Jyotiba Road, Kolhapur**

**We are authorised distributor for Pune, Satara, Sangli, Solapur, Ratnagiri, Sindhudurg, Raigad, Ahemadnagar, Nashik, Jalgaon, Dhule, Nandurbar, Aurangabad, Jalna, Parbhani, Hingoli, Usmanabad, Beed, Latur, Nanded, Buldhana, Akola, Amravati, Yavatmal, Washim, Nagpur, Bhandara, Wardha, Chandrapur, Gadchiroli, Gondiya,**


स्थापना 1995
लोकमान्य
मल्टिपर्पज को-ऑप. सोसायटी लि. (मल्टी-स्टेट)
प्रधान कार्यालय - पुणे, महाराष्ट्र
लोक मान्सून योजना 2025
*10.25%
प्रतिवर्ष
या पावसाळ्यात तुमची संपत्ती वाढवण्याची सुवर्ण संधी!
ठेव मुदत ५०० दिवसांची
किमान ठेव ₹१०,०००/- (उच्च मर्यादा नाही)
वरिष्ठ नागरिक (६०+ वर्षे) 0.५0% अतिरिक्त व्याज दर
स्थापना 1995
लोकमान्य
मल्टिपर्पज को-ऑप. सोसायटी लि. (मल्टी-स्टेट)
प्रधान कार्यालय - पुणे, महाराष्ट्र
महाराष्ट्र • कर्नाटक • गोवा • दिल्ली
Reg. No. M.S.C.S./C.R./140/2002
संस्थापक - अध्यक्ष : डॉ. किरण ठाकुर, सल्लागार संपादक, तरुण भारत, बेळगाव.
Call 1800 212 4050 lokmanyasociety.org

Registered - SAHAKAR SUGANDHA - PRGI NO. MAHMUL/2005/16099
Magazine Post Reg. No. : MSD/057/2025
(Publication Date - 05/08/2025) Posting on 07/08/2025 Posting at Magazine Post, Mumbai PSO, Mumbai 400 001




**प्रेषक :**
**सहकार सुगंध कार्यालय**
ऑफिस नं. १५, विष्णू प्रिया अपार्टमेंट,
५ वा मजला, ईशान रेस्टॉरंटच्यावर, गणेशमळा,
सिंहगड रोड, पुणे - ४११०३०.
मो. : ८८०५९८१६७३

प्रति,